पाक्षिक
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी
www.peoplespost.in

# द पीपल्स पोस्ट

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ । अंक १८ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ मे २०२२



# भोंगा विरुद्ध चालिसा...

पाक्षिक
# द पीपल्स पोस्ट
समाज आणि राष्ट्राच्या नवरचनेसाठी

स्थापना : २९ ऑगस्ट २०१८ । वर्ष : ४ ।
अंक १८ वा । मूल्य : रु. ३० । दिनांक : १ ते १५ मे २०२२

**संपादक**
चेतन शिंदे

**मांडणी व सजावट**
गायत्री ग्राफिक्स्, नाशिक

**संपादकीय पत्रव्यवहार**
द पीपल्स पोस्ट कार्यालय
सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

**संपर्क**
८८८८५४१८२२ । ९५८८४५११५१

E mail : thepeoplespost2014@gmal.com

(या अंकातील सर्व लेखांचे हक्क सुरक्षित)
✻ अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या मतांशी संपादक सहमत असलेच असे नाही.
✻ अंकातील कोणताही मजकर पूर्वपरवानगी शिवाय वापरता येणार नाही.

**ऑनलाईन समन्वयक**
प्रतीक माधुरी

द पीपल्स पोस्ट | 8888541822

• **जाहिरात विभाग संपर्क**
९८२१४४५४०९ / ८८०५१५१४५२

**अंकाची वार्षिक वर्गणी ६००/– रुपये फक्त**

• **द पीपल्स पोस्ट बँक अकाउंट डिटेल्स्**
द पीपल्स पोस्ट : SBI Bank
शाखा : समर्थनगर, औरंगाबाद
AC No. 37856373419
IFSC CODE : SBIN0007919
MICR No. : 431002010

**ऑनलाईन पेमेंटसाठी येथे स्कॅन करावे**

वर्गणीचा धनादेश, धनाकर्ष द पीपल्स पोस्ट या नावाने काढावा

**संपादकीय :** भोंगा विरुद्ध चालिसा ०३ / इतना सन्नाटा क्यूं है भाई? : नायकमूक – **जयदेव डोळे** ०५ / **हवा दिल्लीची :** 'मोदी सरकारचे पत्रकारांवर दबावतंत्र'– **विजय नाईक** ०८ / रशिया–युक्रेन युद्धाचे जागतिक गंभार परिणाम – **डॉ. विजय खरे** १२ / अस्वस्थ शेजारी... – **भास्कर नाशिककर** १५ / माहिती, ज्ञान आणि मनोरंजन : शिव्या – **प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे** १८ / सामाजिक अभिसरणासाठी दलित–दलितेत्तर संवादाची गरज – **बी.व्ही. जोंधळे** २० / आभासही आभास है – **प्रा. कैलास अंभुरे** २३ / **खास लेख :** बुद्धांचा विज्ञानवादी धम्म – **प्रो. भगवान माने** २६ / **खास लेख :** भावचक्र : प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत समजून घेण्याचा सोपा मार्ग – **जी.के. ऐनापुरे** ३० / **ग्रंथ परिचय :** हायकूमध्ये बाबासाहेब उलगडून सांगणारा जगातील पहिला संग्रह : हायकू भीमाचे – **किरण डोंगरदिवे** ३३ / **आज–कालचे प्रश्न :** – **पंक्चरवाला** ३५ / **कविता :** यशोधरा – **हिरा बनसोडे,** धीर देणारा माणूस – **इंद्रजित घुले** ३८

हे पाक्षिक, मालक, मुद्रक, प्रकाशक धम्मपाल भीमराव शिंदे यांनी मेत्ता प्रिंटर्स सीटीएस नं. १४४ मिल कॉर्नर, छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, औरंगाबाद ४३१००१ येथे छापून फ्लॅट नंबर ए–४०३, जीएन नं. १०/२, ग्लोरियासिटी, एमएसईबी पावर हाऊसजवळ पडेगाव, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. ✻ संपादक चेतन भीमराव शिंदे (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांची राहील) सर्व वादविवाद औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कक्षेत. क्र. MAHMAR/2018/76460

# भोंगा विरुद्ध चालिसा



'अजान' म्हणजे इस्लाम धर्मात करावयाची सामूहिक प्रार्थना. ती जेव्हा सुरू झाली त्याच वेळी ती सर्वांना ऐकू कशी जाईल, याविषयी विचार सुरू झाला. मोहम्मद पैगंबर यांच्याच काळात तो सुरू झाला. वेगवेगळ्या मार्गांनी चर्चा झाली आणि ज्याचा आवाज मोठा आहे अशांनी अजान पढावी, असे ठरले. पुढे भोंगा आला आणि अनेक देशांत मशिदींवर भोंगे लागले. जेथे कष्टकरी मुस्लीम मोठ्या प्रमाणात आहेत आणि संख्येनेही ते मोठ्या प्रमाणात आहेत, अशा ठिकाणी भोंगे वाजू लागले. अजानची वेळ सुरू झाली. अजान सुरू झाली हे जास्तीत जास्त मुस्लिमांना कळावे, हा त्यामागचा उद्देश असतो. भोंगा पक्का करण्यापूर्वी झेंडा फडकवणे, अग्नी प्रज्वलित करणे यांसारखे काही मार्ग चर्चेसाठी आले होते; पण ते उचित न वाटल्याने भोंग्यावर हे प्रकरण थांबले. अरबी भाषेतील अजान जगभर असते. दोन-तीन मिनिटांची ती असते. जे एकटेच नमाज पडतात त्यांना मुनफरिद म्हणतात. युरोपमधील फ्रान्स आदी अनेक देशांत अजानसाठी भोंगा वाजवण्याची प्रथा नाही. पाकिस्तान, भारत आदी देशांत ती आहे. अजानमध्ये पुढील अर्थ असतो,

अल्लाहु अकबर (अल्ला सर्वश्रेष्ठ आहे). अशहदु अल्लाह इलाहा इल्लल्लाह (मी खात्री देतो की अल्लाहशिवाय दुसरा कोणी विश्वासू नाही). हय्या असल्सलाह (इबादतीकडे चला). हय्या अलल फलाह (यशाकडे चला). अल्लाहु अकबर (अल्लाह सर्वश्रेष्ठ आहे). ला इलाहा इल्ललाह (मी खात्री देतो की अल्लाशिवाय कोणी विश्वासू नाही).

समाज जसजसा विकसित होऊ लागला. ध्वनिप्रदुषणाचा आणि आपणही आपल्या धर्मातील प्रार्थना अशीच मोठ्याने म्हटली पाहिजे, असा विचार करू लागला तेव्हा भोंगा चर्चेत आला. भारतात भोंग्याच्या आवाजाला हिंदू विरुद्ध मुस्लिम, असे स्वरूप हिंदुत्ववाद्यांनी दिले. भोंग्याचा आम्हाला त्रास होतोय. नैसर्गिक प्रश्न तयार होतात, अशी तक्रार करत-करत भोंगा सर्वोच्च न्यायालयात नेण्यात आला. मध्यंतरी धार्मिक भावनांचे प्रदर्शन अधिक तीव्र करण्याच्या प्रयत्नात मशिदीत नमाज तर रस्त्यावर महाआरती करण्याचा प्रयत्न झाला. घंटी वाजवण्याचा प्रयत्न झाला. अर्थात, या सर्वांत धार्मिक तत्त्वापेक्षा श्रद्धांचे प्रदर्शन आणि तेही कोणाच्या तरी विरोधात, हा प्रकार अधिक होता. मध्यंतरानंतर काही काळ हा प्रकार गोठला होता. आता महाराष्ट्रातील राजकीय समीकरणे बदलली. राजकारणाचे विषय बदलले आणि प्रमुख पक्षांमध्ये हिंदुत्व उफाळून आले. अयोध्येतला श्रीराम सत्ता मिळवून देण्यात मदत करतो हे भाजपला कधीच कळले होते. मग प्रखर हिंदुत्ववादी कोण, याविषयी जुगलबंदी सुरू झाली. नेत्यांच्या वस्त्रांचा रंग बदलला. 'जो रामजादे नहीं वह हरामजादे' इथपर्यंत मजल गेली. शिवसेना, मनसेने अयोध्यावाऱ्या सुरू केल्या. कोण मोठा हिंदुत्ववादी म्हणजे कडवा हिंदुत्ववादी असा प्रश्न निर्माण झाला. राजकारण जणू काही हिंदुत्वाभोवती उभे राहिले. बिगर हिंदुत्ववादी पक्षांनाही मंदिराचे दरवाजे झिजवावे लागत आहेत. या सर्व प्रकारांत मनसेने उडी मारली. सत्तेपासून दूर फेकला गेलेला मनसे हनुमान चालिसा घेऊन एकदम उफाळून पुढे आला. भोंगे बंद करा; अन्यथा आम्ही हनुमान चालिसा भोंग्यावर म्हणजे ध्वनिक्षेपकावर म्हणू, असे आव्हान त्याने दिले. त्याची तयारी केली. मनसेच्या दृष्टीने हा धार्मिक प्रश्न नाही, तर सामाजिक आहे. हनुमान चालिसा धार्मिक की सामाजिक, याचे उत्तर ते देत नाहीत. अजान म्हणायला दोन-तीन मिनिटे लागत असतील तर चालिसा म्हणायला दहा-पंधरा मिनिटे लागतात. ते एक मोठे स्तोत्र आहे. काहींनी श्रीराम पकडला, काहींनी कृष्ण तर काहींनी रामभक्त हनुमान पकडला. जसे की मनसेने हनुमान पकडला आहे.

आता हनुमान चालिसाविषयी थोडे समजून घेऊ. भारतातले एक महान संत आणि रामचरित्र मानसचे निर्माते गोस्वामी तुलसीदास (१५११ ते १६२३) यांनी हनुमान चालिसा लिहिली आहे. रामानंदी बैरागी साधू असलेल्या तुलसीदास यांच्या रामचरित्राला एक श्रेष्ठ महाकाव्य मानले जाते. त्यांच्या जन्माविषयीही काही चमत्कारिक कथा आहेत. जसे, की ते मातेच्या उदरात बारा

महिने राहिले, जन्माला आल्या-आल्या त्यांनी श्रीरामाच्या नावाचा उच्चार केला. त्यांना दात आलेले होते वगैरे वगैरे; पण ते सर्वश्रेष्ठ प्रतिभावंत आणि विचारी होते, याविषयी कुणाचे दुमत नाही. तुलसीदासजींना श्रीराम आणि हनुमान यांनी प्रकट दर्शन दिले होते, असे सांगितले जाते, तर तुलसीदासांनी हनुमान चालिसा लिहिली. ती म्हटल्यावर कोणतीही व्यक्ती कोणतेही संकट, विकार किंवा भीती यावर मात करू शकते. हनुमान चालिसा कोणी, कुठे आणि किती वेळा म्हणावी याविषयी कोणतेही बंधन नाही. हे जसे खरे, तसेच अजानच्या भोंग्याला विरोध करण्यासाठी ती म्हणावी, असेही कुठे म्हटलेले नाही. दुसऱ्याच्या घरासमोर जबरदस्तीने म्हणावी, असेही म्हटलेले नाही. असे असूनही राणा पती-पत्नीने मातोश्रीसमोर जाऊन ती म्हणण्याचा आणि तो आपला हक्क आहे, असे सांगण्याचा प्रयत्न केला आणि यावरून रामायणाऐवजी नवे राजकीय महाभारत कसे सुरू झाले, हे आपण सर्व पाहतो आहोत.

हनुमान चालिसा ही निष्पाप मनाने आणि खोल अंतःकरणाने करावयाची भक्ती आहे. ती गांभीर्याने करावयाची भक्ती आहे. भक्ती करणारा माणूस मोठ्या श्रद्धेने आणि आर्त भावनेने हनुमानाला सांगतो, की माझे शरीर आणि बुद्धी अशक्त झाली आहे ती वाढव. तुम्हाला शरण येणाऱ्यांना कुठलेच भय राहत नाही. तुमचे नाव उच्चारले, की पिशाचही जवळपास येत नाही. सर्व पीडा संपतात. त्रास नष्ट होतो. सर्वांची संकटे तुम्ही सोडवता. तुमची पूजा केल्याने रामाचीही प्राप्ती होते. सर्व प्रकारची सुखे मिळतात. कृपाळू होऊन आमच्यावर दया करा, अशी ही चालिसा आहे. आता पहिला प्रश्न असा निर्माण होतो, की मनसेसमोर असा कोणता गंभीर प्रश्न तयार झाला, की चालिसा म्हणण्यासाठी त्यांनी संघर्ष सुरू केला आणि त्यानिमित्ताने भोंग्याचा विषय काढला. याच विषयावर आरपार लढण्याचा विषय बनविण्यात आला. उत्तर प्रदेशात योगी सरकारने प्रार्थनास्थळांतून भोंग्याद्वारे काढण्यात येणाऱ्या आवाजावर मर्यादा आणली. याचा मनसेला इतका आनंद झाला, की त्यांनी लगेचच मोदी सरकारला खऱ्या अर्थाने योगी असे प्रमाणपत्र दिले, तर महाराष्ट्रात ठाकरे सरकारला भोगी असे प्रमाणपत्र दिले. अजूनही काही होईल आणि भोंग्यासारखे अन्य काही विषय सत्तेच्या राजकारणाचा केंद्रबिंदू बनतील यात शंका नाही. सत्तेचा मार्ग म्हणजे नवा मार्ग आता धर्मातून नेला जात आहे.

कोण्या एके काळात अजानसाठी मोठा आवाज आवश्यकही असेल. तो सर्वच धर्मांत होता. नाशकात तर नारो शंकराची भलीमोठी घंटा आहे. आता ती फारशी कोणी वाजवत नाही. बदलत्या काळाचे, जीवनशैलीचे भान ठेवून मंदिरातून म्हणजेच एकूण धर्मस्थळांतून किती मोठा आवाज काढायचा, याचा विचार केला पाहिजे. प्रार्थनेचा उद्देश मोठा आवाज काढणे हा नसतो, तर परमेश्वराला प्रसन्न करून घेण्यासाठी, त्याचा धावा करण्यासाठीचा एक नम्र मार्ग असतो. संत कबीर यांनी याबाबत एक सुंदर दोहा लिहून ठेवला आहे. मुंगीच्या पायातील घुंगराचा आवाजही परमेश्वराला ऐकू येतो. त्याला ऐकू जावे म्हणून मोठा आवाज काढण्याची काहीच आवश्यकता नाही. परमेश्वराला कमी ऐकू येते या भ्रमात कोणी राहू नये; पण इथे प्रश्न परमेश्वराला जागे करण्याचा नाही, तर आपल्या परंपरेचे शक्ती प्रदर्शन करण्याचा आहे. तुम्ही भोंगा वापरता तर आम्ही ढोल वापरू, तुम्ही तीन मिनिटे आवाज काढता तर आम्ही दहा मिनिटे काढू, तुमच्या भोंग्याचा आमच्या श्रद्धांवर काय परिणाम होत असतील याचा विचार करा, अशा प्रकारचा सवालजबाब श्रद्धांशी, भक्तीशी संबंधित नाही तर राजकारणाशी संबंधित आहे. राजकारणात जगण्या-मरण्याचे विषय वापरण्याची हिंमत नसली, की मग असे अचानक भोंगे येतात. ते एखाद्याला नेताही करतात; पण मूळ प्रश्न असा आहे, की भोंगा म्हणजे सर्वार्थाने सत्ता मिळवून देण्याचे काही पेटेंट असत नाही.

भोंगा आणि चालिसावरून बघता-बघता कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण झाले. पोलीस खाते चोर सोडून भोंग्याच्या मागे लागले. दोन्ही गटांपैकी एकही गट विवेक पाळायला तयार नाही. अशा संघर्षातून खरेच परमेश्वर प्रसन्न होतो का आणि जनतेला काय मिळते, याचा विचार कोणी करण्याची शक्यता दिसत नाही. कारण कुणाला पंधरा वर्षांत हिंदू राष्ट्र आणायचे आहे तर कुणाला पॅन इस्लाम बनवायचे आहे. अशी मागणी कधी सामान्य जनतेने केलेली नव्हती; पण काही कथित मनकवड्यांनी कथित भावना गोळा केल्या आणि लागले संघर्ष करायला. महाराष्ट्रातले हे लोण आता हळूहळू इतरत्र पसरायला लागेल. कोण धर्मप्रेमी, कोण राष्ट्रवादी याची झुंज लागेल जी आता लागलीच आहे. धर्माच्या नावाने आणि राष्ट्राच्या नावाने जगभर पसरणारा मूलतत्त्ववाद शेवटी सर्वसामान्य माणसावरच उलटणार आहे. हनुमान चालिसा काय किंवा भोंगा काय, असा माणसावर उलटेल आणि राजकीय, धार्मिक स्पर्धकांवर उलटवला जाईल, याचा विचार कोणी केला नसावा; पण आता सामान्य जनतेने तो करण्याची वेळ आली आहे.

कोण्या ऐकेकाळी मराठी माणसाचा विषय घेऊन 'लुंगी हटाव-पुंगी बजाव' म्हणणारी शिवसेना, मराठी माणसासाठी आणि मराठी फलकांसाठी खळ्ळखट्टाक म्हणणारी मनसे, स्वतःच स्वतःला सोज्वळतेचे प्रमाणपत्र देणारा भाजप आणि सगळेच नव्या मार्गावर जात आहेत. धर्माकडून सत्तेकडे असा तो मार्ग आहे, जो कोणत्याही देशाला परवडणारा नाही. 'लाव रे तो व्हिडिओ' असे सांगणारे कोणता व्हिडिओ लावत होते आणि आता कुणाच्या तंबूत जाण्याची घाई करत आहेत, हेही सामान्य माणसाला ठाऊक आहेच. असे करण्यामागचे कारणही ठाऊक आहे. लोकांच्या अंतरंगावर राज्य करून सत्ता मिळवता येते, त्यांचे कानातील पडदे फाडून नव्हे आणि हनुमान चालिसा म्हणावी अशी कसलीही परिस्थिती उद्भवली नसताना ती तशी करून नव्हे, हे यांनी आणि त्यांनीही ध्यानात ठेवले पाहिजे. अशा गोष्टीतून केवळ कानावरच परिणाम होणार नाही, तर भारतासारख्या विविधतापूर्ण देशात टिकवून ठेवलेल्या धार्मिक आणि सामाजिक सलोख्यालाही तडे जातील. ■■■



# नायकमूक



जयदेव डोळे

**हा पंतप्रधान झोपा काढतो, असे कुणी म्हणणार नाही. मात्र, तो अनेक गोष्टी पाहून न पाहिल्यासारखा करतो, असे म्हणता येते. नाही तर रोज तीन-चार कार्यक्रम करणारे पंतप्रधान मधल्या वेळेत शांततेचे आवाहन करू शकले असते. होतेय उलटेच. खुद्द देशाचा नेता मूक झालेलाय. म्हणजे नायकमूक!**

अमेरिका, युरोप, आफ्रिका हे काही गप्प बसणारे खंड नाहीत. कित्येक क्रांत्या करणारे देश आहेत तिथे. बोलणे अन् बोलायला लावणे तिथे थांबतच नाही कधी. अखंड २४ तास चालू असणारे रेडिओ, टीव्ही त्या देशांत आहेत. सतत वार्ता देण्याची टूम त्यांनीच तर आणली. इकडून तिकडे प्रवासात असणाऱ्यांना आपल्या गावात, देशात, कंपनीत काय चाललेय ते कळत राहावे यासाठी इंटरनेटने केवढे जाळे टाकलेय जगभर... पण या देशांमधून गप्प राहिल्यामुळे अनेक गुन्हे उशिरा उघडकीस आल्याच्या वार्ता अलीकडे जास्तीच येऊ लागल्या आहेत. चर्चेसमध्ये काम करणारे बिशप, पाद्री यांनी आपले बालपणी लैंगिक शोषण केले, असे सांगणारे अनेक प्रौढ व वयस्कर लोक पुढे येत आहेत. अनेक क्रीडापटू आपापल्या क्रीडा शिक्षकांविरुद्ध तक्रारी करू लागले आहेत. स्पर्धा खेळायला तयारी करताना क्रीडा शिक्षकाने जबरी लैंगिक संबंध ठेवले, असे जाहीर करणाऱ्या अनेक महिला क्रीडापटू न्यायालयात गेल्या आहेत. डॉक्टर, प्राध्यापक, शास्त्रज्ञ, राजकीय पुढारी, चित्रपट दिग्दर्शक अशा वेगवेगळ्या व्यवसायांतल्या नामांकितांवर त्यांनी महिलांचे लैंगिक शोषण केल्याचे आरोप होऊ लागले आहेत.

## विलंब आणि न्याय यात संघर्ष होणार?

या सर्व आरोपांमधील एक समान गोष्ट म्हणजे घडलेला प्रसंग आणि त्याची झालेली वाच्यता यांतले अंतर. त्यामुळे आरोपींना आपोआप मिळणारा संशयाचा फायदा. तक्रार करणारी व्यक्ती महिला असल्यास तिच्यावर गुदरलेल्या अतिप्रसंगाची

वाच्यता अनेक दिवसांनी होणे आणि त्यामुळे हा सारा बदनामी, लुबाडणूक, फसवाफसवी यांसाठी रचलेला डाव आहे, असा कांगावाही होणे हे आपल्या सवयीचे झाले आहे. अशा बातम्या वाचताना आपण चिडतो, वैतागतो आणि हळहळतो. पत्रकारांना दोन्ही बाजू द्याव्या लागतात. त्याप्रमाणे जी व्यक्ती आरोपी असते तिचे म्हणणेही त्यांना द्यावे लागते. कारण दोषी धरण्याचा अधिकार पत्रकारांना नाही. तो पोलिसांनाही नाही. न्यायालयांत खऱ्याखोट्याची शहानिशा होते. तिथे कळू शकते, की अनेक दिवसांपूर्वी जे घडले ते खरोखर तसेच घडले, की आणखी काही. न्यायालयांनाही प्रश्न पडतो, की इतके दिवस फिर्यादी व्यक्ती चूप का बसली? एवढे सारे सोसूनदेखील तिने लगेच तक्रार अथवा फिर्याद का नाही नोंदवली? विलंब आणि न्याय यांत मग संघर्ष नाही का होणार?

## चाकोरी मनुष्य आखतो पण...

चुप चुप खड़े हो, जरूर कोई बात है... असे एक चित्रपट गीत ७० वर्षांपूर्वी खूप गाजले. त्याचे दुसरे वाक्य महत्त्वाचे आहे, 'पहली मुलाकात है जी पहली मुलाकात है' ही ती ओळ आहे. कोणतीही गोष्ट जेव्हा आपल्या आयुष्यात प्रथमच घडत असते, तेव्हा माणसाकडून शब्द न फुटणे ही अगदी स्वाभाविक प्रतिक्रिया असते. नावीन्याचा एक पैलू धक्का हा असतो. हा धक्का म्हणजे सरावलेल्या आपल्या मन व मेंदूला सर्वस्वी अपरिचित वा अज्ञात अनुभवाचा प्रसंग. स्पर्श, शब्द, नजर, आवाज, गंध असा तो ऐंद्रिय अनुभव असतो. प्रत्येकाने आपल्यापुरते काही सवयीचे अन् सरावाचे विश्व तयार केलेले असते. त्यात काही फेरफार होऊ नयेत याची धडपड प्रत्येक जण करतो. चाकोरी मनुष्य आखतो खरी; पण ती त्याला जखडून टाकते. कमीत कमी कष्ट व्हावेत आणि आरामात आपल्याला हवे ते मिळावे, अशी चाह माणसाची असते. म्हणूनच या चाकोरीला छेद देणारी कृती किंवा घटना माणसाला धक्का देणारी ठरते. हा असा धक्का माणसाला अव्यक्त, मूक करून सोडतो.

## अज्ञानात कुणालाही भेद करता येत नाही

हे असे मौन साधेसुधे नसते. ते आतल्या आत बोलत असते. ज्या मुलींना त्यांच्या क्रीडा शिक्षकाने अनपेक्षित असा अनुभव दिला, त्यांना आपल्याकडूनच काही तरी गैर झाल्याची जाणीव होते. कारण आपण तर काही वेगळे करीत नव्हतो. इतरांसारखेच आपण असताना सदर पुरुषाने तसा स्पर्श का केला असावा, या विचारात त्या मुली दंग होऊन जातात. एकदा का विचार डोक्यात गरगरू लागला, की शब्दांना ध्वनी प्राप्त होत नाही आणि त्यांचे रूपांतर मौनात होऊन जाते. निरागसता अथवा अज्ञान यांच्यात कुणालाही भेद करता येत नाही. त्यामुळे क्रीडा शिक्षकामध्ये एक लंपट अन् बलात्कारी दडलेला आहे, हे तो जोवर स्पर्श करीत नाही तोवर माहीतच नसते. एकत्र जमण्याचे उद्दिष्ट जर क्रीडा हेच असेल, तर बाकीच्या गोष्टींची उपस्थिती तिथे असण्याचे कारणच नाही. त्यामुळे सावध असणे, लक्ष ठेवणे, जपून वागणे या गोष्टी शक्यच नसतात. निरागसता याला म्हणतात. निरागसता व एकाग्रता मैत्रिणी असतात. दोघी एकत्र असल्यावरच यश मिळते. डोक्यात नाना शक्यता भुणभुणत असताना एकाग्रता नांदेल कशी? म्हणून क्रीडापटू पुरुषांकडून लक्ष्य होण्याची शक्यता अधिक.

अशा या लैंगिक छळ झालेल्या मुली मौनात जातात. त्यांचे मौन जखमी मनाचे असते. त्यांच्या शरीरावर एक आघात झालेला असतो. तो त्यांना सुन्न करून सोडतो. कारण तो सर्वथा अनपेक्षित व अनवांच्छित असतो. चर्चमध्ये एखाद्या निर्जन जागी परमेश्वर दाखवतो म्हणून एखाद्या धर्मगुरूकडून होणारी शारीरिक लगट जेवढी धक्कादायक, तेवढे ते मौन रक्ताळलेले आणि काळेनिळे झालेले. निरागस मन देवाचा शोध घ्यायला अनावर झालेले असताना असा जबरी स्पर्श झाल्यावर बोलणार काय? सांगणार कुणाला? मौन असे अचानक माणसाच्या मानगुटीवर बसते. त्याचा काहीही दोष नसताना ते अपराधी वाटायला लावते. आपलेच काही चुकले असे ते बिंबवते जणू.

## ...त्या मौनाचे स्पष्टीकरण मिळत नसते

काय झालंय तुला, सांगत का नाहीस? असा वारंवार प्रश्न करूनही आपल्याला त्या मौनाचे स्पष्टीकरण मिळत नसते. कारण त्या मौनाला दुःखाचीही एक किनार असते. मैदान, देऊळ अथवा शिक्षणसंस्था ही ठिकाणे वाह्यातपणा करण्याच्या जागा नसतात, याची केवढी तरी खात्री होती मनाला; पण तिथे नकोसा व नासका अनुभव आल्यावर करणार काय? एकाच हेतूने या तीन जागा कार्यरत असताना हे मध्येच अनाठायी कसे काय उपटले? त्यामुळे बोलायचे काय अन् सांगणार कसे, हे प्रश्न मनातले शब्द कुरतडत राहतात. तोंडून बाहेर धड काही पडत नाही. अपमान, मानभंग या भावना तर मुलींच्या बाबतीत फार तीव्र असतात. त्या मनात दाटल्या की शब्द गाडून टाकतात.

सबब, मौन नेहमी दुखरे असते. आघात, अपमान अन् अघटित यांचा तो हल्ला असतो. हल्ला झाल्यावर जसे काही क्षण सुन्न असतात तसेच त्याचे.

पण आपल्या देशाचे, प्रिय भारताचे मौन जरा वेगळेच दिसते. ना त्याला कुणी फटकारले, ना त्यावर कुणी हल्ला केला, ना कुणी त्याचा अहंकार दुखावला. तिकडे श्रीलंकेची वाताहत झाली म्हणून तो चूप झालाय का? पलीकडे पाकिस्तानात एका देखण्या नायकाचे सरकार भुईसपाट झाले म्हणून तो मूक झालाय का? अजून पल्याड अफगाणिस्तानात तालिबान्यांचा खरा खेळ सुरू झाला म्हणून भारत गप्प आहे?

अहो, पण काहीही न बोलायला ते विषय चर्चेस आले तरी पाहिजेत. ते ना वृत्तपत्रांत येत आहेत, ना टीव्हीत. चार दिवस घेतली नोंद त्यांची, बस्स! चला पुढे म्हणत सारी माध्यमे हिंदू-मुस्लीम, मोदी, भाजप, ठाकरे, ईडी करत सुटलीयत.

महागाईवर हनुमान स्तोत्राची मात झालेलीय. बेकारीवर मोहन भागवत यांच्या अखंड भारताने कुरघोडी केलेलीय, तर ईश्वराप्पा नामक मंत्र्यांच्या राजीनाम्यावर जेएनयूमधल्या

मारामारीने! एकंदरीत देशापुढचे महत्त्वाचे प्रश्न कुणाच्याही तोंडी वा मुखी येईनासे झाले आहेत. त्यांनी कुणाची वाचा खुंटलीय असे म्हणावे, तर अखंड बडबड काही थांबत नाही.

## वातावरण तणावपूर्ण करण्यात सत्ताधारी पक्षाशा वाटा

भारतात रामनवमीपासून वातावरण तणावपूर्ण करण्यात सत्ताधारी पक्षाशी संबंध असलेल्यांचा मोठा वाटा असून, पंतप्रधान त्याबद्दल मूक आहेत, असा आरोप १३ विरोधी पक्षांनी केलाय. तुम्ही गप्प आहात याचा अर्थ तुमचा पाठिंबा आहे का, ते स्पष्ट करा, असा पेच विरोधकांनी टाकल्यामुळे नरेंद्र मोदी आणखी मौनात गेले. हो म्हटले तर पंचाईत, नाही म्हटले तर अडचण. सत्तेचे एक नवेच वैशिष्ट्य भारतात भाजपचे राज्य प्रकट करीत आहे. ऐकून न ऐकल्यासारखे केले की झाले! माहीतच नाही, समजलेच नाही असा पवित्रा घेतला, की काम भागते! सत्ता म्हटले, की जबाबदाऱ्या आल्या. सत्ताधारी म्हटले, की लोकांना वाटते आधीच यांना मोठे काम, त्यात आपली भर कशाला? त्यामुळे फावते सत्ताधाऱ्यांचेच. तुम्ही तेव्हाच सांगितले असते, तर कारवाई तत्काळ केली असती, आता फार उशीर झाला, असे म्हणून टाळाटाळ अधिकृत करता येते. मोदी फार वेळ काम करतात; सुटीच घेत नाहीत, असा प्रचार भरपूर झालेलाय; परंतु त्या कामाचा सारा हिस्सा देशात शांतता आहे की नाही, हिंदू-मुस्लीम एकमेकांच्या जिवावर उठलेले तर नाहीत, यावर लक्ष ठेवण्यात जायला हवा. हा पंतप्रधान झोपा काढतो, असे कुणी म्हणणार नाही. मात्र, तो अनेक गोष्टी पाहून न पाहिल्यासारखा करतो, असे म्हणता येते. नाही तर रोज तीन-चार कार्यक्रम करणारे पंतप्रधान मधल्या वेळेत शांततेचे आवाहन करू शकले असते. होतेय उलटेच. खुद्द देशाचा नेता मूक झालेलाय. म्हणजे नायकमूक!

आपल्याला हवे ते अन् हव्या त्यावेळी तोंडातून ब्र काढायला शिकावे ते संघवाल्यांकडून. वाद, संवाद यांवर विश्वास नसल्याने एक तर बोलायचे नाही. दुसरे, बोलायचे काय? कारण बोलणे झाल्यास भूमिका घ्यावी लागणार. ती घेतली, की कुणीतरी दुखावणार. त्यामुळे शक्य तो तोंड उघडायला संघ तयार नसतो. तिसरे वैशिष्ट्य संघाच्या गुप्त कारभाराचे. तोंडासमोर एक अन् मागे भलतेच, असे संघ वागत असतो. मग जे मनात ठेवलेय ते सांगायचे कशाला, असा खास कारस्थानी पवित्रा संघ घेतो.

## दारापलीकडे मौन आणि दाराअलीकडे मौन

संघाच्या मौनात स्वार्थ लपलेला असतो, तो असा. मौन सहनशीलतेचेही प्रतीक आणि शहाणपणाचेही. सहनशक्तीला सीमा असते. त्यामुळे वेदनेला आवाज फुटतोच; पण शहाणपण असीम असते. वेळकाळ बघून तोंड उघडणाऱ्यांना शहाणे म्हणतात. त्यात संघाचा गाभा ब्राह्मणी. शहाणपणाची उपजात मक्तेदारी. संघ कशावर काही बोलेनासा झाला की लोक म्हणतात, विचारमंथन चालू असेल! ब्राह्मण्य आणि विचार, ब्राह्मण आणि बुद्धी यांची सांगड अशी घट्ट घालून दिलेली, की



मौनाचा आविर्भाव म्हणजे बुद्धिमत्तेचा आविष्कार, असे ठाम मत झालेले. त्याचबरोबर मौन म्हणजे न्यायाची प्रतीक्षा. एकदम रिॲक्ट होईल तो ब्राह्मण नसतो. सर्व बाजू तपासून, बरेवाईट जोखून आणि समतोल राखायचा अभिनय करून जो बोलेल तो ब्राह्मण. संघवाले एवढेसुद्धा करणार नाहीत. याचा अर्थ ते सुपरब्राह्मण. न्यायनिवाडा आम्ही पाहून घेऊ. त्यासाठी तातडीने मतप्रदर्शन करणे योग्य नाही, असा संघवाल्यांचा कारभार असतो. सरसंघचालक लोकांकडून मते, अभिप्राय व टीकाटिप्पणी अपेक्षितात आणि त्यानुसार आपली भूमिका घोषित करतात, असे कधी घडल्याचे ऐकलेय कुणी? छे छे! असे संघाच्या मौनावर जनता नामक मूर्ख माणसांचे अतिक्रमण कधीही होऊ दिले जात नाही. सरसंघचालक समोर असताना तुम्ही परवानगी असल्यावाचून ब्रही उच्चारायचा नसतो. सरसंघचालकांना परमपूज्य हे विशेषण उगाच लावलेले नाही. आपल्यापर्यंत कुणी अनाहूत व नकोसे मतप्रदर्शन करण्यासाठी पोहोचूच नये, यासाठी उभे केलेले ते एक दार आहे. दारापलीकडे मौन आणि दाराअलीकडे मौन, असा मौन महोत्सव या परिवारात चालू असतो. एखाद्या पीडितेचे अथवा बलात्कारीतेचे मौन आणि हे अधिकारारूढ मौन यांची तुलना कशी होऊ शकेल? तुलना सोडा, समजून तरी घेता येईल का या दोन मौनांमधला फरक?

मुक्याने, मुकाट्याने, निमूटपणे वावरणाऱ्या स्त्रिया आपण पाहतो. आपल्याला वाटते, असतील शांत स्वभावाच्या आणि कुणाच्या अध्यातमध्यात नसणाऱ्या. त्यांचे मौन जखमांमुळे न उमटणाऱ्या शब्दांचे असते. त्या मौनात छळ, अपमान आणि निंदा यांचा तगादा असतो. या मौनामधूनच रेल्वेसमोर उडी, विहिरीत बुडी आणि गळफासाची कडी त्यांना खुणावते. मौनाचा व मृत्यूचा असा एक घनिष्ठ सहवास आहे.

बोला आता, हिंदू-मुसलमान एकमेकांना मारायला उठावेत अशी चिथावणी देणाऱ्यांना आवरायला सांगा, असे म्हटल्यावर पंतप्रधान मौनात का गेले? नायक मूक का झाला? ■■■

**(लेखक ज्येष्ठ माध्यमतज्ज्ञ आहेत.)**

# 'मोदी सरकारचे पत्रकारांवर दबावतंत्र'

**केंद्रात मोदी सरकार आल्यापासून पत्रकारांवरील अत्याचाराच्या आणि मुस्कटदाबीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. यंदापासून अधिस्वीकृती पत्रासाठी घातलेल्या जाचक अटी, ज्येष्ठ पत्रकारांना संसदप्रवेशावर बंदी आणि देशभरातील अनेक वृत्तपत्रांच्या आणि संकेतस्थळांच्या मालक, संपादक आणि पत्रकारांविरूद्ध करण्यात येणाऱ्या कारवाया ही पत्रकारांवर मोदी सरकारने वाढवलेल्या दबावतंत्राची उदाहरणे आहेत. ही बाब लक्षात घेता पत्रकारितेत नव्याने येणाऱ्यांनी हा एक प्रोफेशनल हॅझार्ड मानूनच व्यवसायात उतरले पाहिजे.**



विजय नाईक

भारतात लोकशाहीची मूल्ये कायम आहेत, असा दावा करीत जगात मिरविणारे भाजपचे सरकार देशात मात्र दिवसेंदिवस पत्रकारांवर एकामागून एक जाचक बंधने घालीत आहे. हा व्यवसाय कसा संपुष्टात आणता येईल, टीका करणाऱ्या पत्रकारांना कसे वठणीवर आणता येईल, याचे निरनिराळे मार्ग शोधीत आहे. केवळ चापलुसी करणाऱ्या, पंतप्रधान नरेंद्र मोदी व भाजपचे सरकार यांचा उदोउदो करणाऱ्या पत्रकारांनाच साऱ्या सोयी व सवलती मिळतील, अशी पावले सरकार जाहीरपणे टाकीत आहे. त्यातून वृत्तपत्र व्यवसायात फळी निर्माण करण्याचे उद्दिष्ट सरकारने बऱ्याच अंशी गाठले आहे.

## चापलुसी करणारा पत्रकार खरा देशभक्त

जबाबदार व देशप्रेमी पत्रकाराची एक नवी व्याख्या सरकार समाजापुढे आणू पाहात आहे. जबाबदार पत्रकार म्हणजे, सरकारची धोरणे, कृती याच्यावर सौम्य टीका करणारा, पंतप्रधान नरेंद्र मोदी, तसेच त्यांच्या सरकारमधील मंत्र्यांवर कोणतीही टीका न करणारा, त्यांचे नेहमी गोडवे गाणारा, त्यांच्या पुढेपुढे करणारा, चापलुसी करणारा पत्रकार हा देशभक्त, अशी नवी व्याख्या सरकार करू पाहात आहे. थोडक्यात गरज आहे, ती मोदीनिष्ठ पत्रकारांची.

सरकारकडे हुकमी बहुमत असल्याने आम्ही म्हणू तो कायदा, हे तत्त्व जनमानसावर लादण्याचा रोज प्रयत्न होत आहे. विरोधकांना सरळ करण्यासाठी सरकारी संस्थांचा वापर, हा आता नियम झाला आहे.

मोदी यांचे सरकार २०१४ मध्ये सत्तेवर आले, तेव्हापासून त्यांचा पत्रकारविरोधी दृष्टिकोन सातत्याने समोर येत आहे. मोदी यांनी जनतेशी थेट संपर्क साधण्यासाठी सोशल मिडियाचा व प्रामुख्याने ट्विटरचा उपयोग केला. त्याबाबत कुणाला काही आक्षेप असण्याचे कारण नाही. आधीच्या काँग्रेस सरकारने पत्रकारांचे चोचले पुरविले आहेत, अशी त्यांची धारणा असल्याने त्यांना चार हात दूर ठेवणे हा नियम ते गेली सात वर्षे पाळत आहेत. त्यालाही आक्षेप घेण्याची गरज नाही; परंतु पत्रकारितेच्या व्यवसायाविरूद्ध हळूहळू जी पावले पडू लागली, त्यातून त्यांचा पत्रकारांविरूद्धचा मानस दिसून येऊ लागला.

## अधिस्वीकृती पत्रासाठी जाचक अटी

आता ॲक्रेडिटेशन कार्ड (अधिस्वीकृती पत्र) संदर्भात सरकारने आणलेल्या नियमांबाबत पत्रकार जगतात चर्चा सुरू आहे. हे नियम तत्काळ मागे घेण्यात यावेत, अशी मागणी पत्रकार संघटनांतर्फे गेले महिनाभर होत आहे. केंद्र सरकारतर्फे दरवर्षी ॲक्रेडिटेशन कार्डाचे नूतनीकरण केले जाते. त्याच्यावर पत्रकाराचे छायाचित्र, कोणत्या माध्यमाशी तो सल्लग्न आहे त्याचे नाव, त्याची व पत्र सूचना कार्यालयाच्या महासंचालकाची सही व पाठमोऱ्या भागावर गृह मंत्रालयाच्या मुख्य सुरक्षा अधिकाऱ्याची स्वाक्षरी असते. त्याच्या आधारावर पत्रकाराला सरकारच्या निरनिराळ्या मंत्रालयांमध्ये प्रवेश मिळतो. त्यातून बातमीचे स्त्रोत मिळतात. अधिकाऱ्यांबरोबर सरकारच्या धोरण व निर्णयांबाबत शहानिशा होऊ शकते. सरकारच्या चुका, निर्णयांतील दोष,



तसेच, ते जनहिताचे असल्यास त्यांची माहिती तो वाचकांपुढे आणू शकतो. त्याचा उपयोग सरकारलाही होतो.

## टांगती तलवार ठेवण्यासाठी...

पंतप्रधानांचे कार्यालय आणि संरक्षण मंत्रालयात प्रवेशासाठी या अधिस्वीकृती पत्राचा काही उपयोग नसतो. त्यासाठी वेगळी परवानगी लागते. संरक्षण मंत्रालयासाठी वेगळे ओळखपत्र असते. ते त्याच्या प्रवेशद्वारानजीक असलेल्या पायदळ, नौदल व हवाईदलाच्या माहिती अधिकाऱ्यांच्या कार्यालयापुरते मर्यादित असते. अन्य अधिकाऱ्यांना त्या आधारे भेटता येत नाही. परराष्ट्र मंत्रालयात प्रवेशासाठी पत्र सूचना कार्यालयाचे ओळखपत्र आवश्यक असते. तथापि, अनेक वर्षांपूर्वी त्याचा आधार घेऊन पत्रकारांना सरकारी निवास मिळत असे. ती सोय रद्द झाली आहे. ॲक्रेडिटेशन असेल तर, रेल्वे प्रवासाची सवलतीची कुपन्स पत्रकारांना मिळत. तसेच त्याच्या आधारावर केंद्राच्या आरोग्य सेवेचा लाभ घेता येई; परंतु २०२२ ची अधिस्वीकृती पत्रे देण्याबाबत, त्याचे नूतनीकरण करण्याबाबत पत्र सूचना कार्यालयाने जारी केलेल्या पत्रकात म्हटले आहे, की पत्रकारावर दखली अपराधाचा आरोप असेल तर, देशाच्या सार्वभौमत्व, सुरक्षा व ऐक्याविरूद्ध त्याचे वर्तन असेल तर, अथवा मित्र राष्ट्रांविरोधी त्याची कृती असेल तर व न्यायालयाचा अवमान केला असेल तर, त्याचे अधिस्वीकृती पत्र रद्द केले जाईल. ते देण्यापूर्वी त्याची पोलीस चौकशी करण्याचा उल्लेखही या पत्रकात आहे. हे सारे इतके संदिग्ध आहे, की या सर्वांवर अंकुश कुणाचा असणार, हे स्पष्ट नाही. सार्वभौमत्व, सुरक्षा व ऐक्य म्हणजे नेमके काय, त्याची व्याख्या काय, ते कोण ठरविणार, पोलीस नेमकी काय चौकशी करणार, सरकारच्या दृष्टीने मित्र राष्ट्रे कोणती, हे काहीही स्पष्ट नाही. याचा अर्थ 'हम करे सो कायदा' असेल. दुसरे म्हणजे, न्यायालयाचा 'बदनामीविषक कायदा' (लॉ आफ डिफेमेशन) रद्द करावा, अशी मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. तो कायदा अस्तित्वात असताना ॲक्रेडिटेशनच्या पत्रकातील अटींमध्ये त्याचा समावेश कशासाठी? सार्वभौमत्व, सुरक्षा व ऐक्य यांबाबत निरनिराळे कायदे असताना त्याचा समावेश कशासाठी? याचा उद्देश एकच, की पत्रकारांना अधिस्वीकृती पत्र देताना त्यांच्या डोक्यावर कायमची टांगती तलवार ठेवणे.

## संसदेचे महत्त्व नष्ट होतेय

पत्रकावर विचार करण्यासाठी 'प्रेस क्लब'मध्ये अलीकडेच पत्रकारांच्या अनेक संघटनांची बैठक होऊन पत्रकावर जोरदार टीका झाली. 'एडिटर्स गिल्ड ऑफ इंडिया'च्या बैठकीतही विचार झाला व पत्रकातील 'अटी तत्काळ मागे घेण्यात याव्यात,' अशी मागणी माहितीमंत्री अनुराग ठाकूर यांच्याकडे करण्यात आली. तिला कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. या घटनेआधी संसदेमध्ये पत्रकारांच्या प्रवेशावरही मोदी सरकारने गदा आणली. गेली सत्तर वर्षे ज्येष्ठ पत्रकारांना मिळणारा संसदेच्या सेंट्रल हॉलमधील प्रवेश बंद करण्यात आला. पत्रकार, मंत्री, निरनिराळ्या पक्षांचे नेते यांना भेटण्याचे ते एकमेव ठिकाण होते; परंतु लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, राज्यसभेचे सभाध्यक्ष व उपराष्ट्रपती व्यंकैय्या नायडू यांना पत्र पाठवूनही प्रवेशबंदी कायम आहे. संसदेचे महत्त्व वेगाने नष्ट होत आहे.

## मोदींना शिरसावंद्य मानणाऱ्या नेत्यांचे पीक

इंदिरा गांधी यांनी आणीबाणी लादली होती, तेव्हा बातम्या तपासण्याचे काम (सेन्सॉरशिप -मुद्रण पर्यवेक्षण) पत्र सूचना कार्यालयातील माहिती अधिकारी करीत होते. ते वाटेल तशा बातम्यात काटछाट करायचे. बंगळुरू येथे तुरूंगात असताना भाजपचे ज्येष्ठ नेते व माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्यावर ॲपेन्डिसायटिसची शस्त्रक्रिया सफल झाल्याचे वृत्त दिल्लीला पोहोचले, तेव्हा अनेक पत्रकारांनी बातम्या दिल्या; परंतु त्यावर चक्क फुली मारण्यात आली. त्यावेळी वृत्तपत्र स्वातंत्र्यासाठी पत्रकारांच्या खांद्याला खांदा लाऊन भाजपचे नेते लढले. त्यांना आता त्याचा विसर पडला आहे. लालकृष्ण अडवाणी, सुषमा स्वराज, अरूण जेटली आदी नेते पत्रकारांबरोबर इंदिरा सरकारविरूद्ध लढले. मोदी यांच्या काळात ते सारे कालबाह्य व इतिहासजमा झाले असून नव्या नेत्यांचे सारे पीक मोदींना शिरसावंद्य मानणारे व पत्रकारांना क:पदार्थ मानणारे आहे. त्यामुळे मोदी यांना आपण कसे एकनिष्ठ आहोत, हे दाखविण्यासाठी त्यांच्यात स्पर्धा सुरू असते. त्यांना नवा इतिहास बनवायचा आहे. त्यानुरूप जे वार्तांकन करावयास तयार असतील, ते पत्रकार चांगले व बाकीचे देशद्रोही असा सरळसरळ हिशोब आहे. सरकारच्या धोरणांचे प्रसिद्ध टीकाकार कै. विनोद दुआ यांची सरकारने कशी ससेहोलपट केली, याचे उदाहरण देशापुढे आहे. कर्नाटकात गौरी लंकेश यांचा काटा कसा काढण्यात आला, हेही सर्वश्रुत आहे. अलीकडे बरखा दत्त, निधी राजदान, स्मिता शर्मा, स्वाती चतुर्वेदी आदी अनेक महिला पत्रकारांवर भाजपच्या गोटातील ट्रोल सेनेने किती गलिच्छ व आक्षेपार्ह वैयक्तिक आरोप केले, याचे वृत्त प्रसिद्ध झाले.

## नक्षलवादी कारवायांचे वार्तांकन अवघड

पत्रकारांना वेठीस धरण्याच्या घटनांमध्ये रोज भर पडत आहे. अलीकडे जम्मू-काश्मीरमधील प्रेस क्लबमध्ये पोलीस शिरले. त्यांनी त्याला कुलूप लावले. आता तो सरकारधार्जिण्या पत्रकार गटाकडे जाणार असे स्पष्ट दिसते. दिल्लीच्या प्रेस क्लबवरही सरकारचा डोळा आहे. या क्लबने नव्या इमारतीसाठी जागा मागितली. त्यासाठी लागणारे पैसै भरले, तरी सरकारने अद्याप जागा दिलेली नाही.

पत्रकारांपुढे गेल्या अनेक वर्षांपासून आव्हाने आहेत. उदा. जम्मू-काश्मीरमधील दहशतवाद, इशान्येतील राज्यांतील बंडखोरी, नक्षलप्रवण राज्ये, ग्रामीण व शहरी माफिया व वारंवार नेत्यांकडून वृत्तपत्र मालकांवर येणारा दबाव. काँग्रेसच्या काळात इंडियन एक्सप्रेसचे अध्यक्ष रामनाथ गोयंका, द स्टेट्समनचे मालक सी.आर. इराणी आदींवर जोरदार दबाव येत असे; परंतु त्याला न मानता त्यांनी वृत्तपत्र स्वातंत्र्याची पताका फडकवत ठेवली. जम्मू-काश्मीरमध्ये पत्रकार, दहशतवाद्यांची येणारी फर्माने व दुसरीकडून सरकारचा दबाव यात अडकलेले आहेत. तर इशान्येतील राज्यांत बंडखोर व राज्य सरकार यांच्या धाकदपटशातून पत्रकारांना मार्ग काढावा लागतो. मध्यप्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, तेलंगणा, बिहार या राज्यांतून नक्षलवाद्यांच्या कारवायांचे वार्तांकन करणे अत्यंत जिकिरीचे झाले आहे. काही वर्षांपूर्वी अरूणाचल प्रदेशातील 'अरूणाचल प्रदेश'च्या उपसंपादक श्रीमती तोंगम रीना यांच्यावर बंडखोरांनी प्राणघातक हल्ला केला होता.

## देशभरातच पत्रकारांची मुस्कटदाबी

२०२० मध्ये जागतिक वृत्तपत्र मानांकाच्या अहवालात भारताचा १४२ वा क्रमांक होता. २००२ मध्ये तो ८० होता. यावरून तो किती घसरला आहे, याची कल्पना यावी. एडिटर्स गिल्ड ऑफ इंडियाच्या २०१८ पासून जारी केलेल्या निवेदनांकडे पाहिले, की पत्रकारांवर वाढत गेलेल्या दबावांची कल्पना येते. त्यानुसार, समाजमाध्यमांद्वारे स्पष्ट मत वा वार्तांकन करणाऱ्या पत्रकारांना प्रथम अर्वाच्च शिवीगाळ सुरू झाली. नंतर मारहाणीच्या धमक्या दिल्या जाऊ लागल्या. जम्मू-काश्मीरमधील प्रसिद्ध पत्रकार शुजात बुखारी यांची निर्घृण हत्या झाली. जम्मू-काश्मीरचे आमदार लाल सिंग यांनी काश्मिरी पत्रकारांना धमकावणे सुरू केले. दुसरीकडे, तामिळनाडू सरकारचा प्रसार माध्यमांवरील दबाव वाढला. 'मातृभूमी'च्या उपसंपादकाविरूद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. माध्यमांना वार्तांकन करण्यास प्रतिबंध करणारे आदेश देण्यात येऊ लागले. अगरतळाच्या 'देशर कथा' या दैनिकाची सरकारदरबारी असलेली अधिकृत नोंदणी रद्द करण्यात आली. 'क्विंट' व त्याचे संचालक राघव बहल यांच्याविरूद्ध आयकर खात्याने चौकशी सुरू केली. दांतेवाडा येथे नक्षल हल्ल्यात दूरदर्शनच्या छायाचित्रकाराचा मृत्यू झाला. मेघालय उच्च न्यायालयाने 'शिलाँग टाइम्स'ला नोटीस पाठविली. केरळ सरकारने माध्यमांविरूद्ध जाचक बंधने लादली. 'इ-समय' या बंगाली वृत्तपत्राचे ज्येष्ठ संपादक सुमन बंडोपाध्याय यांना सीबीआयने अटक केली. जम्मू-काश्मीरमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त झालेल्या समारंभात पत्रकारांना प्रवेशबंदी करण्यात आली. कर्नाटकमध्ये जनता दल संयुक्तचे नेते प्रदीप गौडा यांनी कन्नड वृत्तपत्र 'विश्ववाणी' व त्याचे मालक-संपादक विश्वेश्वर भट यांच्याविरूद्ध प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) दाखल केला. प्रशांत कोनजिया व 'नेशन लाईव्ह' संकेतस्थळाच्या प्रमुख इशिता सिंग व अनुज शुक्ला यांना अटक केली. गृहमंत्रालयात (नॉर्थ ब्लॉक) ॲक्रेडिटेड पत्रकारांना विना वेळ मागितल्या (अपॉइंटमेन्ट) शिवाय प्रवेश बंदी करण्यात आली. वस्तूतः ॲक्रेडिटेशन कार्ड असल्यास अपॉइंटमेन्ट घेण्याची काही आवश्यकता नसते. पण हा जाचक नियम लावण्यात आला. जम्मू-काश्मीरमधील इंटरनेट, मोबाईल सेवांवर बंदी घालण्यात आली. तेलगू माध्यमे 'टीव्ही फाय' व 'एबीएन' यांच्यावर अनौपचारिक बंदी घालण्यात आली. आंध्र प्रदेश सचिवालयातील अधिकाऱ्यांना वृत्तपत्रे व माध्यमांवर खटले भरण्याचा अधिकार देण्यात आला. 'प्राग न्यूज'च्या पत्रकारांविरूद्ध हिंसाचार झाला. भाजपच्या सायबर विभागाचे प्रमुख अमित मालविय यांच्या आक्षेपार्ह कृतीची 'एडिटर्स गिल्ड'ने निंदा केली. दिल्लीतील




काही पत्रकारांना मारहाण झाली. कोरोनाविषयक वृत्त देणाऱ्या पत्रकारांच्या कामात पोलिसांनी अडचणी आणल्या, धाकदपटशा केला. 'रिपब्लिक टीव्ही'च्या ज्येष्ठ संपादकांवर हल्ले झाले. अनेक राज्यांतून पत्रकार व माध्यमांविरूद्ध पोलिसी कारवाया सुरू झाल्या. वाराणसी येथे रामनगर पोलिस स्थानकात 'द स्क्रोल' या संकेतस्थळाच्या कार्यकारी संपादक सुप्रिया शर्मा यांच्याविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

## उत्तर प्रदेश सरकारचे दमनतंत्र

माध्यमांविरूद्ध उत्तर प्रदेश सरकारचे दमनतंत्र सुरू आहेच. पोलिस अधिकाऱ्याने दिल्लीच्या प्रसिद्ध 'कॅरव्हान' मासिकाच्या पत्रकारावर हल्ला केला. 'रिपब्लिक टीव्ही'चे संपादक अर्णब गोस्वामी यांना अटक झाली. मणिपूरमधील पत्रकाराला यूएपीए या जाचक कायद्याखाली अटक झाली. ज्येष्ठ पत्रकार प्रणंजय गुहा ठाकुरता यांच्याविरूद्ध अटक वॉरंट जारी करण्यात आला. मनदीप पुनिया या पत्रकाराला सिंघू सीमेवर मारहाण करण्यात आली. पत्रकार सिद्दिक कप्पन याला अटक करून उत्तर प्रदेशमध्ये त्याचा छळ करण्यात आला. दिल्लीतील 'परसेप्शन स्टडीज' या संस्थेनुसार, २२ मार्च २०२० रोजी देशात सुरू झालेल्या टाळेबंदीच्या काळात शंभराहून अधिक पत्रकार मरण पावले. वार्तांकन करीत असताना कोविड-१९ च्या आजाराने ५२ पत्रकार मरण पावले. प्रसिद्ध पत्रकार विनोद दुआ यांची सरकारने केलेली ससेहोलपट व त्यातच झालेला त्यांचा मृत्यू ही एक अतिशय दुःखद घटना आहे. टीव्ही पत्रकार सुलभ श्रीवास्तव याच्या मृत्यूचे गूढ शोधण्यात पोलिंसानी दिरंगाई व चालढकल केली. 'दैनिक भास्कर', 'न्यूज लॉंड्री' व 'न्यूज क्लिक' या संकेतस्थळांविरूद्ध आयकर खात्याचा ससेमिरा सुरू आहे. लखिमपूर खेरीच्या घटनेत टीव्ही पत्रकार रमेश कश्यप याचा मृत्यू झाला. त्रिपुरा सरकारने पत्रकाराविरूद्ध अनेक गुह्यांची नोंद केली. 'पेगॅसस' या तंत्राचा पत्रकारांवर पाळत ठेवण्यासाठी वापर करण्यात आला. ४ फेब्रुवारी २०२२ रोजी जम्मू-काश्मीरच्या पोलिसांनी 'काश्मीर वाला' या वृत्तपत्राचा संपादक फहद शहा याला अटक केली. त्याच्यावर फेक बातम्या दिल्याचा व दहशतवाद्यांचा गौरव केल्याचा आरोप आहे.

## संघर्षासाठी सतत तयार रहावे लागणार

वर नोंदलेल्या घटनांकडे दृष्टिक्षेप टाकल्यास पत्रकार व प्रसार माध्यमांवर होत असलेल्या व झालेल्या दबावाची, हल्ल्याची कल्पना येते. हे सारे देशभर घडत आहे. पत्रकारितेच्या व्यवसायात सेवानिवृत्ती वेतन नसते. त्यामुळे त्याला व कुटुंबाला निवृत्त झाल्यानंतर आयुष्यभर केलेल्या तुटपुंज्या बचतीवर अवलंबून राहावे लागते. अथवा मिळेल तेथे लेखन करून चरितार्थ भागवावा लागतो. पत्रकारितेच्या व्यवसायाचे हे एक वैशिष्ट्य आहे. ज्याला पत्रकार व्हावयाचे आहे, त्याने हा एक प्रोफेशनल हॅझार्ड मानूनच व्यवसायात उतरले पाहिजे. त्यात आता रोज निरनिराळ्या शासकीय व पोलिसी दबावाची भर पडत आहे. सारांश, संघर्षासाठी पत्रकार व माध्यमांना सतत तयार राहावे लागणार आहे. ■■■

**(लेखक दिल्लीस्थित ज्येष्ठ पत्रकार आहेत)**

# रशिया-युक्रेन युद्धाचे जागतिक गंभीर परिणाम





डॉ. विजय खरे

**जगात २२.५ ट्रिलियन एवढी आर्थिक शक्ती व शेजारील राष्ट्राद्वारे कोणताही धोका नसलेला देश व भौगोलिक व राजकीय पातळीवर महत्त्वाचे स्थान असणारा आजचा अमेरिका मात्र भविष्यात नसणार. त्यामुळे जागतिक पातळीवर आता सर्व सामरिक व सुरक्षेचे प्रश्न बदलणार आहेत. जर रशियाने युक्रेनची एकहाती सत्ता बळकावली, तर भविष्यात चीन तैवानवर हल्ला करू शकतो.**

गेल्या काही दिवसांपासून रशिया-युक्रेन यांच्यातील लष्करी संघर्ष, तोफांचा आवाज, युक्रेनमधील वित्तहानी व शरणार्थींचा प्रश्न, भारतातून गेलेल्या विद्यार्थ्यांचा प्रश्न, असे अनेक प्रश्न भारतासह जगाला भेडसावत आहेत. संपूर्ण युरोपाला गव्हाचे भांडार पुरविणारा देश ज्याला 'ब्रेडबास्केट' असे म्हणतात, तो युक्रेन आता पूर्णपणे हताश झालेला होताना दिसत आहे. गव्हासह सूर्यफुले व इतर अन्नधान्यात अग्रेसर असलेल्या देशावर रशियाने आक्रमण केले. रशियाचा नेमका सामरिक हेतू काय आहे? अशा आक्रमणामुळे पुन्हा रशिया दुसऱ्या महायुद्धानंतरचा सोव्हिएत संघ होण्याचा प्रक्रियेत प्रयत्न करतो आहे का? त्याउलट रशियाची दयनीय अवस्था आर्थिक निर्बंधांमुळे होऊ शकते का? रशिया-युक्रेन संघर्षात नाटो व युरोपियन संघ व अमेरिका यांना आपले वर्चस्व का टिकविता येत नाही? या संघर्षाचे रूपांतर तिसऱ्या महायुद्धात होऊ शकते का? आण्विक शस्त्रांच्या मर्यादा पुन्हा आपणास मिळणार का? आण्वीक शस्त्रांचा वापर होऊ शकतो का? जर तसा वापर झाला तर जग खऱ्या अर्थाने तिसऱ्या महायुद्धाकडे जाऊ शकते का? असे अनेक प्रश्न जागतिक पटलावर भारतासह इतर राष्ट्रांना भेडसावत आहेत. येणाऱ्या कालखंडात या युद्धाचे रूपांतर कोणत्या पातळीवर जाईल, हे आता लवकर स्पष्ट होणार आहे; परंतु तोपर्यंत अमेरिका व युरोपियन राष्ट्रांची मुजोरी रशियाने कशी परतवली व

दुसऱ्या महायुद्धानंतर आपल्या भूमीवर कोणतेही युद्ध होणार नाही. सर्व युद्धे हे आखाती प्रांतात, पश्चिम आशियात किंवा दक्षिण व दक्षिण-पूर्व आशियातील राष्ट्रात होतील व त्यासाठी लष्करी साधनसामुग्री तयार करून वरील प्रांतांतील देशांना कमी-जास्त दराने शस्त्रे विकून आपले वर्चस्व आंतरराष्ट्रीय पातळीवर कसे टिकविता येईल, याबाबतचा पद्धतशीर प्रयत्न दुसऱ्या महायुद्धानंतर पाश्चिमात्य राष्ट्रे करीत होते; परंतु रशियाने या युद्धामुळे सर्व युरोपातील सर्व मर्यादा स्पष्ट केलेल्या आहेत.

त्यामुळे एखाद्या लष्करी समूहाकडे आण्विक शस्त्रांसह कितीही लष्करी भांडार असला तरी शस्त्रांच्या मर्यादा आपणास पाहावयास मिळत आहेत. त्यामुळे रशिया-युक्रेन युद्धापासून भारतासह पाकिस्तान व चीनला बरेच काही शिकण्यासारखे आहे.

## रशिया-युक्रेन संघर्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी

रशिया-युक्रेन संघर्षाची ऐतिहासिक पार्श्वभूमी याचा विचार करता पाश्चिमात्य राष्ट्रे व विशेषकरून अमेरिकेचे १९००-२००० पर्यंतची ध्येयधोरणे काय होती, ती पाहणे गरजेचे आहे. १९०० ते २००० या शंभर वर्षांत युरोप, उत्तर-पूर्व आशिया विशेषत: चीन व पर्शियन आखातातील इंधने व इतर नैसर्गिक साधनसामुग्रीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केलेले आहे. अमेरिकेच्या स्वातंत्र्यानंतर १७८३ नंतर युरोपमध्ये सर्वांत जास्त रुची अमेरिकेची होती. २० व्या शतकात युरोपातील जर्मनी व तत्कालीन सोव्हिएत संघ यांचे वर्चस्व वाढलेले होते; परंतु जर्मनीची अवस्था दुसऱ्या महायुद्धामुळे सामरिक पातळीवर नेस्तनाबूत झालेली होती. तत्कालीन सोव्हिएत संघाचे महत्त्व कमी करण्यासाठी अमेरिकेने फ्रांस, जर्मनी, पोलंड, सामरिक भागीदारी करून सोव्हिएत संघाच्या विघटनानंतर अमेरिकेने युक्रेनची भूमी ही दोन महासत्तांमध्ये एक 'बफर' भूमी म्हणून डावपेच आखण्यास सुरुवात केली. सोव्हिएत संघाच्या विघटनानंतर युक्रेन हा सामरिकदृष्ट्या मोठा देश युरोपात उदयास आला; परंतु युक्रेनची स्थापना मुळातच वांशिक वर्गावर आधारलेली आहे. पश्चिम युक्रेनमध्ये युक्रेनियन भाषा बोलणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे व पूर्व युक्रेनमध्ये रशियन बोलणाऱ्यांचे प्रमाण आहे. त्यामुळे २००४ मध्ये युक्रेनमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये पूर्णपणे विभागाला गेला होता. सोप्या भाषेत सांगायचे म्हणजे, पूर्व पाकिस्तान व जो आज बांगलादेश आहे व पश्चिम पाकिस्तान आज पाकिस्तान आहे, तशाच पद्धतीची भाषिक व वांशिक बळावर पूर्व आणि पश्चिम युक्रेन विभागलेला आहे.

२०१० मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीमध्येही युक्रेनमध्ये विविध बदल पाहावयास मिळाले. अमेरिकेच्या आंतरराष्ट्रीय रिपब्लिकन इन्स्टिट्यूट सर्व्हेद्वारे असे जाहीर करण्यात आले, की पश्चिम युक्रेनमधील लोकांना युरोपियन संघात सामील होऊन युरोपियन सुरक्षा कवचाचा फायदा करावयाचा आहे, तर पूर्व युक्रेनमधील लोकांना रशियाचे वर्चस्व मान्य आहे किंबहुना रशियासोबत राहून त्यांचा विकास अधिक गतिशील व्हावा यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## रशिया-युक्रेन युद्धाची कारणे

रशिया-युक्रेन युद्धाची इतर कारणांसह काही महत्त्वाची कारणे आहेत. त्यात पहिले म्हणजे, अमेरिका व युरोपातील काही राष्ट्रे. त्यामध्ये नाटो संघटनेचे सदस्य यांना युक्रेन हे युरोप आणि रशियामधील 'बफर' देश म्हणून कार्यान्वयित व्हावे व युक्रेनने रशियाच्या आधिपत्याखाली कोणतेही निर्णय घेऊ नयेत त्यासाठी काही युद्धनीती, डावपेच रशियाविरुद्ध आखलेली होती. त्यात नाटोची सदस्य संख्या वाढविणे, युरोपियन संघाची सदस्य संख्या वाढविणे व लोकशाहीच्या निमित्ताने 'Orange Revolution' नारंगी क्रांतिला बळकटीकरण करणे. शीतयुद्धाच्या कालखंडात 'नाटोचे' वेगळे महत्त्व होते. नाटो संघटनेच्या कलम चारनुसार 'Collective Security System' 'सामूहिक सुरक्षा पद्धत'ची हमी असल्यामुळे सोव्हिएत संघातून बाहेर पडलेल्या राष्ट्रांना अधिक जवळचे वाटणे स्वाभाविक आहे; परंतु अमेरिकेने नाटोच्या निमित्ताने रशियाला मुद्दामच डिवचण्याचा प्रयत्न शीतयुद्धोत्तर कालखंडात सुरू केलेला होता. 'नाटो' लष्करी संघटनेचे पहिल्यांदा Expansion १९९९ मध्ये करण्यात आले. त्यात पोलंड, चेक रिपब्लिक, हंगेरी या राष्ट्रांना सामावून घेतले व २००४ मध्ये दुसऱ्यांदा नाटोचे Expansion करून बाल्टिक राष्ट्रे त्यात इस्टोनिया, रोमानिया, बल्गेरिया यांना सामावून घेतले.

सोव्हिएत संघाच्या विघटनापूर्वी तत्कालीन सोव्हिएत संघाने १९९० मध्ये अमेरिका व नाटो संघटनेला धमकी दिलेली होती; परंतु नाटोद्वारे लॅटव्हिया, ईस्टोनियामार्फत रशियाच्या उंबरठ्यावर येण्यासाठी आतुर होता व तशा पद्धतीने अमेरिका व नाटो यांनी रशियाला डिवचले. कारण त्या कालखंडात तत्कालीन सोव्हिएत संघात व नंतर रशियात अंतर्गत घडामोडी तीव्रपणे बदलत होत्या. पुढे २००८ मध्ये नाटोची रोमानियाची राजधानी बुकारेस्ट येथे अंतिम अहवाल जाहीर करण्यात आला. त्यामध्ये जॉर्जिया व युक्रेन यांना युरो अटलांटिक Aspiration च्या घोषणेवर दोन्ही राष्ट्रांना नाटोमध्ये सदस्य राष्ट्रे करण्यात येतील, अशी घोषणा करण्यात आली. तत्कालीन रशियाचे उपसंरक्षणमंत्री यांनी तीव्र शब्दांत निषेध नोंदवून अमेरिकेची व नाटो संघटनेची दादागिरी रशिया खपवून घेणार नाही. नाटोमध्ये जर युक्रेन व जॉर्जिया यांना सामावून घेतले, तर ती मोठी 'सामरिक चूक' असणार, असे रशियाने स्पष्ट केले. त्यामुळे या संघर्षाची पाळेमुळे आपल्याला बुकारेस्ट Declaration मध्ये पाहावयास मिळतात.

रशिया-युक्रेन युद्धातील दुसरे कारण म्हणजे, २६ फेब्रुवारी २०१४ मध्ये 'नारंगी क्रांती' 'Orange Revolution' आणि लोकशाहीचे विस्तारीकरण हे होय. यामध्ये २१ नोव्हेंबर २०१३ मध्ये युक्रेनच्या राष्ट्राध्यक्षांना युरोपियन संघात येण्यास नकार दिला; परंतु १ डिसेंबर २०१३ मध्ये त्यांच्याविरोधात मोठे आंदोलन, निदर्शने करण्यात आली. शेवटी युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष देश सोडून पळून गेले. २३ फेब्रुवारी २०१४ मध्ये युक्रेन संसदेने रशियन अल्पसंख्याक लोकांच्या विरोधात कायदे केले. फेब्रुवारी २०१४ मध्ये रशियन सैन्याने क्रिमिया प्रांतावर हल्ला केला. ६ मार्च २०१४ मध्ये क्रिमिया संसदेने रशियासोबत जाण्यासाठी सार्वमत घेतले. १८ मार्च २०१४




मध्ये रशियाने क्रिमियावर पूर्णपणे कब्जा केला. त्यामुळे युक्रेनमधील पूर्व युक्रेनचे रशियन बोलणाऱ्या लोकांना आपल्या प्रांतामध्ये स्वायत्त व त्यांचे प्रश्न निकाली काढण्यासाठी रशियाला मदत करीत होते; परंतु रशियाचे राष्ट्राध्यक्ष हे अतिशय स्मार्ट आहेत. त्यांना युक्रेन नको आहे; परंतु युक्रेन हे 'बफर स्टेट' म्हणून करावयाचे आहे, जो रशियाच्या तालावर चालणारा देश असणार आहे. रशियाची गेल्या दशकात वाढलेली लष्करी व आर्थिक ताकत हा जागतिक पटलावर कुतूहलाचा प्रश्न आहे. कारण राष्ट्राध्यक्ष पुतीन यांनी रशियाला आर्थिक संकटातून पद्धतशीर बाहेर काढलेले आहे.

## पारंपरिक ज्ञानावर आधारलेली व्यवस्था

अमेरिकेला पारंपरिक पद्धतीमध्ये युरोपियन राष्ट्रांचे स्थैर्य व विकास हवा आहे व त्यासोबतच युक्रेन व जॉर्जिया नाटोमध्ये आणण्यासाठी 'लोकशाहीच्या विस्तारीकरणा' ची घोषणा देत होते. पुतीन हे १९०० व्या शतकाचे पुरुष आहेत, तर अमेरिका २१ व्या शतकातील महासत्ता आहे, अशी भावना पाश्चिमात्य राष्ट्रे करीत होती. शिवाय कोणत्याही परिस्थितीत रशियाला व पुतीन यांना धडा शिकवायचा, हाच अमेरिकेचा व युरोपियन राष्ट्रांचा 'Core Strategic Interest' होता. अफगाणिस्तान, इराक, लिबिया याठिकाणी प्रगत राष्ट्रांनी सैन्याचा वापर करून आपल्या वर्चस्ववादाची भूमिका स्पष्ट केलेली आहे; परंतु रशियासोबत मात्र ते करता येणार नाही किंवा तसे शक्य नाही. युरोपियन सुरक्षा प्रामुख्याने फ्रांस, जर्मनी, पोलंड, युक्रेनमार्फत रशिया, अशी स्थापना करण्याचा प्रगत राष्ट्रांचा सामरिक उद्देश आहे; परंतु वास्तववादी दृष्टिकोनामुळे जर विचार केला, तर नाटोचे विस्तारीकरण आता शक्य नाही.

## रशिया-युक्रेनचे युद्धाचे परिणाम

या युद्धामुळे नव्या शीतयुद्धाची सुरुवात आहे, की तिसऱ्या महायुद्धाची आहे, हे आता तरी सांगणे शक्य नाही. तरी मात्र आजचा रशिया हा पूर्णपणे वेगळा आहे. रशिया हा सोव्हिएत संघ नाही हे समजणे गरजेचे आहे. आशिया खंडात अमेरिका महत्त्वाचा आहे की? चीनला प्रतिकार करण्यासाठी Asian Alliance मध्ये अमेरिकेची भूमिका काय असणार आहे. आजही अमेरिकेचे सामरिक महत्त्व आहे. जगात २२.५ ट्रिलियन एवढी आर्थिक शक्ती व शेजारील राष्ट्राद्वारे कोणताही धोका नसलेला देश व भौगोलिक व राजकीय पातळीवर महत्त्वाचे स्थान असणारा आजचा अमेरिका मात्र भविष्यात नसणार. त्यामुळे जागतिक पातळीवर आता सर्व सामरिक व सुरक्षेचे प्रश्न बदलणार आहेत. जर रशियाने युक्रेनची एकहाती सत्ता बळकावली, तर भविष्यात चीन तैवानवर हल्ला करू शकतो.

त्या वेळेससुद्धा अमेरिकेची भूमिका कशी असणार आहे, अशा प्रश्नांची उत्तरे आज देता येत नाहीत; परंतु रशिया-युक्रेन युद्धामुळे मात्र तिसऱ्या जगाला व भारतासह विकसनशील राष्ट्रांना आपल्या सुरक्षेसाठी अधिकची क्षेपणास्त्रे, सैनिक व साधनसामुग्री विकत घ्यावी लागणार आहे, त्याचा फायदा पुन्हा अमेरिकेला होणार आहे. आजही भारताकडे जी लष्करी साधनसामुग्री आहे, त्यात रशियाचा जवळपास ६५% एवढा सहभाग आहे. पुढील काळात आपण अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया व भारत यांची जी लष्करी मैत्री आहे त्यात चीन काय भूमिका घेतो, यावर जागतिक सुरक्षेचे प्रश्न उभे राहणार आहेत. त्यामुळे रशिया-युक्रेन संघर्षाचे परिणाम जसे रशियाला लांब पल्ल्याच्या धोरणाबाबत अमेरिका व इतर प्रगत राष्ट्रांनी लावलेल्या आर्थिक निर्बंधांमुळे रशिया निरंतर काळासाठी 'आर्थिक नाकेबंदी' करू शकते; परंतु आज तरी रशिया त्याला मान्यता देणार नाही; परंतु त्याचा परिणाम जागतिक आर्थिक विकासावर निश्चितच दिसणार नाही. ■■■

**(लेखक सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात संरक्षण आणि सामरिकशास्त्र विभागाचे विभागप्रमुख आहेत.)**

# अस्वस्थ शेजारी...

**पाकिस्तान असो नाही तर श्रीलंका, म्यानमार असो नाही तर बांगला देश या सगळ्यांवर आपला प्रभाव टाकणे, आर्थिक मदतीने त्यांना मिंधे करत आपल्याकडे वळवणे आणि त्याचा भारतविरोधासाठी वापर करणे, हे चीनचे धोरण राहिले आहे. त्यामुळे आपणही त्याला ठोशास ठोसा उतर देत वाटचाल केली पाहिजे, हेच खरे.**

भास्कर नाशिककर

वर्तमान अस्वस्थ असले, की स्थैर्याला आणि शांततेला सुरुंग लागत असतो. अराजकतेला आमंत्रण मिळत असते. त्याने बेबनाव वाढून हिंसक, अप्रिय घटना वाढू लागतात. भारत आणि त्याचे शेजारी यांच्याकडे नजर टाकली तरी या परिस्थितीचे प्रत्यंतर येत आहे. म्यानमारमध्ये लष्कराने लोकशाही प्रक्रियेने निवडून आलेल्यांच्या हाती सत्तेची सूत्रे पुन्हा सोपवण्याऐवजी त्यांनाच तुरुंगात टाकून दडपशाही राबवली आहे. लोकशाहीचा गळा घोटला गेला आहे. त्याविरोधात सातत्याने आंदोलने सुरू आहेत. शेकडो बळी गेले तरी लष्कराची पकड ढिली होत नाही. बांगलादेशात आगामी काळात निवडणुका आहेत. गेल्या काही महिन्यांपासून तिथे हिंदूंच्या विरोधात आगळिकी घडत आहेत. या सगळ्यावर कळस करणारी स्थिती सध्या आपल्या उत्तरेला असलेल्या पाकिस्तानात आणि दक्षिण टोकाला वसलेल्या श्रीलंकेत आहे. म्यानमार आणि बांगला देशच्या तुलनेत पाकिस्तान आणि श्रीलंका या दोन देशांतील स्थिती आणि घडामोडींवर आगामी काळात बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. पाकिस्तानातील घडामोडींनी उत्तर सीमेवर विशेषतः काश्मिरातील स्थितीवर बारकाईने नजर ठेवावी लागेल, तर श्रीलंकेतील दिवाळखोरीने निर्वासितांचे लोंढे तामिळनाडू आणि केरळ यांच्या किनाऱ्यावर आदळू लागले आहेत. त्यामुळे परिस्थिती चिघळू नये, याकडे लक्ष द्यावे लागेल.

## पाकिस्तानचे तेविसावे पंतप्रधान

पाकिस्तानात २०१८ मध्ये पंतप्रधान झालेले क्रिकेटपटू इम्रान खान यांना संसदेतील अविश्वास ठरावाद्वारे पदावरून दूर करण्यात आले असून, त्यांच्या जागी पाकिस्तान मुस्लीम लीगचे (एन), पाकिस्तानातील पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री राहिलेले आणि माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांचे बंधू शाहबाज शरीफ यांची पाकिस्तानचे तेविसावे पंतप्रधान म्हणून निवड झाली आहे. अर्थात, इम्रान खान यांनी पाकिस्तानला जिथे नेऊन ठेवले आहे, तिथूनच शाहबाज खान यांना आपल्या कारकीर्दीची सुरुवात करावी लागणार आहे. अर्थकारणाचा ढासळलेला डोलारा सावरण्यापासून ते अमेरिकेसारखा



गमावलेला मित्र परत मिळवण्यापर्यंत अनेक आघाड्यांवर शर्थीचे प्रयत्न करून पाकिस्तानचे जनजीवन पूर्वपदावर आणावे लागणार आहे. इम्रान खान यांच्या या गच्छंतीने इतिहासात नवी नोंद झाली आहे. ती म्हणजे, पाकिस्तानातील पंतप्रधान हा लोकशाही मार्गाने पदावरून हटवला गेला, अशी वेळ आतापर्यंतच्या कुठल्याच पाकिस्तानी पंतप्रधानावर आलेली नव्हती. इम्रान केवळ ४५ महिनेच आपल्या पदावर राहिले.

## पाकिस्तानचा विकासात अपयशी

यानिमित्ताने एक मात्र खरे, की पुन्हा एकदा पाकिस्तानात कोणीही आपली पंतप्रधानपदाची कारकीर्द पूर्णपणे पार पाडू शकत नाही, हे सिद्ध झाले आहे. नया पाकिस्तानचा नारा देत प्रचार केलेल्या इम्रान खान यांना पाकिस्तानचा कायापालट करायचा होता. तथापि, ते सपशेल अपयशी ठरल्याचेच सिद्ध झाले आहे. २०१८ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत पाकिस्तान तेहरिक-ए-इन्साफ (पीटीआय) या त्यांच्या पक्षाला सर्वाधिक १५५ जागा मिळाल्या, पाकिस्तान मुस्लीम लीग कैद-ए-आझम (पीएमएल-क्यू), एमक्यूएम आणि बलुचिस्तानातील पक्ष यांची मोट बांधून इम्रान खान सत्तेवर आले; पण त्याला काळी किनार होती ती लष्कराच्या घेतलेल्या कुबड्या आणि त्याच्या हस्तक्षेपाने सत्तेवर येण्याबाबत झालेल्या तथ्यांश असलेल्या आरोपांची. मात्र, याच लष्कराशी

इम्रान यांनी पंगाही घेतला. गुप्तचर संघटना आयएसआयच्या प्रमुखपदी नदीम अंजूम यांना तत्कालीन लष्करप्रमुख कमर जावेद बाजवा यांना आणायचे होते, तर इम्रान यांना लेफ्टनंट जनरल फैज हमीद यांना आणायचे होते. एवढेच नव्हे तर बाजवा यांना मुदतवाढीचे प्रकरणही सर्वोच्च न्यायालयामध्ये पोहोचले, मग त्यांना मुदतवाढ मिळाली. लष्कर हेच पाकिस्तानच्या धोरणाची, विशेषतः संरक्षण आणि परराष्ट्र व्यवहार यांची दिशा ठरवत असते. त्याच्याशी इम्रान खान यांचे संबंध दुरावले. अफगाणिस्तानात तालिबान सत्तेवर आले. त्यामागे पाकिस्तानी लष्कर होते. मात्र, नंतरच्या काळात तालिबान्यांवर पाकिस्तानचा हवा तसा अंकुश राहिलेला नाही.

## इम्रान खान यांचे नेतृत्व पडले खुजे

मुळात इम्रान खान हे पाकिस्तानच्या राजकारणात घराणेशाही असलेला पाकिस्तान पीपल्स पार्टी आणि पाकिस्तान मुस्लीम लीग (एन) यांना पर्याय देण्यासाठी राजकारणात आले. २००२ मध्ये केवळ दोन असलेला त्यांचा पीटीआय २०१८ मध्ये १५५ जागा मिळवू शकला. आजही सत्तेपासून दूर गेलेल्या इम्रान खान यांची लोकप्रियता कायम आहे. तरीही ते पाकिस्तानच्या एकूण प्रशासनाला, राजकारणाला आणि अर्थकारणाला भरीव दिशा देऊ शकले नाहीत. या अपयशाची किंमत त्यांना मोजावी लागली, हेच खरे आहे. आजघडीला पाकिस्तानवर ९१ अब्ज डॉलरचे कर्ज आहे. दहशतवाद्यांना थारा दिल्याने त्याला परकी मदत, तसेच वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळण्याचे अनेक मार्ग बंद झालेले आहेत. नाहीतर जादा दराने कर्ज उभारावे लागणार आहे. परिणामी, महागाईने पाकिस्तानात कळस गाठला आहे. लोकांचे जगणे महाग झाले आहे. त्यात कोरोनाच्या महामारीने भर घातली. गरिबांना ५० लाख घरे देण्याचे स्वप्न इम्रान खान यांनी दाखवले तेही ते पूर्ण करू शकले नाहीत. चीन आणि सौदी अरेबिया यांच्याकडून कर्जाची उभारणी केली; पण त्याने सुसह्य होण्याऐवजी आर्थिक ताण वाढत गेला. नया पाकिस्तानचे स्वप्न इम्रान खान यांनी दाखवल्याने युवक वर्ग त्यांच्याकडे वळला होता. त्याचीही त्यांनी घोर निराशा केली. धार्मिकवादाला त्यांनी अग्रक्रम दिला. चीन आणि रशिया यांच्याशी संग करत अमेरिकेला काहीसे दूर सारण्याचाही प्रयत्न इम्रान खान यांनी केला. रशियाने युक्रेनवर २४ फेब्रुवारीला हल्ला केला तेव्हा इम्रान खान मास्कोत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांची भेट घेत होते. कोणताही देश हा खंबीर, ठोस नेतृत्व आणि प्रशासनावर मांड असलेल्या नेत्याच्या मार्गदर्शनाखाली पुढे जात असतो. नेमक्या याचठिकाणी इम्रान खान यांचे नेतृत्व खुजे पडले.

## ...म्हणून इम्रान हटाव मोहिमेला धार येत गेली

इम्रान खान यांच्या कार्यपद्धतीविरोधात बिलावल भुट्टो, असीफ अली इरदारी यांच्या नेतृत्वाखालील पाकिस्तान पीपल्स पार्टी, मरियम नवाज शरीफ यांच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान मुस्लीम लीग अशा बीसवर पक्षांनी २०२० मध्ये जंगी आंदोलने करून जनतेतील खदखद व्यक्त केली होती. त्याचा बोध इम्रान खान यांनी घेतला असता तरी त्यांना खुर्ची वाचवणे जमले असते. तथापि, आपल्याच स्वप्नविश्वात वावरणारे इम्रान यांनी कार्यपद्धतीत बदल केला नाही. उलट ते चीन आणि रशिया या दोघांच्या अधिक कच्छपी लागले. याच काळात कराल दहशतवाद कायम राहिला. त्यामुळेच इम्रान खान यांच्या विरोधकांना त्यांच्या विरोधात एकत्र येणे भाग पडले. एवढेच नव्हे, तर त्यांच्याच पक्षातील पंचवीस सदस्यांनी विरोधकांशी हातमिळवणी केली. या सगळ्यांचा परिणाम म्हणून इम्रान हटाव मोहिमेला धार येत गेली. विरोधकांनी १४ मार्चला त्यांच्यावर अविश्वास दाखल केला. त्याला गुंगारा देण्याचे राजकीय आणि न्यायालयीन लढाईतून इम्रान खान यांनी प्रयत्न केले. सत्तेसाठी सगळ्या खटपटी करत असताना मुळात लष्करशाहीचा वरचष्मा असलेल्या पाकिस्तानातील लोकशाही मजबूत करण्याऐवजी तिची मोडतोड करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. लोकशाही मूल्ये आणि न्यायालयीन प्रक्रियेवर विश्वासाची भाषा करत असतानाच नेमकी त्याच्या विरोधी कृती इम्रान खान शेवटपर्यंत करत राहिले. क्रिकेटपटू म्हणून ते शेवटच्या चेंडूप्रमाणे, शेवटपर्यंत विरोधकांशी दोन हात करतील, असे वाटत असताना रणांगणातून त्यांनी पळ काढला. त्यामुळेच पाकिस्तानची बेअदबी झाली. अखेरीस विरोधकांना रात्रीचा दिवस करून ३४२ सदस्यांच्या नॅशनल असेंब्लीची बैठक, अध्यक्ष, उपाध्यक्षांनी राजीनामा दिल्याने, पर्यायी व्यवस्थेत घ्यायला लागून १७४ मतांनी इम्रान खान यांना पदच्युत करावे लागेल. त्यांच्या नावावर हीदेखील इतिहासात नोंद झाली आहे. अशा प्रकारे संसदीय कामकाज प्रक्रियेतून अविश्वासाद्वारे पंतप्रधान पदावरून जावे लागलेले ते पहिले पंतप्रधान ठरले आहेत.

खुर्ची वाचवण्यासाठी इम्रान खान यांनी अनेक कोलांटउड्या मारल्या. अमेरिकेचे नाव घेत महासत्ता आपली खुर्ची धोक्यात आणत आहे, असा दावा केला. भारताचे लष्कर, त्याची अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण यांचेही अखेरच्या टप्प्यात कौतुक केले. तरीही इम्रान खान पंतप्रधान पदावरून गेले, हेच खरे आहे. इम्रान खान यांच्या जागी पाकिस्तान मुस्लीम लीगचे नेते शाहबाज शरीफ येणार, हे निश्चित मानले जात होते. ते पाकिस्तानातील पंजाब प्रांताचे मुख्यमंत्री होते, ते कुशल प्रशासक आहेत. त्यांचे आणि लष्कराचे सूत अधिक चांगले जमलेले आहे. सत्तेची खुर्ची दिसू लागताच, पाकिस्तानी राज्यकर्त्यांप्रमाणे भारतविरोधात काश्मीर मुद्यावरून राग आळवला आहे. हेदेखील खरे आहे. मात्र, इम्रान खान नको या मुद्यावर एकत्र आलेले पाकिस्तानातील पाकिस्तान मुस्लीम लीग आणि पाकिस्तान पीपल्स पार्टी हे कट्टर विरोधक एकाचवेळी सत्ता कशी उपभोगतील, हा प्रश्न आहे. पाकिस्तानातील सार्वत्रिक निवडणुकीला अजून १६ महिने बाकी आहेत. तोपर्यंत या पक्षांची मोट एकत्र राहणे अधिक कठीण वाटते आहे. त्यामुळे सत्तेवर आलेले शाहबाज शरीफ त्यांचे सरकार काळजीवाहू स्वरूपाचं राहण्याची शक्यता अधिक वाटते आहे. कारण बिलावल भुट्टो यांनाही सत्तेचा सोपान आपल्या मार्गाने मिळवण्याची इच्छा होतीच ना. एक मात्र खरे, की पाकिस्तानातील या घडामोडी आपल्यावर किती परिणाम करतात, सध्याच्या सत्ताधाऱ्यांचे भारताबाबत काय धोरण राहते आहे, हे अधिक काटेकोरपणे तपासत राहावे लागणार आहे. कारण जेव्हा पाकिस्तानात अस्थैर्य माजते तेव्हा धर्म, भारत, काश्मीर अशा

बाबींची आठवण तेथील राज्यकर्त्यांना येत असते. त्यामुळे सावध, पाकिस्तानातील सत्तांतरावर लक्ष राहूद्या, असेच म्हटले पाहिजे.

## दिवाळखोर श्रीलंका

पाकिस्तानातील राजकीय धुळवड परिवर्तनाकडे वाटचाल करत असतानाच दक्षिणेतील चीनच्या कच्छपी लागलेला आणखी एक आपला शेजारी देश दिवाळखोर बनला आहे. त्याचे नाव श्रीलंका. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंग यांचा बेल्ट अँड रोड असा अतिशय महत्त्वाकांक्षी असा उपक्रम आहे. जगभरातील १९५ देशांत १३ हजारांवर पायाभूत सुविधांचे ८०० अब्ज डॉलरवरील रकमेचे प्रकल्प त्याअंतर्गत राबवले जात आहेत. याच उपक्रमातून श्रीलंकेतील हमनबोटा बंदराचा, तसेच राजपक्षे विमानतळाचा विकास केला गेला आणि पर्यटनावर अवलंबून असलेला श्रीलंका चीनमुळे आज देशोधडीला लागला आहे. या हमनबोटाप्रमाणेच चीनने पाकिस्तानातील ग्वादर बंदराचा विकास करून पाकव्याप्त काश्मिरातून चीन-पाकिस्तान इकॉनामिक कॉरिडॉर ६० अब्ज डॉलर खर्चून विकसित केला आहे. आफ्रिकेतील जिबूती बंदर विकसित केले आहे. चीनचा हा उपक्रम म्हणजे गरीब, अविकसित, अल्प उत्पन्नाच्या देशांकरता कर्जाचा सापळा मानला जात आहे. श्रीलंका या कर्जाच्या सापळ्यात पुरता रुतून बसलेला आहे. आजमितीला श्रीलंका सरकारच्या एकूण उत्पन्नाच्या ९५ टक्के रक्कम कर्जाच्या व्याजापोटी अदा करावी लागत आहे. त्यामुळे त्याची पुरती वाताहत झाली आहे.

श्रीलंका मुळात तामिळ फुटीरतावाद्यांच्या उपद्रवाने गांजला होता. त्यांचा निःपात केला गेला. त्यानंतर तिथल्या राज्यकर्त्यांनी विकासाचे गाजर दाखवत चीनकडून पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वारेमाप कर्ज घेतले. प्रकल्पाकरता स्वतःचा वाटा घालण्यासाठीही कर्ज घेतले. त्यामुळेच चीन आणि जपान यांचे प्रत्येकी १० टक्के कर्ज श्रीलंकेवर असूनही, जपानपेक्षा चिनी कर्जाची दाहकता अधिक व्यापक आहे.

श्रीलंकेत गोटाबाया राजपक्षे अध्यक्ष आहेत. त्यांचे बंधू महिंद राजपक्षे पंतप्रधान, बासील राजपक्षे अर्थमंत्री, असे सुमारे ४५ नातेवाईक श्रीलंकेच्या सरकारात विविध पदांवर होते. थोडक्यात, तिथे घराणेशाही नांदत होती. तथापि, या घराणेशाहीनेच श्रीलंकेच्या अर्थकारणाचा गळा घोटला आहे. त्यामुळेच सगळ्या राजपक्षे कुटुंबीयांनी आणि नातेवाइकांनी सत्तेपासून दूर जाऊनही श्रीलंकेतील आर्थिक समस्येची तीव्रता कायम आहे. त्यात तेथील सामान्य माणसाची अतोनात होरपळ होत आहे. दिवस-दिवस तेथील जनतेला स्वयंपाकाचा गॅस, पेट्रोल, डिझेल, जीवनावश्यक वस्तू, डाळ, तांदूळ याच्यासाठी भटकावे लागत आहे. श्रीलंकेतील चलनाचे गेल्या काही महिन्यांत अवमूल्यन झाल्याने दुधाची पावडर, इंधन, तांदूळ यांच्यासाठी कितीतरी पट रक्कम मोजावी लागत आहे. ते देऊनही वस्तू मिळतील, याची शाश्वती नाही. श्रीलंकेत जगणे महाग झाल्याने वरचेवर जनतेत संतापाचा उद्रेक होतो आहे. त्याची तीव्रता लक्षात घेऊन देशाच्या २६ मंत्र्यांनी एकावेळी राजीनामे दिले. त्यानंतर ज्याला अध्यक्ष गोटाबाया राजपक्षेंनी अर्थमंत्री केले, त्यांनी परिस्थिती लक्षात घेऊन २४ तासांत पदाचा राजीनामा दिला. एवढे सगळे श्रीलंकेतील अर्थकारणाच्या आणि सामान्य नागरिकांच्या मुळावर उठले आहेत. त्याची विषारी फळे तेथील जनता चाखत आहे. श्रीलंकेतील ही परिस्थिती आणि आर्थिक अरिष्ट संपवण्यासाठी सरधोपट मार्गाऐवजी कल्पक उपाय योजले, तरच आगामी काही वर्षांत त्यावर मात करणे शक्य होणार आहे.

## कर्जाचा डोंगर : देश अडचणीत

श्रीलंकेवर आलेल्या या आपत्तीमागे कारणे खूप आहेत. सगळ्यात महत्त्वाचे कारण म्हणजे लोकानुनयाची परिसीमा गाठणे. अनुदानाची सवय जनतेला लावत असताना सरकारी तिजोरीचा तेथील राज्यकर्त्यांनी परिणामांचा विचारच केला नाही. गोटाबायांनी अध्यक्षीय निवडणूक लढताना व्यापक करसवलतीचे आमिष दाखवले आणि सत्तेवर येताच प्रत्यक्षात उतरवले. सेंद्रिय शेतीतून किती उत्पन्न येते, रासायनिक खतांची मात्रा पिकांना बंद केल्यास काय परिणाम होतील, याची कल्पना न करता सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन दिले. बंदरात आलेले रासायनिक खत परत पाठवले. शेतमालाचे उत्पन्न सेंद्रिय शेतीच्या निर्णयाने घटले आणि डोक्याला हात लावण्याची वेळ आली. ऐपत नसताना चिनी कर्जाचा डोंगर उभा करून देशवासीयांना त्यांनी अडचणीत आणले. श्रीलंकेत बहुतांश वस्तू आयात केल्या जातात. तिथला निर्मिती उद्योग जेमतेम आहे. कोरोनाची महामारी आणि त्याआधी ईस्टर संडेला झालेल्या स्फोटाने दाखवून दिलेला दहशतवादाचा चेहरा यामुळे ज्या पर्यटन उद्योगावर श्रीलंकेच्या अर्थकारणाचा डोलारा आहे, तो अद्याप कोसळलेलाच आहे. त्यातून हा उद्योग बाहेरच पडलेला नाही. त्यामुळे श्रीलंकेच्या अर्थकारणाची अवस्था एका जागी थिजल्यासारखी झालेली आहे.

श्रीलंका चीनच्या कच्छपी लागून अडचणीत आला असताना, भारताने त्याला शेजारधर्म म्हणून मदतीचा ओघ सुरू केला आहे. औषधे, तांदूळ, इंधन असे सगळे पाठवणे सुरू केले आहे. सुमारे एक अब्ज डॉलरची वस्तुरूपाने मदत आणि तेवढ्याच रकमेची पतहमी आपण देऊ केली आहे. परराष्ट्रमंत्री जयशंकर यांनी श्रीलंकेला भेट देऊन आणखी सहकार्य वाढवण्यावर भर दिला आहे. कोल्ह्याच्या नीतीने वागणाऱ्या चीननेही मदतीचा हात दिला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा श्रीलंकेवर प्रभाव कोणाचा हा प्रश्न येऊ शकतो. राजपक्षे सातत्याने चीनच्या कच्छपी लागलेले आहेत. तरीही शेजारधर्म आणि तेथील परिस्थितीचे परिणाम भारताला भोगावे लागू नयेत, तसेच आपला प्रभाव कायम राहावा, यासाठी धोरणात्मक व्यूहरचना आखून आपल्याला वाटचाल करावी लागणार आहे.

पाकिस्तान असो नाही तर श्रीलंका, म्यानमार असो नाही तर बांगला देश या सगळ्यांवर आपला प्रभाव टाकणे, आर्थिक मदतीने त्यांना मिंधे करत आपल्याकडे वळवणे आणि त्याचा भारतविरोधासाठी वापर करणे, हे चीनचे धोरण राहिले आहे. त्यामुळे आपणही त्याला ठोशास ठोस उत्तर देत वाटचाल केली पाहिजे, हेच खरे. ■■■

**(लेखक समकालिन विषयाचे अभ्यासक आहेत.)**

# शिव्या



**काहींच्या तोंडी शिव्या या सहजपणे येत असतात. त्यांच्या संवादशैलीचा तो भागच होऊन जातो. त्याच्या मुळात ना दुःख असते, ना श्रेष्ठत्वाची भावना, ना अपमान करण्याची वृत्ती. त्यांची बोलण्याची शैलीच तशी असते. आयला, मायला वगैरे.**



प्रा. डॉ. सूर्यनारायण रणसुभे

जगातील प्रत्येक भाषेत शिव्या या असतातच. शिव्यांचा संबंध जीवंत अशा माणसाच्या अभिव्यक्तीशी निगडीत असतात आणि हा माणूस सर्व ठिकाणी कमी-अधिक प्रमाणात सारखाच असतो. शब्द हे कधीच श्लील किंवा अश्लील नसतात, तर ते उच्चारणाऱ्याच्या व ऐकणाऱ्याच्या भाषिक संस्कारातून श्लील-अश्लील ठरवले जात असतात. एका भाषेतील शब्द दुसऱ्या भाषेत अश्लील समजला जात असतो. उदाहरणार्थ, कुंडी हा मराठीत श्लील तर कन्नडमध्ये अश्लील समजला जातो. शिव्या त्याज्य मानल्या जातात, कारण त्यात अश्लील शब्दांचा वापर केलेला असतो.

## शिव्यांचे मानसशास्त्र काय असावे?

भाषेत शिव्या कोणत्या कारणामुळे तयार होतात? कोणत्या मनःस्थितीतून माणसे शिव्या देत असतात? शिव्यांचा संबंध माणसाच्या सर्वात संवेदनशील अशा व्यक्तीशी का म्हणून असतो? आई आणि बहिणीशी संबंधित शिव्या का असतात? पुरुषांच्या तोंडीच शिव्या का असतात? अर्थात, शिव्यांचे मानसशास्त्र काय असावे? असे अनेक प्रश्न माझ्या मनात कित्येक वर्षापासून उभे आहेत. एखाद्या शब्दाची निंदा केली जाऊ लागली, की इतर त्या शब्दांच्या वाटेला जात नसतात. एक पवित्रतावादी दृष्टिकोन समाजात हळूहळू तयार होत जातो. पण अभ्यासकाला असा पवित्रतावादी दृष्टिकोन घेऊन चालत नाही, तर कोणत्याही गोष्टीकडे, मानवी स्वभावाकडे त्याला तटस्थपणे पाहावे लागते. त्या विषयाचा त्याला मुळातून शोध घ्यायचा असतो.

जवळपास चाळीस-पंचेचाळीस वर्षांपूर्वी मराठवाडा साहित्य परिषदेच्या एका खाजगी बैठकीत नरहर कुरुंदकर यांच्या उपस्थितीत रा.चिं. ढेरे यांनी एक शोधनिबंध वाचला होता. विषय होता, गाढवाच्या लिंगाशी संबंधित मराठीतील शिव्यांचा सांस्कृतिक-भाषिक व ऐतिहासिक अभ्यास. श्रोत्यात मीही होतो. त्या शोधनिबंधात महाराष्ट्राच्या विविध भागांमध्ये गाढवाच्या लिंगाशी संबंधित ज्या विविध शिव्या आहेत, त्याचा खूप गंभीर असा अभ्यास सादर करण्यात आलेला होता. त्याच दिवशी माझ्या लक्षात आले, की अभ्यासकाला कुठलाच विषय वर्ज्य नसतो.

## लहानपणापासूनच शिव्या कानावर पडायच्या

शिव्यासंबंधी उपरोक्त अनेक प्रश्न माझ्या मनात निर्माण झाले. त्याच्या मुळात मी लहानपणापासून ते वयाच्या एकविसाव्या वर्षापर्यंत ज्या वातावरणात, ज्या चाळीत जगलो ते जीवन कारणीभूत आहे. या चाळीत समाजातील उपेक्षित असे मजूर व निरनिराळ्या तथाकथित उपेक्षित व्यवसायांतील कुटुंबे राहत असत. न्हावी, शिंपी, चांभार, चौकीदार, खाटीक वगैरे सर्व जाती-धर्मातील अशिक्षित तेथे रहात. दिवसभर काम केल्यानंतर संध्याकाळी ताडी पिऊन ही मंडळी अगदी क्षुल्लक कारणावरून एकमेकांशी जोरात भांडायची. एकमेकांना भयंकर शिव्या द्यायचे. एकमेकांच्या बायकांच्या अंगप्रत्यंगाशी संबंधित या शिव्या असायच्या. त्यांच्या बायकांच्या उपस्थितीतच त्या शिव्या द्यायच्या आणि असे बरेच वेळ चालायचे. या शिव्या दखनी हिंदीतून असायचे. कारण ही सर्व मंडळी विविध भाषिक होती. त्यामुळे त्या चाळीत दखनी हिंदी व्यवहाराची भाषा झाली होती. लहानपणापासून या भयंकर अशा शिव्या माझ्या कानावर पडत गेल्या. एकाच गोष्टीचे मला आश्चर्य नंतरच्या काळात वाटू लागले, की एवढ्या भयंकर शिव्या दिल्यानंतर खरे तर एकमेकांच्या संबंधात एकमेकांबद्दल दुरावा निर्माण व्हावयास हवा. पण दुसऱ्या दिवशी त्या ताडीच्या नशेतून बाहेर आल्यानंतर ही मंडळी एकमेकांच्या मदतीसाठी धावत असायची, हेही मी पाहिले आहे. नंतरच्या काळात मी शिव्यांबद्दल तटस्थपणे विचार करू लागलो, त्यावेळी मला यातून अनेक गोष्टींचा उलगडा होऊ लागला. निमित्त झाले ते रा.चिं. ढेरे यांचा तो शोधालेख.

## अनेक कारणांनी दिल्या जातात शिव्या

शिव्या केवळ समोरच्या व्यक्तीचा अपमान करण्यासाठी दिल्या जात नाहीत, तर आपले दुःख व्यक्त करण्यासाठीदेखील शिव्या दिल्या जातात. खेड्यातील मजुरी करून पोट भरणारी बाई, मद्यपी

नवऱ्यामुळे वैतागलेली. ज्यावेळी तिची निरागस मुलगी पीठ किंवा तेल किंवा धान्य यापैकी कोणता तरी खाद्यपदार्थ अजाणतेपणे मातीत मिसळते, तेव्हा ही बाई आपल्या या मुलीस अत्यंत घाणेरड्या शिव्या देते. दुःखाचा हा आवेग उतरल्यानंतर ती त्याच मुलीला पोटाशी धरून पुन्हा रडू लागते. अशा प्रकारचे दृश्य मजुरांच्या वस्तीत दिसत असते, तर येथे शिव्यांचे प्रयोजन केवळ दुःख व्यक्त करण्यापर्यंतच मर्यादित असते. शिव्यांना एक वर्गीय पदरदेखील असतो. श्रीमंत माणूस ज्यावेळी आपल्या कामाचा योग्य मोबदला मजुराला देत नाही किंवा तो मजूर ज्यावेळी फसवला जातो, त्यावेळी तो त्या व्यक्तीस वाट्टेल तशा घाणेरड्या शिव्या देतो, त्याच्या अनुपस्थितीत किंवा त्याच्या पस्थितीतदेखील. कारण आपले शोषण झाले आहे हे व्यक्त करण्यासाठी दुबळ्या माणसाजवळ शिव्याशिवाय दुसरे कोणतेही शस्त्र नसते. शिव्या समोरच्याचा अपमान करण्यासाठीदेखील दिल्या जातात. शिव्यांना व्यवस्थेचादेखील पदर असतो. शेकडो वर्षांपासून हे सवर्ण दलितांना शिव्या देऊनच बोलवत असत किंवा बोलता बोलता त्याला शिवी हासडत. खालच्या जातीच्या स्त्रीकडे पाहून घाणेरड्या शिव्या देत असत. मात्र सवर्ण स्त्री कितीही चालू असली तरी त्यांच्या तोंडून कधीच तिच्यासाठी शिव्या येत नसत. हा किंवा ही माझे काहीच करू शकत नाहीत असा विश्वास झाला, की मग शिव्या दिल्या जातात.

## दलित साहित्यात झाला भरपूर वापर

सुरुवातीच्या दलित साहित्यात शिव्यांचा वापर भरपूर केला जात होता. त्यामुळे या साहित्यावर हिंदीत खूप टीका होत होती. त्यावेळी मी एक लेख लिहून याचा प्रतिवाद केला, की शेवटी दलित जीवनात या शिव्या येतात तरी कोठून? तर त्यांच्यापर्यंत शिव्या घेऊन गेले सवर्ण. ते दलितांशी कधीही सन्मानपूर्वक शब्दात बोलले नाहीत. संवादाची सुरुवात शिव्यांनी व्हायची. तर या शिव्या सवर्णांकडूनच त्यांच्यापर्यंत आलेल्या आहेत. मुख्य आरोपी सवर्णच आहेत. दलितांनी सवर्णांकडून आलेल्या शिव्या पिढ्यान्‌पिढ्या जपून ठेवल्या. सवर्णांची भाषिक संपत्ती त्यांनी सुरक्षित ठेवली म्हणून त्यांचे कौतुक करावे. कौतुक तर दूर राहिले, त्या साहित्याचाच बहिष्कार करण्याचा हा विचित्र प्रकार आहे. भारतात सर्वात निरर्थक अशा शिव्या जुन्या हैदराबाद संस्थानात दिल्या जात असत. आजही त्यांचे अवशेष या विभागात आहेत. हैदराबादच्या एका मराठी लेखकांची लघुकथा तीस-पस्तीस वर्षांपूर्वी मी वाचत होतो. त्यात एम.के.एल. व काही ठिकाणी एम.के.एच. या लघुरूपाचा वापर झालेला होता हैदराबाद येथे शिक्षण घेतलेल्या माझ्या एका सहकारी प्राध्यापक मित्रास मी या शब्दांचे दीर्घरूप विचारले. तर ते गालातल्या गालात हसून म्हणाले, सांगेन पण एकांतात. आठवून पहावे किंवा मला विचारावे. या अशा शिव्यांचे जन्मस्थान कोठे असावे याबद्दल मला जिज्ञासा होती. औरंगाबाद येथील माझे दिवंगत मित्र डॉ. भगवानदास वर्मा यांनी मला या अशा निरर्थक शिव्यांच्या निर्मितीसंबंधी एक सत्यकथा सांगितली होती. शंभरेक वर्षांपूर्वी हैदराबाद येथे एक नंपुसक नवाब होता. नंपुसक मंडळींना लैंगिक विषयासंबंधीचे विलक्षण असे आकर्षण असते व ते विकृत असते. तर या नबावाने असे जाहीर केले, की जो कोणी निरर्थक शिव्या शोधून काढेल त्याला भरपूर इनाम देण्यात येईल व ती शिवी हैदराबादेत लोकप्रिय करण्यात येईल. तर त्यातून या अशा शिव्या त्यांच्यापर्यंत येऊ लागल्या. त्या लोकप्रिय करण्यात आल्या. मराठवाड्यातील जुन्या पिढीच्या तोंडी अशा शिव्या आजही असतात. काहींच्या तोंडी शिव्या या सहजपणे येत असतात. त्यांच्या संवादशैलीचा तो भागच होऊन जातो. त्याच्या मुळात ना दुःख असते, ना श्रेष्ठत्वाची भावना, ना अपमान करण्याची वृत्ती. त्यांची बोलण्याची शैलीच तशी असते. आयला, मायला वगैरे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ विज्ञान महाविद्यालयात पूर्वी एक प्राचार्य होते लवंदे नावाचे. कोकणचे. खूप विनोदी आणि बुद्धिमान. एखादी गोष्ट त्यांना नकोशी वाटायची त्यावेळी ते सहजपणे म्हणायचे, घाल त्याला गाच्या गांमध्ये. मानसशास्त्रज्ञांच्या मते, शृंगार करतेवेळी एकमेकास उद्युक्त करण्यासाठी म्हणून पुरूषांच्या तोंडी शिव्या असतात. शिव्यांचा वापर जगभर केला जातो.

## कर्नाटकातील दोन विद्यापीठांत शिव्यांवर संशोधन

सर्व शिव्यांचे निर्माते पुरुषच आहेत. पुरूषसत्ताक व्यवस्थेने ही भाषिक देणगी दिलेली आहे. ९९% शिव्या स्त्रियांच्या अंगप्रत्यंगाशी संबंधित असतात किंवा नातेसंबंधातील असतात. पुण्याच्या एसपी कॉलेजमध्ये या विषयावर व्याख्यान देत असताना मी म्हणालो, की स्त्रीवाद्यांनी हे लक्षात घ्यावे, की शिव्यांच्या माध्यमातून पुरुष स्त्रीचा सतत अपमान करीत गेलेला आहे. आता स्त्रियांनी पुरुषांना टोचतील अशा शिव्या निर्माण करावयास हव्यात. पुरुषाच्या शिवीस उत्तर म्हणून स्त्रिया नवीन शिव्यांचा वापर करू शकतील. याच व्याख्यानात मी म्हणालो, की शिव्यांचा भाषाशास्त्रीय, समाजशास्त्रीय किंवा स्त्रीवादी दृष्टिकोनातून अभ्यास झालेला नाही, हा खूपच उपेक्षेचा विषय झालेला आहे. त्यावेळी कर्नाटकातून आलेला एक प्राध्यापक मला म्हणाला, की कर्नाटकाच्या दोन विद्यापीठांत कन्नड शिव्यांवर संशोधन झालेले आहे. संस्कृतातील शब्दांचा वापर केला, तर तो शब्द अश्लील ठरत नाही. संयोग योनी या शब्दांचा वापर सर्रास केला जातो. पण सेक्ससाठी किंवा योनीसाठी लोकभाषेतील शब्दाचा वापर केला, की तो शब्द अश्लील समजला जातो. यामागची मानसिकता काय असावी? आम्ही ज्या शब्दांचा वापर करू ते शब्द श्लील आणि तुम्ही त्याच आशयाचा लोकभाषेतील शब्द वापरला की तो अश्लील. हे संस्कार खूप खोलवर पिढ्यान्‌पिढ्या झालेले आहेत. भाषेचे पावित्र्य निर्माण करणाऱ्यांनी हा गोंधळ निर्माण केल्याचे दिसते. कोकणात दिली जाणारी शिवी मराठवाड्यात दिली जात नाही, तर विदर्भातील, खान्देशातील शिव्यांचा साज हा वेगळाच असतो. आता भारतीय पातळीवरील शिव्यांच्या शोधात मी आहे. लातूरमध्ये एक फ्रेंच व्यक्ती आलेली होती, दलित साहित्याचा अनुवाद करण्यासाठी. मी त्यांना म्हणालो, की दलित साहित्याचा तुम्ही अनुवाद करू इच्छिता पण त्यात शिव्याही असतात. तर ते म्हणाले, अहो जगात सर्वात जास्त भयंकर शिव्या फ्रेंच भाषेत आहेत. या विवेचनावरून किमान आता तरी तुमच्या मनात श्लील-अश्लील शब्दांविषयी जे पूर्वग्रह आहेत ते दूर होतील, अशी अपेक्षा. ■■■

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक आणि अनुवादक आहेत.)**

# सामाजिक अभिसरणासाठी दलित-दलितेत्तर संवादाची गरज






बी.व्ही. जोंधळे

**जातीभेद मोडण्याचे प्रयत्न केवळ खालच्या लोकांकडून प्रथम झाल्यास त्याचे परिणाम अनर्थवाह होण्याचा संभव आहे. तेच काम उच्च म्हणविणाऱ्या लोकांकडून प्रथम झाल्यास ते स्वार्थत्यागाचे उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल. जोपर्यंत असे होत नाही, तोपर्यंत हल्लीच्या स्थितीचा उपयोग करून वैमनस्य न वाढविता प्रत्येक जातीने आपली सुधारणा करून दर्जा वाढवून घेण्याचा व वरच्या पायऱ्यांवर चढण्याचा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे.**

१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्य अस्तित्वात येत असताना पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी म्हटले होते, की महाराष्ट्र राज्य हे मराठा नव्हे, तर मराठी राज्य जसे होईल, तसेच सामाजिक परिवर्तनालासुद्धा प्राधान्य देण्यात येईल. गांधी-नेहरू-शाहू-फुले व आंबेडकरांचा सामाजिक परिवर्तनाचा आदर्श त्यांच्या समोर होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजाला समता, स्वातंत्र्य, बंधुभाव नि माणुसकीची वागणूक मिळवून देण्यासाठी १४ ऑक्टोबर १९५६ साली बौद्ध धम्माचा स्वीकार केला होता. धम्म स्वीकारल्यामुळे नवदीक्षित बौद्ध समाजात एक अस्मितेची जाणीव निर्माण झाली होती. बौद्ध समाजाचा जागा झालेला स्वाभिमान हाच मग सवर्णांच्या संतापाचे एक कारण होऊन बसला. परिणामी, खेडोपाडी दलित समाजावर वाढत्या प्रमाणात अत्याचार होऊ लागले होते.

## धर्मांध राजकारणाला सुगीचे दिवस

या पार्श्वभूमीवर यशवंतराव चव्हाणांनी कर्मवीर दादासाहेब गायकवाडांच्या रिपब्लिकन पक्षाशी पहिली काँग्रेस-रिपब्लिकन युती केली होती. त्याकाळी यशवंतराव चव्हाणांच्या प्रेरणेने सामाजिक समता परिषदांचे आयोजन जसे होऊ लागले होते,

तसेच समाजवाद्यांनीही समता परिषदा भरविल्या होत्या. खेडोपाडी दलित समाजावर अत्याचार झाले तर समाजवादी, गांधीवादी, डावे कार्यकर्ते अत्याचारग्रस्त दलित बांधवांचे अश्रू पुसण्यासाठी खेडोपाडी धाव घेत होते. बाबा आढावांच्या 'एक गाव, एक पाणवठा' चळवळीमुळे सामाजिक परिवर्तनाचा संदेश खेडोपाडी जात होता. दरम्यान, दादासाहेब गायकवाडांच्या भूमिमुक्ती आंदोलनात दलितांबरोबरच दलितेत्तर भूमिहीनांनीही भाग घेतला होता. डॉ. कुमार सप्तर्षींनी औरंगाबादेत ७० च्या दशकात दलित विद्यार्थी शिष्यवृत्तीवाढ आंदोलन केले होते व त्यात दलितेतर विद्यार्थीही सहभागी झाले होते. मंडल आयोगाच्या अंमलबजावणीचा लढा दलित-दलितेत्तरांनी खांद्याला खांदा लावून लढवला. १९६० सालीच दलित साहित्य संकल्पनेचा उदय होऊन दलितेत्तर बहुजन समाजातील लेखक दलित साहित्य चळवळीशी जोडले गेले. पँथर-युक्रांदसारख्या संघटनांनी दलितांच्या सामाजिक न्यायाचा प्रश्न उचलून धरला होता. एस.एम. जोशी, आचार्य अत्रे, मधू लिमये अशांसारख्या कित्येकांचा दलित चळवळीला आधार वाटायचा; पण १९९२ साली बाबरी मशिदीच्या पतनानंतर देशात जसा हिंदू-मुस्लिमांचा संघर्ष दहशतवादापर्यंत येऊन भिडला, तसेच १९७८ साली उद्‌भवलेल्या नामांतराच्या प्रश्नाने दलित-दलितेत्तर संवादच खुंटून गेला. महाराष्ट्र राज्यात आत अशी स्थिती आहे, की दलित समाज सामाजिक अभिसरणाअभावी वेगळा पडला असून, दलितांच्या सामाजिक न्यायाचा लढाच दुर्लक्षित झाला आहे. दलित समाजाकडे दुराव्याच्या भावनेने पाहण्याची जातीय दृष्टी दिवसेंन्‌दिवस घट्ट होत चालली आहे. फुले-शाहू-आंबेडकरांच्या सर्वसमावेशक सामाजिक परिवर्तनवादी घुसळणीकडे पाठ फिरवून जातीत बंदिस्त करून घेण्यात आपण धन्यता मानत आहोत. महाराष्ट्रात एकेकाळी शेतकरी, शेतमजूर, कामगारांचे लढे झाले. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ झाली. स्त्रीमुक्तीच्या चळवळी झाल्या. या सर्व चळवळी जाती-धर्मनिरपेक्ष होत्या. समाज तोडणाऱ्या नव्हेत, तर जोडणाऱ्या होत्या; पण आता जातीची आंदोलने होत आहेत. जातीचे मेळावे होत आहेत. जातीच्या संस्था निघत आहेत. जातीच्या वसाहती उभ्या राहत आहेत. जातीची साहित्य संमेलने होत आहेत. आंतरजातीय विवाह करणाऱ्यांना संपविण्यात येत आहे. दलित-आदिवासी समाजावर तर इतके अत्याचार होतात, की (उदा. खैरलांजी-नामांतर आदी) माफी वगैरे मागणे तर सोडा; पण साधा खेदही व्यक्त करायला कुणी तयार होत नाही आणि आता तर काय वाढती बेकारी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, कामगारांचे प्रश्न हे सारे बाजूला पडून धर्मांध राजकारणाला सुगीचे दिवस आले आहेत आणि हे कुठे? तर फुले-शाहू-आंबेडकर, प्रबोधनकार ठाकरेंचा सामाजिक परिवर्तनाचा वारसा सांगणाऱ्या महाराष्ट्रात यापेक्षा दुर्दैवी बाब ती दुसरी काय असू शकते?

अर्थात, आज जरी दलित-दलितेत्तर सौहार्दाबाबत काहीसे गढूळ वातावरण जरी निर्माण झालेले असले, तरी या राज्याचे नेतृत्व करणाऱ्या काही मुख्यमंत्र्यांनी सामाजिक न्यायाचे कायदेही केले, हे विसरता येत नाही. उदा. बाबासाहेबांच्या धर्मांतरानंतर नवबौद्धांच्या आरक्षणाचा प्रश्न जेव्हा निर्माण झाला, तेव्हा तत्कालीन मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांनी बौद्ध समाजाला राज्यपातळीवरील आरक्षण दिले (पुढे देशपातळीवर नवबौद्धांना आरक्षण देण्याचा निर्णय तत्कालीन पंतप्रधान विश्वनाथ प्रतापसिंग यांनी घेतला हा भाग वेगळा). १९९४ साली मुख्यमंत्री असलेल्या शरद पवारांनी राजकीय किंमत मोजून विद्यापीठ नामांतराचा निर्णय घेतला. राज्यात अनुसूचित जाती-जमाती, भटका-विमुक्त समाज व इतर मागासवर्गीयांना शासकीय सेवा व शिक्षणात आरक्षण आहेच. मात्र, आरक्षणाचा जो कायदा मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांच्या कारकीर्दीत तयार झाला त्या कायद्याची प्रक्रिया विलासराव देशमुख मुख्यमंत्री असतानाच सुरू झाली होती. काँग्रेस-रिपब्लिकन युतीच्या काळातही काही समाजहितैषी निर्णय घेण्यात आले होते; पण महाराष्ट्राची फुले-शाहू-आंबेडकरवादी पुरोगामी प्रतिमा मागे पडत गेली व दलित-मागासवर्गीयांना सरकारचे जावई म्हणून हिणवण्यात येऊ लागले. हे असे का झाले? तर फुले-शाहू-आंबेडकरांचा परिवर्तनवादी विचार आपण तळागाळात नेण्यात कमी पडलो म्हणून!

## जातजाणिवांना बळकटी देणारे प्रयोग!

फुले-शाहू-आंबेडकर हे सर्व समाजाचे म्हणूनच राष्ट्रीय नेते होते; पण त्यांना आपण जातीत कैद करून टाकले. पुरोगामी यशवंतराव चव्हाण, शरद पवार यांचा उल्लेख स्ट्राँग मराठी लीडर असा होऊ लागला. हरितक्रांतीचे जनक वसंतराव नाईक शेवटी बंजारा नेतेच ठरले. छगन भुजबळ माळ्यांचे नेते म्हणविले जाऊ लागले. शेतकऱ्यांना वीज दरात सवलत देणारे सुशीलकुमार शिंदे शेतकऱ्यांचे नेते नव्हेत, तर दलित समाजाचेच नेते ठरतात. किती म्हणून उदाहरणे द्यावीत? ही जातजाणीव इथेच थांबली नाही, तर ती शिक्षणक्षेत्रातही शिरली. विद्यापीठातून महापुरुषांच्या नावे जी अभ्यासकेंद्रे चालतात त्या केंद्राचे संचालक त्या-त्या महापुरुषांच्या जातीचे असतात. म्हणजे म. फुले अभ्यासकेंद्राचे संचालक जन्मजातीने माळी, अण्णा भाऊ साठेंच्या नावे चालणाऱ्या अभ्यासकेंद्राचे संचालक जन्माने मातंग, आंबेडकर-बुद्धाच्या नावे चालणाऱ्या अभ्यासकेंद्राचे संचालक जन्माने बौद्ध वगैरे वगैरे. ही जातमानसिकता इथेच थांबली नाही, तर सामाजिक न्याय खात्याचा मंत्री आरक्षित वर्गातला असावा, अण्णा भाऊ साठे महामंडळाचा अध्यक्ष मातंग असावा, वसंतराव नाईक महामंडळाचा अध्यक्ष जन्माने बंजारा असावा, अशी काळजी आपण नित्य वाहत आलो. तात्पर्य, जातिविरहित नव्हे, तर जातजाणिवांना बळकटी देणारे घड्याळाचे काटे उलटे फिरविणारे प्रयोग आपण राबवीत आलो. डाव्या-पुरोगामी-समाजवादी चळवळीसाठी जो महाराष्ट्र ओळखला जात होता, त्याच महाराष्ट्रात जातवर्चस्ववादी संघटनांचे पेव फुटले. तेव्हा सामाजिक अभिसरणाच्या मूलभूत सौहार्दवादी मूल्यांकडे दुर्लक्ष होऊल दलित-दलितेत्तर संवादच खुंटून उभय समाज एकमेकांकडे दुराव्याच्या भावनेने पाहू लागले तर आश्चर्य ते कोणते?

## सामाजिक न्यायासाठी आरक्षण

नैसर्गिक आपत्तीच्या काळात समाज एकत्र येतो, तो एकमेकांना मदत करतो, असे सांगितले जाते; पण हे भाग्य दलित समाजाच्या वाट्याला येत नाही व दुर्दैवाने महाराष्ट्रही यास अपवाद नाही, हे आपले खरे समाजवास्तव आहे. राष्ट्रीय गुन्हे संशोधन संस्थेने २०२० साली म्हणजेच कोविड काळात देशभर नोंदविलेल्या गुन्ह्यांची आकडेवारी नुकतीच प्रसिद्ध केली. या आकडेवारीनुसार २०२० या वर्षात लहान मुले व महिलांवरील अत्याचारात काहीशी घट झाली. मात्र, या कोविड काळात देशभर अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीवरील अत्याचार वाढले. यास महाराष्ट्रही अपवाद नव्हता. सदरील आकडेवारीनुसार पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्र राज्यात २०२० साली दलित अत्याचाराच्या २,५६९ तर आदिवासींवरील अत्याचाराच्या ६६३ तक्रारी नोंदविल्या गेल्या. तेव्हा अशा सामाजिक तुटलेपणाच्या स्थितीत मागासवर्गीयांना घटनेने दिलेले आरक्षण व त्यांना सुरक्षाकवच म्हणून लाभलेला ॲट्रॉसिटीचा कायदा कळीचा विषय न ठरला तरच नवल.

भारतीय संविधानाने एक सामाजिक न्यायाचे तत्त्व म्हणून मागासवर्गीयांसाठी शिक्षण व नोकऱ्यांत आरक्षणाची तरतूद केली. हजारो वर्षे ज्या व्यवस्थेने मागासवर्गीयांच्या विकासांच्या सर्वच वाटा बंद केल्या, त्यांचा शैक्षणिक व आर्थिक विकास करून त्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण नीती स्वीकारली गेली; परंतु आरक्षणामुळे मुख्य प्रवाह निर्माण होण्याऐवजी समाजात दुहीच्या, द्वेषाच्या भिंती उभ्या करून आरक्षणावर महाराष्ट्रातसुद्धा बहुसंख्याक समाजाकडून आक्षेप घेण्यात येऊ लागले. आक्षेपाचे स्वरूप असे राहत आले, की पूर्वी अस्पृश्यता होती. ती आता नाही म्हणून आरक्षण नको, आरक्षणामुळे जातीयता वाढते (आरक्षण नव्हते तेव्हाही ती होती, त्याचे काय?). आरक्षण जातीच्या नव्हे, तर आर्थिक निकषांवर ठेवण्यात यावे, आरक्षणच तुमच्या मागासलेपणास कारणीभूत आहे, असा अपप्रचार दलितेत्तर तरुणांत करणे वगैरे. आता या आक्षेपात खरोखरच काही तथ्य आहे काय, याचा अंमल शांतचित्ताने विचार करायला कुणीच तयार नाही, हे कसे?

## दलित समाज विकासापासून कोसो दूर

आरक्षणामुळे मागासवर्गीयांचा थोडाबहुत आर्थिक विकास झाला, हे खरे; पण खरोखरच आरक्षणाची स्थिती काय आहे? एक तर खाजगीकरणामुळे सरकारी नोकऱ्या कमी होऊ लागल्या. खाजगीकरणात आरक्षणाला वाव नाही. कंत्राटीकरणाच्या धोरणामुळे मागासवर्गीयांच्या प्रगतीचा मार्गच खुंटला. शिक्षणाच्या खाजगीकरणामुळे मागासवर्गीय समाज व्यवसायाभिमुख माहिती तंत्रज्ञानाच्या शिक्षणास मुकला. आरक्षणाचा पुनर्विचार झाला पाहिजे, असे जेव्हा सांगण्यात येते तेव्हा प्रश्न असाही उपस्थित होतो, की आरक्षणनीतीमुळे मागासवर्गीय दलित समाजाकडे किती एकर बागायत जमिनी आल्या? त्यांच्या पक्क्या घरांची टक्केवारी ती काय? मागासवर्गीयांचा सरकारी नोकऱ्यांतील अनुशेष भरला गेला काय? माऱ्याच्या जागेवर किती मागासवर्गीय अधिकारी आहेत? खेडोपाडी दलित समाजाची स्थिती काय आहे? त्यांच्यातील बेरोजगारी-शिक्षण-आरोग्य सुविधा- छोट्या उद्योग व्यवसायांचे प्रमाण काय? सहकार क्षेत्रात त्यांना काही वाव आहे काय? विकासाचे असे काही निकष लावले तर दलित समाज विकासापासून कोसो दूर आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. म्हणूनच जातिव्यवस्था, विषमता, विकासाच्या समानसंधीचा अभाव आहे तोवर आरक्षण ठेवणे गरजेचे आहे. आरक्षण हा काही पिढीजात अधिकार वा हक्क नाही, याची जाण फुले-शाहू-आंबेडकरांच्या अनुयायांना जरूर आहे; पण पिढ्यान्‌पिढ्या ज्या जातिग्रस्त व्यवस्थेने ज्यांना विकासापासून वंचित ठेवले त्या दलित समाजाला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी आरक्षण अजून काही काळ चालूच ठेवावे लागणार आहे, हे सर्वांनीच सहिष्णुभावाने समजून घ्यायला नको काय?

आरक्षणाचे मूळ जसे सामाजिक विषमतेत आहे, तसेच ते ॲट्रॉसिटी कायद्याचेही आहे; पण या कायद्याचा गैरवापर होतो म्हणून हा कायदाच बदलावा, अशी मागणी अधूनमधून डोके वर काढीत असते. अर्थात, कायद्याच्या गैरवापराची तक्रार सर्रास खोटी आहे, असे म्हणता येत नाही. कायद्याचा दुरुपयोग होऊ नये हे खरे. दुरुपयोग करणाऱ्यांना शिक्षा व्हावी, हेही तितकेच खरे; पण प्रत्येक समाजहितैषी कायद्याचा दुरुपयोग होतो म्हणून ते कायदेच बदला, अशी मागणी होते काय? नाही. मग ती ॲट्रॉसिटीच्या कायद्याबाबतच का होते? दलितांना मिळालेले सुरक्षाकवच काढून घेण्यासाठी? अजून असे, की पुष्कळदा खेडेगावांतील गटबाजींच्या राजकारणात एकमेकांना संपविण्यासाठी या कायद्याचा आधार घेऊन दलितांचा वापर करण्यात येतो आणि खऱ्या गुन्ह्यात ॲट्रॉसिटीचा गुन्हा दाखल केला, तर त्याचा सूड म्हणून दलितांवरच दरोडेखोरीच्या खोट्या केसेस लावण्यात येतात, अशाही तक्रारी होतच असतात. तेव्हा दोष कायद्याचा नसून कायदा राबविणाऱ्यांचा आहे. म्हणूनच या कायद्याबाबत निकोप सामाजिक सौहार्दाचे वातावरण तयार करण्यासाठी दोन्ही बाजूंच्या राजकारण-समाजकारण्यांनी-विचारवंतांनी पुढे येऊन सामाजिक अभिसरणास चालना देणारे प्रबोधन करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली तर ती चूक ठरू नये. यासंदर्भात शाहू महाराजांची भूमिका आपणास प्रेरणादायी ठरू शकेल. ते म्हणतात, ''जातीभेद मोडण्याचे प्रयत्न केवळ खालच्या लोकांकडून प्रथम झाल्यास त्याचे परिणाम अनर्थवाह होण्याचा संभव आहे. तेच काम उच्च म्हणविणाऱ्या लोकांकडून प्रथम झाल्यास ते स्वार्थत्यागाचे उदाहरण इतर सर्व जातींना बोधप्रद होईल. जोपर्यंत असे होत नाही, तोपर्यंत हल्लीच्या स्थितीचा उपयोग करून वैमनस्य न वाढविता प्रत्येक जातीने आपली सुधारणा करून दर्जा वाढवून घेण्याचा व वरच्या पायऱ्यांवर चढण्याचा प्रयत्न चालू ठेवला पाहिजे. वरील जातींनी जरूर तर काही पायऱ्या खाली येऊन त्यांना हात देऊन वर घेतले पाहिजे. असे झाले म्हणजे सुरळीत व सलोख्याने हे जातीभेद मोडण्याचे बिकट काम सिद्धीस जाण्याचा संभव आहे.'' ■■■

**(लेखक आंबेडकरी चळवळीचे अभ्यासक आहेत.)**

# आभासही आभास है

**सध्याचा काळ हा जसा फ्युजनचा आहे, तसाच तो कन्फ्युजनचादेखील आहे. भ्रम आणि संभ्रमाने युक्त असलेल्या या काळात, जगावर रिॲलिटीपेक्षा व्हर्च्युअल रिॲलिटीचे अधिराज्य आहे. बहुसंख्य माणसांची सकाळ मोबाइलच्या स्क्रीनने होते आणि रात्री झोपताना मेंदूत मोबाइल स्क्रीनवरील आभासी विश्वाच्या दृश्यस्मृती असतात.**





प्रा. कैलास अंभुरे

काही दिवसांपूर्वी एक बातमी वाचली : स्मार्टफोनवर सर्वाधिक वेळ व्यतीत करण्यात भारताचा जगात चौथा क्रमांक लागतो. याचे कारण म्हणजे आपल्या देशातील लोक म्हणजे आपण दररोज ४.८ तास मोबाइलवर घालवतो. याचा अर्थ वर्षातील ३६५ दिवसांपैकी जवळपास १,७५२ तास म्हणजे ७३ दिवस मोबाइलच्या आभासी विश्वात जातात. सध्या भारतीयांचे अर्थात आपले आयुर्मान हे ६८.६५ आहे. या आयुर्मानातील पहिली वीस वर्षे स्वत:चा मोबाइल नसतो, असे गृहीत धरले तर आयुष्यातील साधारण १० वर्षांपेक्षा अधिक काळ हा मोबाइल पाहण्यात म्हणजेच आभासी विश्वात वावरण्यात जाणार आहे. खरे तर हे गुणोत्तर सद्य:सूत्रानुसारचे आहे. टिकटॉकसारखे प्रकार बंद झाले नसते तर याचे प्रमाण अधिक राहिले असते. हा झाला केवळ मोबाइल स्क्रीन टाइम. यामध्ये टीव्ही आणि कॉम्प्युटर स्क्रीन टाईमचा वेळ जर जोडला तर चित्र अधिक भडकच दिसते. कोविड महामारीमुळे तर डिजिटल माध्यमांना अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. पूर्वी मुले आपल्या पालकांच्या हातातला मोबाइल आपले आई/बाबा कधी खाली ठेवतात अन् तो कधी आपल्या हाती येईल, याची वाट पाहायचे. अलीकडे मात्र चित्र उलट झालेय. ऑनलाइन शिक्षणामुळे मुलांचा क्लास कधी संपतो आणि आपल्याला मोबाइल कधी मिळतो, याची पालकांना वाट पाहावी लागते... शेवटी काळाचा महिमा!

## बोलण्यापेक्षा व्हर्च्युअल ग्रीटिंग्ज जवळच्या

सध्याचा काळ हा जसा फ्युजनचा आहे, तसाच तो कन्फ्युजनचादेखील आहे. भ्रम आणि संभ्रमाने युक्त असलेल्या या काळात, जगावर रिॲलिटीपेक्षा व्हर्च्युअल रिॲलिटीचे अधिराज्य आहे. बहुसंख्य माणसांची सकाळ मोबाइलच्या स्क्रीनने होते आणि रात्री झोपताना मेंदूत मोबाइल स्क्रीनवरील आभासी विश्वाच्या दृश्यस्मृती असतात. तरुणाईचं तर विचारूच नका. फेसबुक, व्हॉटस्ॲप, ट्विटर, इंस्टाग्राम यावर; नव्हे तर

यापेक्षाही अधिक काळ हा टिकटॉक, स्नॅपचॅट, मित्रों, चिंगारी, रील, शॉर्ट्स यासारख्या शॉर्ट व्हिडिओ ॲपवर जातो. चुकून कुठे चार-चौघांमध्ये आपण असलो तरीसुद्धा खाली मुंडी असते वा चौघंही मोबाइलमध्ये डोके घालून बसलेले असतो. पूर्वी कधी कुणी रस्त्याने एकटाच बोलत-हातवारे करत चालला तर त्याविषयी लोक डोक्यावर परिणाम झाला म्हणून हळहळ व्यक्त करायचे. आता तसे नाही. ईअरफोनच्या आवाजाने सभोवतालच्या निरवतेशी आपण जोडलेले असतो. मागे मुंबईत लोकलला धडकलेली तरुणी मोबाइलवर गाणे ऐकण्यात दंग होती. संवादसेवा देणाऱ्या कंपन्या 'जिओ जी भर के' म्हणत सेवा देतात आणि घेणाराही घेत-घेत कधी त्याच्या आहारी जातो, कळतही नाही. अगदी सोशलमीडियावर सकाळी टाकलेल्या पोस्टला किती लाइक मिळाले, किती जणांनी शेअर केले वा आपले स्टेटस किती व्ह्युवर्सनी पाहिले याचे सिंहावलोकन करण्यातच आपली सायंकाळ जाते. तहान-भूक हरवून आभासी लाइक अन् शेअर हेच आपले जगणे झालेय. काही दिवसांपूर्वी कोविडमध्ये फेसबुकला फ्रेंडने टाकलेल्या दु:खद निधनाच्या पोस्टला कित्येकांनी लाइक केले. न पाहता, न वाचताच आपल्याला आता कमेंट टाकायची सवय झालीय. मोबाइल-टीव्ही अन् कॉम्प्युटरच्या ऑनस्क्रीनसमोर ऑफस्क्रीनचे विश्व (वास्तव) गौण झालेय. ऑनस्क्रीन, ऑनलाइन आणि लाइव्ह हेच आपल्या जगण्याचे मानदंड झालेत. घरात सर्वांसोबत बसून टीव्ही पाहण्यातल्या परमानंदापेक्षा मोबाइलवर टीव्ही पाहणे हे आपल्याला आत्मानंद देते. अर्जुन भारद्वाज आणि अतुल तापकीर यांच्या आत्महत्या आपण लाइव्ह पाहतो. फेसबुक रिल्स आणि यूट्यूब शॉर्टस् यासारख्या असंख्य ॲपवर अधिकाधिक लाइक मिळावेत यासाठी वाट्टेल ते केले जाते. चार भिंतीतल्या रिअल गोष्टी शॉर्ट व्हिडिओंच्या लाइकमध्ये कधी उतू गेल्या याचे भानच आपल्याला राहिले नाही. जणू नग्नता आणि भग्नता हेच जीवनाचे आयाम झालेत. उत्तानतेच्या सर्व सीमा पार केलेल्या रिल लाइफला येणाऱ्या कमेंटनी मानवी नातेसंबंधांचा शिरच्छेद झालाय. घात-अपघातांचे व्हिडिओ शेअर करताना आपल्या कोणत्या सद्भावना असतात? विशेष म्हणजे, 'सर्वांत अगोदर आपल्या ग्रुपवर' म्हणत रस्त्यावरच्या अपघातात रक्ताच्या थारोळ्यात अस्ताव्यस्त पडलेले मृतदेह आणि त्यांच्या तुटलेल्या अवयवांचे फोटो आपल्याला 'सबसे पहले'चा परमोच्च आनंद देतात की दु:ख, हेच समजत नाही. शहरातल्या शहरातही चार पावले चालून जाऊन शुभेच्छा देऊन चार शब्द बोलण्यापेक्षा व्हर्च्युअल ग्रीटिंग्ज आपल्याला हृद्य वाटते. प्रत्यक्ष संवादातल्या सुखापेक्षा माध्यमांवरील चॅटिंग अन् भेट हेच आपले समरसून जगणे झालेय. कधी काळी आपण भेटकरी होतो, त्यापूर्वी मोटकरी होतो. आता 'नेटकरी' झालो आहोत. सणावाराच्या निमित्ताने कधीतरी शुभेच्छा देणारे आपण आता आठवड्यातील प्रत्येक दिवसाची अधिदेवता शोधून शुभेच्छा देतो. एवढेच नाही, तर कैऱ्या, आंबे, बोरे, हुरडा, जांभळे, चिंचा, करवंदे, टरबूज, यांचा वानवळा हा व्हॉटस्ॲप, फेसबुकवरच पाठवतो. संक्रांतीचे तिळगूळ, दिवाळीचा फराळ, गुढीपाडव्याची गाठी, बौद्ध पौर्णिमेला खीर अन् ईदला शिरखुर्माही व्हर्च्युअली खाऊ घालतो. प्रत्येक सणानिमित्त शुभेच्छा देतो; पण गळाभेट मात्र घेत नाही अन् दुर्दैव हे की मोबाइलला कवटाळता येत नाही.

## ...तरच आयुष्यात निस्सीम आनंद मिळतो

अलीकडे तर पाच हजार मित्रांचा टप्पा ओलांडला म्हणून एकापेक्षा अधिव फेसबुक अकाउंट असणारे लोक जसे आहेत, तसेच यातले फार काही न समजल्याने तीन-चार अकाउंट असणारेही अनेक आहेत. या सर्वांमध्ये स्त्री प्रतिमांचा होणारा वापर हा चिंतनीय आहे. तद्वतच स्त्रियांचा निष्काळजीपणा हादेखील चिंतेचा विषय आहे. फेसबुकवर होणारी मैत्री त्यातून जवळीकता... आणि शेवटी फसवणूक, असे अनेक प्रकार आपल्या अवतीभोवती सतत घडतात. वेगवेगळ्या फोटोंचा होणारा दुरुपयोग नित्याचाच आहे. फेसबुक प्रोफाइल क्लोन होणे, स्टेटसवर पाळत ठेवून चोऱ्या-दरोडे, हत्या असे प्रकार नेहमीच उजेडात येतात. मध्ये एका फ्रेंडची 'भरून आलेली प्रत्येक गोष्ट सुंदर असते; मग ते आभाळ असो की मन' अशी पोस्ट वाचली आणि मलाच भरून आलं... पण खरे सांगायचे तर सध्याचे पर्यावरण खूप प्रदूषित झालेय. हजारो मित्र कनेक्टेड असतानाही मन भरून आले अन् कुणाच्या खांद्यावर डोके टेकवून मन मोकळे करावे असा खांदा शोधावा लागतो किंवा मनातले कुणाशी फोनवर सांगायला गेले तर समोरची व्यक्ती कॉल रेकॉर्डिंग करेल या भीतीने मन मोकळे करता येत नाही, इतका एकमेकांविषयीचा अविश्वास वाढलाय. परिणाम, डोळ्यातले अश्रू गोठण्याचा हा काळ आहे. भावनांचा गोठणांक वाढण्याचा हा काळ आहे. आपला आभासी वावर जरी वाढला असला तरी मनाचे आकुंचनही तितकेच वाढलेय. 'मी आणि माझं' एवढेच प्रत्येकाला ठाऊक आहे. त्यामुळे मन भरून आले, की मोकळे होण्यासाठी व्यक्तींपेक्षा व्हर्च्युअल प्लॅटफॉर्म महत्त्वाचे वाटतात. याविषयीचा एक किस्सा असा- ''एका मोलकरणीने दोन दिवस गावी जाण्याची पोस्ट टाकली. दोन दिवसांनंतर ती कामासाठी मालकीणबाईंच्या घरी येते, तेव्हा बाई तिला विचारतात, की तू सांगून सुटी का घेतली नाही. यावर ती उत्तरते की, बाई मी फेसबुकवर पोस्ट टाकली होती. साहेबांनी लाइक करून हॅप्पी जर्नीची कमेंटही दिली होती.'' यातला विनोदाचा भाग जरी बाजूला ठेवला तरी सोशल मीडियामुळे आपले excessively expression वाढले आहे. व्यक्त होणे हे मानसिक आरोग्यासाठी चांगले असले तरी किती, कसे व्यक्त व्हावे याला सीमा असावी, तरच आयुष्यात निस्सीम आनंद मिळतो. असो!

## आभासातून वास्तवात यावे लागेल

आज आपण या आभासी विश्वातून 'दृश्यम'चा अविभाज्य भाग होऊन जगतोय. यामध्येच आणखी फेसबुक-मेटाची भर पडलीय. झुकेरबर्ग हे आपल्याला आभासी विश्वात अधिक समृद्ध करण्यासाठी मेटावर्स घेऊन येताहेत. ते मेटावर्सद्वारे आपल्याला



व्हर्च्युअल जगातून वास्तव जगात (पण आभासीच) घेऊन जात आहेत. आभासी विश्वातील अलीकडचा एक छोटासा वास्तव नमुना म्हणजे ऑनलाइन एन्व्हायर्नमेंट डिसेंट्रालँडचा झालेला महागडा व्यवहार. या महागड्या आभासी व्यवहारचे चलनही आभासीच. ६,०९० व्हर्च्युअल चौरस फूट आकाराचा व्हर्च्युअल लँडचा तुकडा अठरा कोटी रुपयांत विकला गेला. तद्वतच फेसबुकवरच्या आभासी मैत्रीच्या पलीकडे गेलेल्या सांसारिकबंधाच्या घटनाही स्तुत्य आहेतच; पण क्रिप्टोकरन्सीसारखा आभासी विश्वातला आभासी व्यवहार हा चलनी नाणे झाल्यानंतर आभासी सांसारिक बंधांच्या विश्वाने आकार धारण करायलाही वेळ लागणार नाही असे वाटत असतानाच परवालाच ट्रेसी व डेव्ह यांचा मेटाव्हर्समधील पहिला आगळा-वेगळा व्हर्च्युअल विवाह पार पडला. वर, वधू, वऱ्हाडी मंडळी, विवाह स्थळ, लग्नाचा ड्रेस, पार्टी सर्वकाही अवतारांच्या रूपात-व्हर्च्युअली होते. या विवाहात वर-वधू सोबत होते; पण येणाऱ्या काळात वधू अमेरिकेतली कुठल्यातरी आयटी कंपनीत काम करत असेल आणि वर हा भारतातील एखाद्या खेड्यातून ऑनलाइन सर्व्हिस प्रोव्हाइड करत असेल. दोघे आपापल्या कार्यस्थळी असतील आणि त्या दोघांचा मेटाव्हर्सवर विवाह होईल. असो!... या सर्वांमुळे सध्यातरी एक अद्भुत, अदृश्य चैतन्य आपल्या अंतरंगात संचारते आहे. या आभासी विश्वाचा अविभाज्य भाग होऊन 'अच्छे दिन'चे स्वप्न पाहिले. 'मेरा देश बदल रहा है'ची भावना सतत मनात आणणे आणि त्याविषयी टीव्ही, इंटरनेट आणि मोबाइल-सोशल मीडियावरून तसे वातावरण निर्माण करणे हे 'दृश्यम' नाही तर काय आहे? कोणतेही न्यूज चॅनल वा वेबपेज उघडले, की समोरून 'मेरे प्यारे देशवासियों'चा आवाज येतो आणि एक अद्भुत, अदृश्य चैतन्य आपल्या अंतरंगात संचारते. सतत टीव्ही, इंटरनेट, मोबाइलवर पाहणे आणि 'मन कि बात' ऐकणे यामुळे आपली मेमरी सतत रिफ्रेश होते. यावरून आपले 'मत' बनतेय आणि हेच मत स्वत:सह देशाला बनवतेय. सतत टीव्ही, इंटरनेट, मोबाइलमुळे मेमरी रिफ्रेश होते. चॅटींगमुळे का होईना; पण भावनांचे विरेचन होते. असे का होतेय? तर याचे कारण संस्कार. सध्या आभासी संस्कारांचा काळ आहे. हल्ली मुलांना नातेसंबंधदर्शक संबोधनच माहीत नाहीत. त्यामुळे ही मुले काका, मामा म्हणण्याऐवजी '...चे पप्पा' असेच बोलतात. पूर्वी वास्तवातल्या वा पुराणातल्या गोष्टींनी तुमच्या-आमच्यावर बालसंस्कार झाले, ती जागा स्पायडर मॅन, बॅटमॅन, सुपरमॅन, डोरेमॉन, शिंचॅन, मोटू-पतलू, छोटा भीम, बेनटेन यांनी घेतलीय. 'ओ गॉड गिव्ह मी सम पेशंस; बट हरिअप' हे आजच्या तरुणपीढीचे ब्रीद आहे. त्यामुळे हे तरुण, नेतृत्वाकडे 'सुपरहीरो' म्हणून पाहतात आणि त्याच पद्धतीने जगण्याचा प्रयत्न करतात. दुसरीकडे याच आभासी विश्वाने वास्तवसुद्धा जगासमोर आणले. पेरूमल मुरूगन या लेखकाला न्याय मिळाला आणि याच आभासी विश्वाने कन्हैया कुमार सारखे प्रगल्भ विद्यार्थी नेतृत्व देशासमोर आणले. हा कन्हैयासुद्धा याच तरुण पिढीचा प्रतिनिधी; पण त्याच्याकडे अनेक लोक आशेने पाहतात. एकदा सौदी अरेबियाहून परतणाऱ्या एका भारतीय मुस्लीम महिलेने त्याच्याकडे एक अपेक्षा व्यक्त केली होती, ती केवळ कन्हैयापुरती मर्यादित राहत नाही, तर ती समग्र तरुणांविषयी आहे. ती त्याला म्हणते, मला तुम्हाला एक विनंती करायची आहे. ''कीप अवर कंट्री सेफ... आपल्या देशाला सुरक्षित ठेवा.'' आणि मला वाटते, आपल्या देशाला सुरक्षित ठेवायचे असेल, तर आपल्याला आभासातून वास्तवात यावे लागेल; हो की नाही? ■■■

**(लेखक डॉ. बाबासाहेब मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभागात सहयोगी प्राध्यापक आहेत)**

# बुद्धांचा विज्ञानवादी धम्म





प्रो. भगवान माने

**दैववादी किंवा ईश्वरवादी लोक जे काही म्हणतात, तेही विज्ञानच आहे, असा दावा करतात; परंतु ते हे विसरतात, की कोणतीही गोष्ट वैज्ञानिक आहे हे म्हणण्यासाठी ती प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध करता आली पाहिजे किंवा सिद्धांतात तरी सत्यापनीय असली पाहिजे. हिंदू धर्माच्या धार्मिक कथनामध्ये पृथ्वी ही शेषनागाच्या फण्यावर स्थिर आहे किंवा राहू नावाच्या राक्षसाने ग्रासल्यामुळे चंद्रग्रहण लागते, ही कथने सिद्ध करता येत नाहीत आणि भविष्यात ती कधीही सिद्ध होत नाहीत.**

बुद्धांनी प्रतितीसमुत्पाद म्हणजे कार्यकारणभावाचा सिद्धांत सांगितला. त्यामध्ये प्रत्येक वस्तू परिवर्तनीय असते, ती स्थिर नसते, तर अनित्य असते. बुद्धांचा धम्म परिवर्तनवादी आहे. दु:ख ही मानसिक गोष्ट आहे, असे सांगणारे बुद्ध हे जगातील पहिले मनोवैज्ञानिक होत. सुत्तानिपात ग्रंथातील चूलवगच्या चौथ्या सूत्रात महामंगल सूत्रात तथागतांनी देव-मनुष्याच्या प्रतिनिधीला दुसऱ्या गाथेत पुढीलप्रमाणे बोध केला.

***वेद प्रामाण्य कस्यचित: । स्नाने धर्मेच्छा जातिवादावले: ।।***
***संता पारंभ : पापहानायचेनि: । ध्वस्त प्रज्ञांना परचालीगानी जाड:ये।।***

वेद प्रामाण्य मानणारा कोणालातरी सृष्टीचा निर्माता मानणारा, स्नान करून पापक्षालन करणारा, जातिवादाची घमेंड करणारा पापमुक्तीकरिता शरीराला क्लेश देणारा हे पाच लोक प्रज्ञेच्या अभावी मूर्खतेला कवटाळणारे आहेत. वेदामुळे समस्त जणांचे कल्याण घडत नाही. (पोवार सुधीर, महामंगल सुत्त)

## बुद्ध धम्म हा वैज्ञानिक धम्म

बुद्धांच्या धम्माला विज्ञानवादी का म्हटले जाते? तर बुद्धांनी प्रत्येक घटना विवेकावर तपासून पाहिली. वैदिक कल्पना खऱ्या की खोट्या आहेत, मानवमुक्तीचा आणि

घोर तपस्या यांचा कार्यकारण संबंध काही आहे का? यासाठी भार्गवाश्रमातील तपस्वींना भेटून तपस्यांचे विविध प्रकार आणि त्याची फलनिष्पत्ती समजून घेतली. यावर बुद्ध म्हणाले, धर्मविधीत काही तथ्य नाही. आश्रमातील साधूसंतांचे धर्माचरण स्वर्गप्राप्तीसाठी आहे. त्यानंतर बुद्ध विंध्यकोष्ठास अराडनामक मुनीस भेटले. तेथेही बुद्धांचे समाधान झाले नाही. त्यानंतर बुद्धांनी उद्दक रामपुत्र ऋषींची भेट घेतली. बिंबिसार राजानेही मन वळविण्याचा प्रयत्न केला. वरील घटनांवरून असे स्पष्ट होते, की बुद्धांनी अत्यंत निग्रहाने आणि विवेकाने, स्वानुभवावर धम्मोपदेश केला आहे. बुद्ध धम्म हा वैज्ञानिक धम्म आहे. या धम्माला वैज्ञानिक बाजू आहे. वैज्ञानिक बाजू म्हणजे काय, तर एखाद्या बाबीची चिकित्सा करून अनुभवजन्य पुराव्याच्या आधारे ठोस निष्कर्ष काढणे, जे की सर्व जगाला मान्य होतील. वैज्ञानिक पैलूंचा साधा व धोपट अर्थ असा, की स्वत:ला तपासून योग्य-अयोग्य याची फोड करण्याचे ज्ञान स्वानुभवावरून निर्माण झालेले मूल्य हे सत्याकडे जाणारे असते. त्याला वैज्ञानिक आधार असतो. तथ्य आणि मूल्य याची वैज्ञानिक चिकित्सेमध्ये सांगड घातली जाते.

## बुद्धांनी केली अनुभूतीच्या आधारे ज्ञानप्राप्ती

विश्वातील प्रत्येक घटना विज्ञानावर आधारित आहे. कार्ल पिअरसन असे म्हणतो, की सर्व प्रकारच्या शास्त्रांची एकता वैज्ञानिक पद्धतीत असते. वैज्ञानिक पद्धतीत निसर्गातील घटनांचे काळजीपूर्वक अचूक वर्गीकरण, घटनांचे सहसंबंध, क्रमाचे निरीक्षण हे सृजनशील कल्पनाशक्तीच्या आधारे केले जाते. न्यूटन आणि बेकन वैज्ञानिक पद्धतीचे प्रारंभिक संस्थापक म्हटले जात असले तरी २५०० वर्षांपूर्वी बुद्धांनी ज्ञानाची पद्धतशीर मांडणी करून विज्ञानवादी बुद्ध धम्माचा प्रसार केला. त्यांनी धम्मकार्यात कार्यकारणसंबंधाचा आधार घेतला. कारणाशिवाय कार्य घडत नाही. बुद्धांनी अनुभूतीच्या आधारे ज्ञानप्राप्ती केली. बुद्ध घटनांच्या बाबतीत विवाद्य विवरण (InterPratation) करून घटनांचा उलगडा करतात.

## क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रांना मुक्तीचा मार्ग नव्हता

बुद्धपूर्व काळातील भारतीय जातिव्यवस्था आणि तत्त्वज्ञानाचा आढावा घेताना वैदिक वाङ्‌मयाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. वेदात ब्राह्मणस, अरण्यके आणि प्राचीन उपनिषदांचा समावेश होतो. या सर्वांना वैदिक काळ असे म्हटले जाते. त्यास बुद्धपूर्वकाळ म्हटले जाते. बुद्धपूर्वकाळात जात ही सामाजिक संस्थेवर आणि सामाजिक इतिहासावर मोठा प्रभाव पाडणारी संस्था होती. जात ही भारतातील सामाजिक आणि राजकीय जीवनावर राज्य करीत होती. वैदिक तत्त्वज्ञानाच्या वृद्धिमध्ये ब्राह्मणांचा सिंहाचा वाटा होता. मुक्तीची वाट फक्त ब्राह्मणांना होती. क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रांना मुक्तीचा मार्ग नव्हता. (कांबळे डॉ. बी.आर., कास्ट ॲण्ड फिलॉसॉफी इन प्री बुद्धिस्ट इंडिया)

## विज्ञानवाद सिद्ध करण्यासाठी

दैववादी किंवा ईश्वरवादी लोक जे काही म्हणतात, तेही विज्ञानच आहे, असा दावा करतात; परंतु ते हे विसरतात, की कोणतीही गोष्ट वैज्ञानिक आहे हे म्हणण्यासाठी ती प्रत्यक्ष अनुभवाने सिद्ध करता आली पाहिजे किंवा सिद्धांतात तरी सत्यापनीय असली पाहिजे. हिंदू धर्माच्या धार्मिक कथनामध्ये पृथ्वी ही शेषनागाच्या फण्यावर स्थिर आहे किंवा राहू नावाच्या राक्षसाने ग्रासल्यामुळे चंद्रग्रहण लागते, ही कथने सिद्ध करता येत नाहीत आणि भविष्यात ती कधीही सिद्ध होत नाहीत. (बंदिष्टे डॉ. डी.डी. - ईश्वर आणि धर्माच्या पलीकडे)

इस्लाम धर्मात अल्लाचे स्थान महत्त्वाचे असून, प्रत्येक वस्तू अल्लाने बनविली आहे. ख्रिश्चन धर्मात प्रेषिताची कल्पना आहे. शीख, यहुदी, हिंदू आदी विविध धर्म ईश्वर किंवा परमेश्वरावर आधारित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ख्रिश्चन, मुस्लीम आणि शीख धर्माच्या धर्मांतराबाबत विचार न करता पूर्ण विचारांती अहिंसेच्या बौद्ध धम्माचा स्विकार केला.

बुद्धांचा धम्माचा विज्ञानाशी संबंध पाहता बुद्ध म्हणतात, हे समग्र विश्व कार्यकारी नियमांनी बद्ध आहे. ज्या कारणांच्या योगाने ही कार्यपरंपरा अस्तित्वात येत असते. ती कारणे केवळ बाह्य आहेत, तर ती उत्पादन कारणे होत. उदाहरणार्थ, ज्या सुवर्णाचा अलंकार बनतो, ते त्या अलंकाराचे सर्वांग बनलेले असते. त्या अलंकाराचा कोणताही अंश घेतला तरी त्यात सुवर्ण नाही, असे म्हणवेल काय?

## सर्वकाही कार्यकारण भावाने घडत राहणार

यास्तव ईश्वराची पूजाअर्चा आणि आराधना करण्याचा उपदेश ज्या धर्मात केला आहे, त्याचा आपण अव्हेर करू, ज्यात काही अर्थ नाही, अशा सूक्ष्म व क्लिष्ट कोट्या काढण्याच्या नादी लागू नये, तर आपण आपला अहंभाव व स्वार्थपरता याचा त्याग करावा आणि ज्याअर्थी सर्वकाही कार्यकारण नियमांप्रमाणे घडत राहणार, त्याअर्थी सर्वकाही कार्यकारण नियमांप्रमाणे घडत राहणार, त्याअर्थी आपण सदाचार करावा म्हणजे आपल्या सत्कर्माचा परिणाम चांगला घेऊन कार्यकारणाच्या नियमांशी जोडतात. हा विज्ञानाचा नियम आहे. (केळूसकर कृष्णराव : अर्जुन गौतम बुद्धांचे चरित्र)

## बुद्ध धम्म तर्कनिष्ठ आणि अनुभवाधिष्ठित

भारताची जगाला मिळालेली महत्त्वपूर्ण देणगी म्हणजे भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म होय. अनेक धम्मांपासून गौतम बुद्ध हे वैज्ञानिक अध्यात्माचे मार्गदर्शक म्हणून ओळखले जातात. भगवान बुद्ध हे आशिया खंडाचे स्वाभिमान आणि संपूर्ण विश्वाचे वैज्ञानिक, विवेकवादी प्रेरणास्रोत ठरले आहेत. बुद्धाचे जीवनदर्शक आणि त्यांचे नैतिक उपदेश आधुनिक विचारांच्या विज्ञानप्रेमींना आकर्षित करतात. कारण बुद्धांच्या धम्माचा दृष्टिकोन तर्कनिष्ठ आणि अनुभवाधिष्ठित आहे. वैश्विक पातळीवरील विविध धर्म आणि पंथांची वैज्ञानिक

घटीने चिकित्सा करता बौद्ध धम्म हा एकमेव विज्ञानाच्या कसोटीवर उतरतो.

भारतात वैदिक धर्म हा कर्मकांड, दैववादावर आधारित आहे. या धर्मामध्ये बुद्धिवादी किंवा विज्ञानवादी चिकित्सेची परंपरा नाही; परंतु अवैदिक धर्म परंपरा चिकित्सावादी आहे. त्याची सुरुवात चार्वाकापासून सुरू होते. षट्‌दर्शनांपैकी चार दर्शने नास्तिक मनावर भर देतात. कपिलाच्या सारंकदर्शनाप्रमाणे अनेक दर्शनिक 'प्रत्यक्षम एवम प्रमाणम' या चार्वाकाच्या मनावर भर देतात. बुद्धांचा ज्या काळात जन्म झाला. त्या काळात समाज उच्चनीच परंपरागत रूढी आणि अनेक प्रकारच्या अंधश्रद्धेने ग्रासलेला होता. बुद्धांनी तत्कालीन धर्माच्या पुरोहितांना आव्हान दिले. त्यात बुद्धांचा विजय झाला, तर पुरोहितांना धर्माचा अर्थ समजला नव्हता, दु:खाचे मूळ कारण शोधता येत नव्हते. कारण त्यांच्याकडून धर्माची वैज्ञानिकदृष्ट्या चिकित्सा केली जात नव्हती. पुरोहिताकडून वेदांचे रहस्य राखून ठेवले होते. प्राचीन हिंदूंनी शोधलेल्या आध्यात्मिक सत्याचे संचित याच वेदांमध्ये आहे. हा खोटारडेपणा बुद्धांनी पाहिला होता. बुद्धांकडे अत्यंत तल्लख बुद्धी, प्रचंड मानसिक ताकद आणि आकाशासारखे विशाल हृदय होते. बुद्धांजवळ आत्म्यांचे पाश तोडून टाकून त्यावर उपाय शोधण्याची बुद्धिमत्ता होती.

बुद्ध पारंपरिक दैव-दैवत कल्पना, आत्मा, पुनर्जन्म नाकारतो. पंचशील व अष्टांग मार्गाद्वारे मानवी जीवन सफल होईल, असा विश्वास अनुयायांना देतो. बुद्धांच्या धम्माची वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सा करताना तत्कालीन वैदिक धर्माचा विचार करता ब्राह्मणे हा वेदाचा भाग होता आणि त्यांना श्रुमी म्हणून ओळखले जाते. वेद हे केवळ पवित्र नसून अचूक आहेत, असे म्हटले जाते; परंतु वेदांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सा केली असता त्यांची पवित्रता आणि अचूकता फोल ठरते आणि योग्य वैदिक यश केले आणि धार्मिक विधी समारंभ पार पाडून ब्राह्मणांना दक्षिणा दिली, तर आत्म्याला मुक्ती मिळते. याठिकाणी आत्म्याला मुक्ती मिळते याचाही कार्यकारणसंबंध वैज्ञानिक कसोटीवर सिद्ध करता येत नाही. वेदांत सांगितलेल्या आदर्श समाजव्यवस्थेला त्यांनी चातुर्वर्ण्य व्यवस्था नाव दिले आणि तोंडातून ब्राह्मण, बाहूतून क्षत्रिय, पोटातून वैश्य आणि पायातून शूद्र निर्माण झाले ही निर्मिकाची कल्पना मांडली होती. यावर महात्मा फुलेंनी शरीरविज्ञानशास्त्राच्या आधारे टोला लगावला आणि तोंडातून ब्राह्मण निर्माण होत असेल, तर तोंडाला काय म्हणायचे? यावरून चातुर्वर्ण्यव्यवस्था किती निखालस निराधर होती हे सिद्ध होते.

या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे म्हणतात, ''ज्याअर्थी वेद हे स्स्वलनातील आणि नादातीत आहेत त्याअर्थी समाजरचनेची चातुर्वर्ण्य पद्धतीसुद्धा वादातीत आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्थेत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्रामध्ये समानता नव्हती. ब्राह्मणाने अध्ययन-अध्यापन आणि धार्मिक विधी करणे, क्षत्रियांनी लढाई करणे, वैश्यांना व्यापार आणि शूद्रांनी या तिन्ही वर्गांची सेवा करावी, असे सूत्र होते. याशिवाय व्यक्तीचे आयुष्य चार आश्रमांत विभागले होते. ब्रह्मचर्य वरील समाजव्यवस्थेत बदल घडविणे अशक्य होते. ही समाजव्यवस्था ईश्वरप्रणीत असल्यामुळे बदलता येणे शक्य नाही, हे बुद्धांना माहीत होते. ती फक्त नष्ट करून टाकणेच शक्य होते. म्हणून खऱ्या जीवनमार्गाला विरोधी म्हणून ब्राह्मणी किंवा वैदिक तत्त्वज्ञान बुद्धांनी अमान्य केले. (जाधव नरेंद्र - प्रज्ञा महामानवाची)

पद्धतीशास्त्रीय दृष्टिकोनातून सांगावयाचे झाल्यास ब्राह्मणवाद आणि बौद्धधर्म विचारातील संघर्ष हा अनुमान, कल्पना आणि तार्किक युक्तिवाद यातील संघर्ष होय. बुद्धांच्या धम्माचा वैज्ञानिक दृष्टिकोन समजून घेताना दोन्ही तत्त्वज्ञानातील फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. ब्राह्मणवादाने शतकानुशतके आत्मा आणि वैदिक अधिभौतिक संकल्पनांचा त्याग करून प्रत्येक प्रश्नाची वैचारिक पद्धतीने साधक-बाधक चर्चा करून कार्यकारणभावाच्या कसोटीवर पडताळून त्यावर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला.

### वर्णवर्चस्वी विचारांना बुद्धिप्रामाण्यवादाने विरोध

बुद्धांचा धम्म हा सर्वधर्मसमभावी असून, धम्माने ब्राह्मणवाद केंद्रित विचारांना आव्हान उभे केले. ब्राह्मणवादाला आव्हान देणारे बुद्ध हे प्रथम विज्ञानवादी विचारवंत होते. कारण ब्राह्मणवादाने मानवतेविरुद्ध सामाजिक व धार्मिक पद्धतीच्या रचनेला सुरुवात केली होती. बुद्धांना जाणीव झाली, की समाजातील काही घटकांना धार्मिक हुकूमशाहीला बळी पडावे लागत असून, एक विशिष्ट समूह किंवा जात उर्वरित समाजावर वर्चस्व निर्माण करून लोक व देव यांच्यातील आपण दुवा असल्याचे सांगत होती. ब्राह्मणवादी असा एक धार्मिक प्रवाह निर्माण करीत होते, की ज्यामुळे सामान्य माणूस ब्राह्मणांच्या हितासाठी राबेल, त्यांची सेवा करील. त्यासाठीचे त्यांचे ब्रीदवाक्य होते, 'ब्राह्मण हिताय, ब्राह्मण सुखाय' कानमंत्र दिला. यातून वर्गीय राजकीय नीतिशास्त्र जे ग्रीक विचारवंतांनी स्पष्ट केले होते. त्यांच्या विरोधात बुद्धांनी विचार मांडला. कन्यूॅशिअस, मनुसारख्या वर्णवर्चस्वी विचारांना बुद्धांनी बुद्धिप्रामाण्यवादाने विरोध केला.

## दंडनीती बुद्धांच्या न्याय संकल्पनेत नाही

डॉ. आंबेडकरांनी बुद्धांचा धम्म आणि त्यांच्या तत्त्वज्ञानाला जे सूत्रामध्ये सांगितले आहे त्यांना अधोरेखित केले. बुद्धांच्या मते, धम्म हा न्याय याचाच अर्थ धम्माधम्मांमध्ये, माणसामाणसांमध्ये जीवनाच्या सर्व क्षेत्रांत न्यायाला धरून संबंध असतो; परंतु वैदिक धर्माचा विचार करता तेथे विषमता

दिसून येते. धर्माच्या संकल्पनेची वैज्ञानिक पद्धतीने चिकित्सा केली जात नाही. बुद्धांची न्यायाची संकल्पना ही अहिंसा आणि समतेवर आधारित असल्यामुळे ती पूर्ण हिंदुत्ववादी दंडनीतीच्या विरोधात असल्याचे स्पष्ट होते. दंडनीती ही जुलमी हत्यार असल्यामुळे बुद्धांच्या न्याय संकल्पनेत बसत नाही. कारण कार्यकारण संबंध स्पष्ट केला जात नाही.

बुद्धाची धम्म संकल्पना अनेक अर्थांनी प्लेटोच्या न्याय संकल्पनांशी साधर्म्य सांगणाऱ्या आहेत. प्लेटोच्या न्याय संकल्पनेत जरी वर्गविग्रहाला स्थान असले तरी त्यामध्ये बुद्धांच्या धम्म संकल्पनेप्रमाणे मानवी समाजाच्या समस्येबाबत मानवतावादी दृष्टिकोन दिसून येतो. या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर असे लिहितात, की हिंदुत्ववादाचे अधिकृत वेदवाक्य म्हणजे विषमता होय. या विषमतेचे सुस्पष्ट उदाहरण म्हणजे चातुर्वर्ण्य पद्धती यांच्या पूर्णत: विरोधात बुद्धांनी समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला.

## चार आर्यसत्ये व अष्टांग मार्गाने मोक्षप्राप्ती

बुद्धाची बोधपद्धती विवेकावर आधारित होती. बुद्धघोष नावाच्या बुद्धानुयायी पंडिताच्या बुद्धचरित्र ग्रंथामधील सार पुढीलप्रमाणे असून, यामधून बुद्धांचा वैज्ञानिक दृष्टिकोन स्पष्ट होतो. हे भिक्षूंनाही इंद्रिये स्वाधीन ठेवण्याच्या संबंधाने दोन अतिशयित परस्परविरुद्ध असे मार्ग जनांत प्रचलित आहेत. एक असा, की ग्राम्य विषयसुखाचे अतिरिक्तपणे सेवन करून इंद्रियशांती करू पाहणे आणि दुसरा देहास नानापरी क्लेश व दु:ख होईल अशा व्रतोपवासादी तपक्षरणाच्या मार्गाचे अवलंबन करून इंद्रियदमन करू पाहणे; परंतु हे दोन्ही मार्ग अत्यंत निषिद्ध व निरर्थक होत, याचा खऱ्या ब्रह्मचर्यास वैराग्यास किंवा इंद्रिय निग्रहास काही एक उपयोग होत नाही. मोहनिवृत्ती आणि मुक्ती प्राप्त होत नाही. घोर कठोर तपश्चर्या करून देहास क्लेश आणि दु:ख देण्यात काहीच अर्थ नाही. मला मोक्षाचा एक मध्यम मार्ग सापडला आहे. त्याचा बोध सर्व जगात करण्याचा मी दृढ संकल्प केला आहे. त्यामध्ये चार आर्य सत्ये असून, तो अष्टांग आहे. या मार्गाने मोक्षप्राप्ती होईल. (केळूसकर कृष्णराव अर्जुन–गौतमबुद्धांचे चरित्र)

बुद्धांचा विज्ञानावर विश्वास होता. चमत्कार आणि गूढ विद्यावर त्यांचा विश्वास नव्हता. बुद्धांनी आपल्या शिष्यांना असे सांगितले, की त्यांनी आपल्या ठायी काही अलौकिक सामर्थ्य आहे, असे जनांस भासवून देऊन त्यांचे वचन करू नये.

## मोहरीचा सिद्धांत

एका बाईचे एकुलते एक मूल एकाकी मरण पावले. तेव्हा ती बुद्धांपाशी जाऊन म्हणाली, गुरुराज माझे मूल मृत्यू पावले आहे, ते पुन्हा उठेल असे काहीतरी औषध सांगा. बुद्ध म्हणाले, मला थोडीशी मोहरी आणून दे. तेव्हा ती हर्ष पावून मोहरी आणण्यास जाऊ लागली. जाताना बुद्धांनी तिला सांगितले, की बाई मोहरी आणशील ती ज्या घरातले कोणीही मनुष्य मेले नसेल अशा घरातून घेऊन ये. ते ऐकून ती बिचारी स्त्री मोहरीसाठी घरोघरी हिंडू लागली. प्रत्येक घरी तिने असा प्रश्न केला, की या घरात कोणी कधी मेले आहे काय? तर तिच्या प्रश्नास नाही असा जबाब कोठेही मिळेना. जो तो तिला सांगू लागला, की आमच्या कुटुंबात आजपर्यंत पुष्कळ माणसे मरण पावली आहेत. याप्रमाणे पुष्कळ हिंडून ती थकली तेव्हा तिला असा विवेक करावा, की मृर्त्सजनास मरण हे अवश्य प्राप्त होणारे आहे. यामधून बुद्धांचा विज्ञानवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. जन्म, पुनर्जन्म यावर बुद्धांनी विश्वास न ठेवता मृत्यूची विवेकवादी चिकित्सा केली आहे. (केळूसकर कृष्णराव अर्जुन : गौतम बुद्धांचे चरित्र)

बुद्धांनी आपल्या धम्मात वैज्ञानिक पद्धती अनुसरली होती. बुद्ध काळात दोन प्रकारचे लोक समाजामध्ये दृष्टीस पडत. काहींना पुरातन काळापासून चालत आलेली यज्ञयागादी कर्मे करण्यात जीवित सार्थक आहे असे वाटे, तर दुसऱ्या प्रकारच्या लोकास वाटे, की या शुष्क कर्मकांडात काहीच तथ्य नाही. यासाठी दु:खमय संसाराचा त्याग करून वनवास पत्करून ध्यानधारणा, तपश्चरण इत्यादी कामामध्ये जीवित क्षय करावा म्हणजे सौख्यप्राप्ती होईल; परंतु बुद्धांनी या उभय प्रकारच्या लोकांच्या समजुतीत व कृतीत काहीच अर्थ नाही, असे वाटून त्यांनी जीवितसार्थकाचा मार्ग काढला. त्याऐवजी मनुष्याने यज्ञादी कर्मकांड किंवा देहदंडनमूलक तपश्चरणात आपल्या अमोलिक जीविताचा क्षय करण्याचे टाकून देऊन स्वत:च्या ठायीच्या वासनांचा जय करून सदाचारी व्हावे.

बुद्ध धम्माचा बोध विवेकावर आधारित आहे. त्यामुळे तो विज्ञानवादी आहे. वैदिक काळातील देवधर्म, अंधश्रद्धा, चमत्कारिक गोष्टी, विसंवाद यावर बुद्ध म्हणतात,

''तुम्ही जे काही ऐकत आला आहात ते सारे सत्य आहे, असे मानू नका. ज्या गोष्टी पितृपुत्र परंपरेने चालत आलेल्या असतात किंवा ज्या केवळ दंतकथारूपाने जनांत रूढ झालेल्या असतात त्यावर श्रद्धा ठेवू नका, कोणत्याही गोष्टी पुष्कळ लोकांच्या तोंडी आहेत म्हणून त्या खऱ्या आहेत, असे सहसा मानू नका, एखाद्या पुरातन साधूने एखादी गोष्ट लिहून ठेवली आहे, म्हणून त्यावर भरवसा ठेवावा, असे कदापि समजू नका. कोणतीही गोष्ट तुमचे गुरू किंवा वडील माणसे सांगतात म्हणून ती खरी वाटून घेऊ नका, तर योग्य अवलोकन व सत्यासत्या विमर्षण करून ते विवेकास अनुसरून आहे, असे सिद्ध होईल व जे सदाचार प्रवृत्ती वाढविणारे असून, एकंदर जनसमाजाचे हित करणारे आहे, असे दिसेल. त्याचा अंगीकार करून स्वर्तव ठेवण्याचा प्रयत्न करा.'' थोडक्यात, बुद्धांनी ग्रंथप्रामाण्य व आत्मवचनप्रामाण्य याविषयी निकाल लावून विवेकाला प्राधान्य दिले.

■■■

**(लेखक शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील राज्यशास्त्र विभागाचे माजी प्रोफेसर आहेत)**

# भावचक्र : प्रतित्यसमुत्पाद सिद्धांत समजून घेण्याचा सोपा मार्ग

**बुद्ध विषमतावादी कर्मविकाप सिद्धांताला कसा विरोध करतो, याची सूत्रबद्ध मांडणी प्रतित्यसमुत्पाद या सिद्धांतात दिसून येते. भावचक्र त्या सूत्राचा साधा, सोपा, सरळ आकृतीबंध आहे.**



प्रा. जी.के. ऐनापुरे

भावचक्र समजून घेतल्यास प्रतित्यसमुत्पाद हा सिद्धांत समजून घेण्यास अधिक सोपे जाते. भावचक्र चार वर्तुळांत विभागलेले आहे. पहिले वर्तुळ काळ दर्शवणारे, दुसरे वर्तुळ आयुष्यातील क्रियाशीलता आणि निष्क्रियतेची बाजू आणि अवकाश दाखवणारे आहे (Active and passiveside of Life/Space). तिसरे वर्तुळ कृती अशा अर्थाने साखळीतील घटकांचे म्हणजे निदानांचे अस्तित्व दर्शवणारे. शेवटचे म्हणजे चौथे वर्तुळ घटकांचा क्रम आणि अस्तित्वात येणारी योग्य कृती (दुःखापासून सुटका अशा अर्थाने).

## धर्मापासून धम्मापर्यंत

पहिल्या वर्तुळातील काळ आणि अवकाश यातील विभागणी अधिकच स्पष्ट होते. भूतकाळ-भविष्यकाळ यातील अवकाश विभाजन सारखे आहे, तर वर्तमानाचा अवकाश या दोन्ही काळाच्या अवकाशापेक्षा मोठा आणि दुप्पट आहे. बुद्ध अनात्मवादी असल्याने जग निर्माण करणारा आणि त्याची अद्भुतता (ब्रह्म/ब्रह्मांड) अशा थोतांडांना मान्यता देत नाही. त्या अर्थाने भूत-भविष्याला भावचक्रात दिलेला अवकाश योग्य आहे. दुःखाच्या उत्पत्तीत या दोन्ही काळाचा आनुवंशिकता (Heredity) अशा अर्थाने कोणताच संबंध नाही. वर्तमानात केलेल्या व्यवहारावर भूतकाळ आणि भविष्यकाळ या नित्यतेची भीती बुद्ध दूर करतो. काळातला प्रत्येक क्षण अनित्य असतो. यातून परंपरा नित्य असते. असे ठळक करून शोषण आणि वर्चस्वाला अबाधित ठेवणाऱ्या समूहासाठी परंपरा अनित्य असे म्हणणे कधीही सोईचे असणार नाही. काळ आणि परंपरा म्हणजे धर्म या प्रस्थापित सूत्राचे विसर्जन बुद्धाने विज्ञाननिष्ठेने दूर केले आहे. अनित्यता आणि काळ म्हणजे धम्म अशा एका नव्या सूत्राला काळ आणि अवकाशाच्या पटलावर बुद्ध ठेवतो. वर्तमानाने व्यापलेला अवकाश पाहता, बुद्ध कर्मविपाकाच्या अर्थाला परंपरेच्या बाहेर काढतो. येथे पुनर्जन्माच्या मांडणीचा विचार जसा वेगळा होता, तसाच तो येथेसुद्धा आहे. ब्राह्मणी समूह तत्त्वज्ञान आणि धर्माच्या साह्याने, कर्मविपाकाच्या साह्याने वर्णजातिव्यवस्था प्रस्थापित करू पाहत होते. बुद्ध अनात्म, अनित्यता, अष्टांगमार्ग याचा आधार घेत समतेचा उपदेश करीत होता. कर्मविपाक सिद्धांताला समता/बुद्ध व विषमता/ब्राह्मण असे दुहेरी रूप प्राप्त झाले. बुद्धाने परंपरा निवडीतील स्वातंत्र्य अशा पद्धतीने धर्मापासून धम्मापर्यंत आणले. काळ आणि अवकाश यामध्ये अस्तित्वात येणाऱ्या वस्तूंचा संबंध कर्माबरोबर कसा येतो, हे नागसेनाने नामरूपांचा आधार घेऊन अधिकच स्पष्ट केले आहे.



**भन्ते! कोण जन्म घेतो?**

**महाराज! नाम (विज्ञान वा मन) व रूप (देह)**

**काय हेच नाम-रूप जन्म घेते?**

**महाराज! हेच नामरूप जन्म घेत नाही. माणूस या नामरूपाने**

**पाप-पुण्य करतो व त्या कर्माने दुसरे नाम-रूप जन्माला येते (२०१८:२६)**

थोडक्यात, बुद्ध विषमतावादी कर्मविकाप सिद्धांताला कसा विरोध करतो, याची सूत्रबद्ध मांडणी प्रतित्यसमुत्पाद या सिद्धांतात दिसून येते. भावचक्र त्या सूत्राचा साधा, सोपा, सरळ आकृतीबंध आहे. असे असले तरी काळ आहे आणि काळ नाही, असे विधान बौद्ध वाङ्मयात सर्रास आढळते.

## दुःखाच्या उत्पत्तीचा अर्थ

दुसऱ्या वर्तुळात सक्रियता-निष्क्रियता अशी विभागणी येते. ती अर्धवर्तुळातसुद्धा विषम अशी दिसून येते. भूत-भविष्यकाळात ही विभागणी समान अशी दिसून येते. भविष्यकाळात जीवनाची निष्क्रियता साखळीतील विज्ञान-नामरूप-षडायतने-स्पर्श-वेदना या निदानाशी जोडून येते. तर भूतकाळातील सक्रियता तृष्णा-उपादान-भव या घटकांना जोडलेली दिसते. वर्तमानकाळात निष्क्रियता ३-४-५-६ या निदानांना, तर सक्रियता ८-९-१० या निदानांना जोडलेली दिसते. निष्क्रियता ज्या घटकांना, निदानांना जोडलेली आहे त्यावरून अस्तित्वात आलेल्या अवकाशाची कल्पना येते. तुलनात्मकदृष्ट्या पाहिल्यास हा सक्रियतेचा अवकाश त्याला जोडलेल्या निदानानुसार अभ्यासता येतो (तृष्णा-उपादान-भव). भावचक्राची अर्धवर्तुळात विभागणी केल्यास भूतकाळ (सक्रिय)-वर्तमानकाळ (निष्क्रिय), भविष्यकाळ (निष्क्रिय)-वर्तमानकाळ (सक्रिय) अशा दोन शक्यता दिसतात. यात काळ आणि कर्म यांतील सहबंधानुसार दुःखाची उत्पत्ती कशी होते याचा अर्थ लागतो.

तिसरे वर्तुळ भूत-भविष्यकाळाशी अधिक जोडलेले आहे. त्याचा संबंध निष्क्रियता-सक्रियता याच्याशीसुद्धा जोडलेला आहे. भविष्यकाळाला जोडलेले (५ घटक), भूतकाळ (३ घटक) अशा आठ घटकांचे/निदानांचे अस्तित्व दुसऱ्या वर्तुळात अधिक ठळक दिसते. तर वर्तमानकाळाशी (सक्रिय-निष्क्रिय) असलेला बराच मोठा अवकाश इथे मोकळा आहे. या वर्तुळाशी आरंभ (अविद्या) आणि शेवट (जरामरण दुःख), भूतकाळ (सक्रिय)-भविष्यकाळ (निष्क्रिय) हाही जोडलेला आहे, अगदी केंद्रबिंदूपासून.

## घटकातील जोडपणा

शेवटच्या वर्तुळात बारा घटक (निदान) क्रमाने आलेले दिसतात. अविद्येपासून सुरू झालेला दुःखाचा प्रवास जरामरणापर्यंत संपून जातो. हा प्रवास भूतकाळ (सक्रिय) ते भविष्यकाळ (निष्क्रिय) असा चालू राहतो. भावचक्राचे अस्तित्व अशा पद्धतीने टिकून राहते. त्या संदर्भातील कारणमीमांसा, त्यातील क्रम या संदर्भात अगोदरच्या विवेचनात सांगितलेले आहेच. ते पुन्हा येथे सांगत नाही. घटकांतील (पुढच्या आणि मागच्या) जोडपणा (Articulation) कसा कार्यकारणभावासह अस्तित्वात येतो, हे भावचक्रात पाहता येईल. त्या अर्थानेच ही चारही वर्तुळे एकमेकांशी जोडलेली आहेत. या शेवटच्या वर्तुळातील सगळ्यांत महत्त्वाचा भाग म्हणजे दुःखाचा निरोध, पुनर्जन्म या अर्थाने दोन निदानातील जोडपणाच्या शक्यता. या शक्यता तीन ठिकाणी भावचक्रात दिलेल्या आहेत.

**१ : संस्कार + विज्ञान (२+३)**
**२ : वेदना + तृष्णा (७+८)**
**३ : उपादान + भव (१०+११)**

वर सांगितलेल्या तिन्ही शक्यता दुःखाचा निरोध अशा अर्थाने पाहिल्या असता, अनेक सांस्कृतिक व्यवहारांचे अडथळे पार करून दुःखमुक्ती साधता येते, याचा अंदाज हाताला लागतो. अविद्या या निदानापासून सुरू झालेला दुःखाचा प्रवास मृत्यूपर्यंत येऊन थांबतो. ही साखळी तोडायची असेल, तर पहिली शक्यता संस्कार आणि विज्ञान यांना जोडून येते. दुःखाची कारणमीमांसा, खोलवर शोध, सुटण्याचा मार्ग याची शक्यता या पहिल्या संयोगात दिसते. येथे संस्काराचा अर्थ लावताना आत्मवाद आणि अनात्मवाद असा मुख्य पेच आहेच. ज्ञानेंद्रियांच्या मार्गे जाणिवा कशा अस्तित्वात येतील, यातून झालेले ज्ञान यातून हा पेच सोडवता येईल. बुद्धाने अनात्मवाद स्वीकारून हा पेच पूर्वार्धात सोडवलेला आहे. सामान्य माणूस आत्मवादाच्या नादाला लागल्याने धर्मसत्ता बळकट होऊन अविद्येच्या प्रवेशद्वारातून दुःखाचा प्रवास सुरू होतो. आता हे दोन्ही घटक भूतकाळाला जोडलेले असल्याने पूर्वपरंपरा अशा अर्थाने धर्म अविद्येकडे, आत्मवादाकडे घेऊन जातो. तर हे सगळं समजून घेण्याच्या दृष्टीने संस्कार महत्त्वाचे. परंपरा खंडित करण्याचे सामर्थ्य नव्या संस्कारांतून, ज्ञानाच्या संकरातून प्राप्त करता येतात. जाणिवा त्यासाठी कारणीभूत ठरतात. म्हणून हा पहिला संयोग दुःखाची उत्पत्ती थांबवू शकतो. त्याची तीव्रता कमी करू शकतो. भावचक्रामध्ये भूतकाळाला जोडलेली सक्रिय बाजू आहे आयुष्याची. दुःख गेल्या जन्माचे कर्म या विश्वासाला तडा जातो. तुम्ही या दुःखापासून बाजूला होऊ शकता. त्याला बगल देऊ शकता. तिसऱ्या वर्तुळातील तृष्णा, उपादान, भव हे घटकसुद्धा या संयोगाला जोडून आहेत.

## दुःखमुक्तीचा मार्ग


दुसरी शक्यता वेदना+तृष्णा या संयोगाला जोडून आहे. तृष्णा हे दुःखाचे मूळ आहे, हे बुद्धाने सांगितले आहे. शारीरिक, मानसिक मर्यादा न स्वीकारल्याने दुःखाची उत्पत्ती होते. मर्यादा न स्वीकारणे ही तृष्णा आहे. या तृष्णेच्या सततच्या जाचाने वेदना तीव्र होतात. तृष्णेचा त्याग करून निर्वाणापर्यंत जाणे हा दुःखमुक्तीचा मार्ग आहेच, प्रव्रज्या हा निर्वाणाच्या अगोदरचा आणखी एक मार्ग. थेरीगाथा या ग्रंथात थेरींनी सांगितलेले वेदना आणि तृष्णेचे अनुभव, त्यातून सुटका करून घेण्याचे प्रयत्न; या संयोगाच्या संदर्भात विस्ताराने येथे सांगता येतील. तृष्णेचा त्याग, प्रव्रज्या, निर्वाण हे मार्ग वेदना आणि तृष्णा, मानवी शरीर असा विचार केल्याने हाताला लागतात. त्यामुळे हा दुसरा संयोग (७+८) हा दुःखमुक्तीचा प्रभावशाली मार्ग आहे. तिसरी आणि शेवटची शक्यता भव-जाती यातील

संयोगातून निर्माण होते, असे भावचक्रात दाखवले आहे. दुःखाची जाणीव झाल्यानंतर त्या संदर्भात सक्रियता दाखवणे, योग्य दिशेला विज्ञान आणि संस्कार याचा आधार घेऊन वाटचाल केल्यास दुःखमुक्ती म्हणजे नवा जन्म होतो. त्याला जाती असे म्हटलेले आहे. बुद्धाने पुनर्जन्म म्हणजे दुःखातून सुटका असा अर्थ घेतलेला आहे. भावचक्रामध्ये जाती आणि जरामरण दुःख हे घटक एकापाठोपाठ येतात. त्याचे मुख्य कारण जन्म-मृत्यू-पुनर्जन्म हे दुःखातून मुक्त करून घेण्याचे, नव्या पर्वाला अस्तित्वात आणण्याचे उपायच आहेत. हे पुन्हा अविद्येला जोडले गेल्यास भावचक्रातील सातत्य नव्याने गती घेते.

भावचक्राच्या अनेक आकृत्या आहेत. आत्मवादी तत्त्वज्ञान सांगणाऱ्यांनी या आकृत्यांचे विरूपण करून त्यात अद्‌भूतता आणि चमत्काराला जागा दिली. त्यातून विज्ञानाला वजा केले. भावचक्राचे विवेचन ज्या आकृतीवर आधारित आहे, ती आकृती तिबेटीयन स्कूलची आहे. तिच्यातला साधेपणा पाहता येण्यासारखा आहे. बऱ्याचदा साखळीतील घटकांसाठी (निदानासाठी) चिन्हे वापरण्याचा प्रघात आहे. अशा प्रकारचे भावचक्र अस्तित्वात आहे. प्रत्येक निदानासाठी त्याचे चिन्ह खालीलप्रमाणे...

| निदान | चिन्ह |
|---|---|
| १) अविद्या | चालणारा आंधळा माणूस किंवा वस्तूला ध्यानपूर्वक बघणारा माणूस |
| २) संस्कार | जगण्याला आकार देणारा कुंभार |
| ३) विज्ञान | फळ पकडणारा माणूस किंवा माकड |
| ४) नामरूप | बोटीतून प्रवास करणाऱ्या दोन व्यक्ती |
| ५) षडयातने | सहा खिडक्यांच्या पलिकडे राहणारे |
| ६) स्पर्श | संपर्कात असलेले, जुळलेले, चुंबनात व्यस्त असणारे प्रेमी युगल |
| ७) वेदना | डोळ्याच्या दिशेने चाललेला बाण |
| ८) तृष्णा | मद्यधुंद, मद्य घेणारा |
| ९) उपादान | फळाची निवड करणारे माकड किंवा माणूस |
| १०) भव | मिथुनात मग्न असलेले युगल |
| ११) जाती | बाळाला जन्म देणारी स्त्री |
| १२) जरामरण | वाहून नेले जाणारे प्रेत |

The Wheel of Life




## भारतीय कालमापन

प्रतित्यसमुत्पाद सिद्धांतातील हे बारा निदानांचे किंवा घटकांचे प्रकरण हिंदू आणि ख्रिश्चन धर्मामध्ये अनुकरणाचा भाग अशा अर्थाने विखुरलेले आहे. इंग्रजी बारा महिने, मराठी बारा महिने, बारा राशी आणि त्यांचे चक्र अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

कालमापनाचा आरंभबिंदू बुद्धापासून सुरू व्हावा, असा अनेक वर्षांपासूनचा जो आग्रह आहे, त्याचे मुख्य कारण हेच असावे. याला भारतीय कालमापन म्हणता येईल. त्यामुळे इतिहासातील अग्रक्रमामुळे जन्माला आलेल्या अनेक चुका क्रमवारी अशा संदर्भाने दुरूस्त, अर्थवाही होतील. अशा अर्थाने या सिद्धांताचे महत्त्व आहे. भावचक्र हा सिद्धांत समजून घेण्याचा सोपा मार्ग आहे. ■■■

**(लेखक ज्येष्ठ साहित्यिक व समीक्षक आहेत.)**

# हायकूमध्ये बाबासाहेब उलगडून सांगणारा जगातील पहिला संग्रह : हायकू भीमाचे




किरण डोंगरदिवे

**शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ज्ञान आणि वैचारिक शक्ती ओळखली. बाबासाहेबांच्या डोक्यावर मानाची पगडी घातली आणि तिथून एका नव्या अध्यायाला सुरुवात झाली. ही परिवर्तनाची सुरुवात म्हणजे ज्ञान आणि विचारांची नवी सकाळ होती. तुकाराम खिल्लारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अरे ला कारे असे उत्तर देणे, अत्याचाराचा आणि अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे, शिकणे, संघटित होणे यासोबतच संघर्ष केला पाहिजे, या मंत्राचा आपल्या रचनेमध्ये उल्लेख केला आहे.**

मराठी काव्यक्षेत्रात वेगवेगळे काव्यप्रकार सातत्याने वापरले जातात. ओवी, पोवाडा, लावणी, गीत, गजल, रुबाई, सुनीत ते अगदी मुक्तछंद अशा काव्यप्रकाराच्या सोबत मराठीत हायकू हा काव्यप्रकारही आता बऱ्यापैकी स्थिरावला आहे. तसा मूळचा हा जपानी काव्यप्रकार असून, अतिशय वेगळा म्हणावा असा फक्त तीन ओळींची मर्यादा आणि त्यातही शब्दबंधन असलेला हा प्रकार आहे. रचनेच्या अनुषंगाने पहिल्या ओळीत पाच शब्द, दुसऱ्या ओळीत सात आणि तिसरी ओळ पुन्हा पाच शब्दांची! अशी एकूण फक्त सतरा शब्दांचीच कविता असते. अर्थात. गजलचा एक शेर हा परिपूर्ण कविता असू शकतो त्याप्रमाणे एकाच विषयावरील चार-पाच हायकू म्हणजे एक कविता असे काही जण समजतात. मात्र, एक हायकू म्हणजे स्वतंत्र कविता असते, हे ध्यानी ठेवले पाहिजे. १७ व्या शतकातील जपानी विचारवंत आणि कवी मात्सुओ बाशो यांनी हायकूचा मोठ्या प्रमाणात प्रसार आणि प्रचार केला.

हायकूमध्ये पूर्वीपासूनच शब्दांची बंधने पाळली जात होती आणि कोणत्याही दोन ओळीत यमक साधले जात होते. शक्यतो हायकूमध्ये निसर्ग बिंब आले म्हणजे त्या हायकूस चांगले समजले जायचे. पुढे हायकूचा प्रसार जगभर झाल्यामुळे हायकूमधे वेगवेगळे विषयही व्यक्ती तितक्या प्रवृत्ती या उक्तीनुसार येऊ लागले. राजकारण, समाजकारण आणि कवितांचा मुख्य विषय प्रेम व विरह सर्व विषयांवर हायकू लिहिले जातात. मराठीमध्ये आचार्य अत्रे यांची कन्या शिरीष पै यांनी हायकूची खरी ओळख करून दिली. मात्र, असे असले तरी कुणा एका व्यक्तीचे जीवन आणि जीवनकार्य याला समर्पित असा हायकूसंग्रह कुणी काढला नसावा. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना साहित्याच्या सर्व प्रकारात लेखक आणि कवींनी शब्दांकित केले असले तरी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर कुठेमुठे एखादा दुसरा हायकू वगळता एकत्रित असा मराठीत हायकूचा संग्रह आजवर कुणी काढला नव्हता; ती उणीव भरून काढत तुकाराम पुंडलिक खिल्लारे यांनी एकाच वेळी व्यक्तीविशेष असा एकाच विषयाला समर्पित हायकूसंग्रह संपादित करून मराठी हायकूमधील एका विशिष्ट विषयाला घेऊन एकत्रित असा हायकूसंग्रह मराठी साहित्याला देणे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रथमच हायकूमधून जीवनदर्शन घडविणे, असे महत्त्वाचे कार्य केले आहे. महाराष्ट्रातील विविध हायकूकारांना एकत्र घेऊन हायकू भीमाचे हा हायकूसंग्रह तुकाराम खिल्लारे यांनी मराठी साहित्यात मोलाची



भर टाकत निर्माण केला आहे. डॉ. आंबेडकर यांना प्रेरणास्थानी ठेवणाऱ्या तुकाराम खिल्लारे यांनी 'असे हे माझे हायकू' या नावाने सुंदर हायकूसंग्रह काढलेला असून, चला हायकू शिकू या व्हॉटस्ॲप समूहाच्या उपक्रमांतर्गत अनेक हायकूकार एकत्र आणले आहेत. 'हायकू भीमाचे'मध्ये आलेले हायकू तुकाराम खिल्लारे यांनी स्वतः तपासून दुरुस्ती करून संग्रहात घेतले आहेत, यावरून त्यांची बाबासाहेब आणि हायकू दोन्हींवर किती श्रद्धा आहे, हे दिसून येते.

हायकू भीमाचे या हायकू संग्रहात ११२ हायकूकारांचे त्यांच्या परिचयासह ७ हायकू समाविष्ट केले आहेत. हायकू भीमाचे या हायकूसंग्रहामध्ये तुकाराम खिल्लारे यांनी महाराष्ट्रातील सर्व भागांतील नवे-जुने कवी यांना हायकू लिहिण्यास प्रवृत्त केले. ज्यांच्या रचना निकोप होत्या त्यांना सहज स्वीकारले आणि त्यात काही बदल करावे लागतात त्याठिकाणी आशय न बदलता फक्त तांत्रिकदृष्ट्या बदल करून यामध्ये समाविष्ट करून घेतले. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर अनेकांनी अनेक पैलूंनी लिखाण केले आहे. त्याची प्रचीती हायकू संग्रह वाचताना येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनापासून त्यांच्या परिवारातील सदस्य, रामजी, रमाबाई, यासोबत बाबासाहेबांनी खस्ता खात घेतलेले शिक्षण, राजर्षी शाहू महाराज, यांचे संदर्भ आणि संबंध, जाती निर्मूलनासाठी दिलेला लढा, चवदार तळे, संविधान लेखन, असे अनेक विषय या संग्रहामध्ये हायकूकारांनी हाताळले आहेत. अनेकदा काही ठरावीक मुद्यांवरच रचना आढळून आल्यामुळे तोचतोपणा आलेला दिसून येतो. मात्र, १०० पेक्षा जास्त लोकांच्या वेगवेगळ्या ठिकाणी तयार केलेले हे हायकू असल्यामुळे पुनर्प्रत्यय स्वाभाविक आहे, असे वाटते. मात्र, काही रचनाकारांनी जाणीवपूर्वक आपल्या रचनेमध्ये नावीन्य पेरले आहे. बाबासाहेबांच्या जीवनात शाहू महाराजांचे एक अनन्यसाधारण महत्त्व आहे, ते अधोरेखित करताना 'हायकू भीमाचे'चे संपादक हायकूकार तुकाराम खिल्लारे म्हणतात,

***भीमाच्या डोई***
***पगडी शाहूजींची***
***प्रभा प्रज्ञेची***

शाहू महाराजांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील ज्ञान आणि वैचारिक शक्ती ओळखली. बाबासाहेबांच्या डोक्यावर मानाची पगडी घातली आणि तिथून एका नव्या अध्यायाला सुरुवात झाली. ही परिवर्तनाची सुरुवात म्हणजे ज्ञान आणि विचारांची नवी सकाळ होती. तुकाराम खिल्लारे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अरे ला कारे असे उत्तर देणे, अत्याचाराचा आणि अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे, शिकणे, संघटित होणे यासोबतच संघर्ष केला पाहिजे, या मंत्राचा आपल्या रचनेमध्ये उल्लेख केला आहे. स्वतः संपादक असून, तुकाराम खिल्लारे यांनी स्वतःचे भराभर हायकू या संग्रहामध्ये घेतले नाहीत, याबद्दल त्यांच्यातील मोठ्या मनाच्या साहित्यिकाला सलाम करावा वाटतो. कारण आजच्या काळामध्ये अनेकदा स्वतःचे अधिकाधिक खपवण्याचा प्रकार दिसून येतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनातील पंधरा ते वीस महत्त्वाच्या मुद्द्यांवर सर्व रचनाकारांनी आपल्या रचना लिहिल्या आहेत. त्यामुळे एकंदरच रचनांमध्ये तोचतोपणा आणि पुनरावृत्ती मोठ्या प्रमाणात झाल्याचे आढळून येते. संपूर्ण संग्रहामध्ये बाबासाहेबांचा विठ्ठल मंदिर प्रवेश, काळाराम मंदिर प्रवेश, भाकरा नांगल धरण निर्मितीमधील सहभाग, दादासाहेब गायकवाड, बॅरिस्टर खोब्रागडे, नवल भनेथा, येवला येथे केलेली धर्मांतराची घोषणा, दीक्षाभूमी, चैत्यभूमी, बाबासाहेबांचे परदेशातील दिवस, सयाजीराव महाराज गायकवाड यांच्यासंदर्भातील अवतरणे, रघुनाथ धोंडो कर्वे यांच्यासाठी समाजस्वास्थ्य या विषयावर लढलेला खटला, श्रीधर टिळक किंवा सहभोजनाचे कार्यक्रम, माईसाहेब आंबेडकर यांचा उल्लेख, भारताचे पहिले कायदेपंडित म्हणून केलेले कार्य, इतकेच काय तर गांधी करार अशा खूप गोष्टी या संग्रहामध्ये आढळत नाहीत. तुकाराम खिल्लारेंसारख्या बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांना केंद्रस्थानी मानून चळवळीशी निगडित असलेल्या साहित्यिकाने एकट्याने जरी बाबासाहेबांचा जीवनपट आणि कार्य समोर ठेवून हायकू लिहिले असते तरी बाबासाहेब आंबेडकरांचे जीवनचरित्र हायकूच्या माध्यमातून मराठी रसिकांना वाचायला मिळाले असते, असे मला प्रांजळपणे नमूद करावे वाटते. ११२ साहित्यिकांच्या प्रत्येकी सात म्हणजे जवळपास ७८४ हायकू या ग्रंथामध्ये समाविष्ट असूनही बाबासाहेब आंबेडकरांबद्दल सर्वश्रुत असलेल्या वीस-पंचवीस मुद्यांपेक्षा नवीन काही हाती लागत नाही. यावरून आजची पिढी खोलात जाऊन नावीन्यपूर्ण असे काही दिले पाहिजे, असा विचार करायला तयारच नाही, असे वाटते. बाबासाहेब म्हणजे जातीअंताची लढाई, संविधानाचे लिखाण, मागासलेल्या जातींमध्ये जन्मल्यामुळे खाल्लेल्या खस्ता, चवदार तळे, मंदिर प्रवेश या पलीकडे आपली विचारशक्ती पोहोचत नाही की काय? असा चिंतन करायला लावणारा प्रश्न उपस्थित होतो. अर्थात, रचनाकारांच्या मर्यादित मुद्दे आणि संदर्भ यांच्या वापरामुळे तुकाराम खिल्लारे यांनी हायकू भीमाचे या संपादित हायकू संग्रहासाठी घेतलेली मेहनत आणि कष्ट दुर्लक्षित करता येत नाहीत. असे प्रयोग मराठीमध्ये फार तुरळकपणे आढळतात. जवळपास संपूर्ण विश्वामध्ये एखाद्या भाषेत फक्त एकाच व्यक्तीच्या कार्यकर्तृत्वावर इतक्या मोठ्या प्रमाणात हायकूलेखन ही तुकाराम खिल्लारे यांनी मराठीला दिलेली मोठी उपलब्धी आहे, असे आवर्जून नमूद करावे वाटते. त्यांच्या एकंदर साहित्यिक कार्यास मनापासून शुभेच्छा देत, 'हायकू भीमाचे' संग्रहाचे मराठी हायकूप्रेमी आणि मराठी रसिक भरभरून स्वागत करतील, ही अपेक्षा! ■■■

**हायकू भीमाचे (हायकूसंग्रह)**
**संपादक : तुकाराम खिल्लारे**
**मोबाइल : ८८३०५९९६७५**
**प्रकाशक : अनुदिन प्रकाशन, परभणी**
**पृष्ठे : १२०**
**किंमत : १४०**

आज-कालचे प्रश्न

# कोणी तरी आहे जागे...



कोणतेही राष्ट्र असो, त्यासाठी प्रशासन हा कणा असतो. लोकशाहीव्यवस्थेत तर प्रशासनाला आणि त्यातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना तर अधिक महत्त्वाचे स्थान असते. देश आणि समाजासाठीच्या धोरणांची अंमलबजावणी करणे, देश ज्या वाटेवरून चालतो तेथील वाटा आणि वळणे पाहणे, राष्ट्रपती किंवा राज्यपालांच्या राजवटीत देशच सांभाळणे आदी महत्त्वाची कामे प्रशासनावर म्हणजे नोकरशाहीवर असतात. नोकरशाही बरी-वाईट संस्कृती घडवत असते. त्यासाठी लोकांचे अंतरंग-बाह्यरंग समजून घेत असते. ती स्थायी असल्याने समाजाचे अश्रू आणि हसूही तिला समजून घ्यावे लागतात. बऱ्याच वेळेला या अपेक्षा वास्तवात दिसत नाहीत. नोकरशाहीही पिळवणुकीचे एक साधन बनून जाते. ती गलेलठ्ठ बनते आणि समाज दुर्बल बनतो. अर्थात, सत्ताधारी आणि लोकप्रतिनिधी यांच्यात नको तेवढी दिलजमाई होते. दोघे मिळून कोणाच्या तरी एकाच्याच नावाने श्वास आत-बाहेर सोडतात, तेव्हा असे घडते. नोकरशाही स्वतःचे रूपांतर मालकशाहीत-देवादिकात करते, तेव्हा असे घडते. नोकरशाही शोषकशाही आणि सत्ताधाऱ्यांसाठी मुजरेशाही बनते, तेव्हा असे घडते. मग लोक उच्चपदस्थांना पांढरे हत्ती म्हणतात. ते उन्हा-तान्हात न जाता सदैव सावलीत आणि पंख्याखाली बसतात, त्यांचा रंग बदलतो. ते पांढरे होतात. म्हणजे पांढरे हत्ती होतात. इंग्रजांची नोकरशाही बरी होती, असे आजही म्हणणारे काही कमी नाहीत.

पण हे जरी खरे असले, तरी राज्यघटनेला जबाबदार असणारे, देशाचा विचार करणारे, समाजात तयार होणाऱ्या ताण्याबाण्यांना सूक्ष्म पाहणारे काही अधिकारी आजही आहेत. सरसकट काही बिघडलेले नाही आणि बिघडत नसते. राज्यघटनेत तरतूद असणारे पण तेथेच चिकटून असलेले कलम शेषन यांनी बाहेर काढले आणि प्रत्येक नागरिकास ओळखपत्र दिले. शेषनऐवजी कार्डशेषन अशी त्यांची ओळख झाली. देशभरातील गरीब आणि भुकेल्या विद्यार्थ्यांना घासभर खिचडीची योजना आखणारे तेच आहेत. कोरोनाकाळात लढत होती ती नोकरशाहीच होती. तिचे अनेक विधायक चेहरे लोकांनी पाहिले आहेत.

गेल्या दहा-बारा वर्षांत देशात जे काही घडते आहे त्याविषयी कोणी बोलू शकत नाही. मोठ्या आवाजात तरी अजिबात बोलू शकत नाही. अभिव्यक्तीभोवती कसले तरी गडद रंगाचे ढग जमा झाले आहेत. आपल्याला देशद्रोही, धर्मद्रोही ठरवतील अशी भीती त्यांच्या मनात असते. अनेकांच्या बाबतीत असे घडते किंवा घडलेही आहे. जेव्हा एखादा पक्ष, संघटना सैतानी म्हणजे अगदीच प्रचंड बहुमत घेऊन सतत आणि सर्वत्र निवडून येते, तेव्हा तिच्यात कळत-नकळत एकाधिकारशाहीही जन्माला येते. याची अनेक उदाहरणे आपण देशात आणि जगभर पाहिलेली आहेत. राज्यघटनेऐवजी सरकारला आणि राष्ट्राच्या नावाने राष्ट्रवादाला महत्त्व येते. त्यातून बहुसंख्य आणि अल्पसंख्य असा पेचही तयार होतो. राष्ट्रवादाच्या आणि राष्ट्रद्रोहाच्याही नव्या व्याख्या तयार होतात. शासनाच्या सर्व व्यवस्थांवर त्याचा परिणाम व्हायला लागतो. बहुमत म्हणजेच लोकशाही आणि बहुमत म्हणजेच सरकार, बहुमत म्हणजेच पक्ष आणि बहुमत म्हणजेच अजोड नेता, असे सांगितले जाऊ लागले. या सर्वांतून लोकशाही, सलोखा आणि राज्यघटनेचा संकोच व्हायला लागतो. सर्व व्यवस्थांवर आपलाच रंग फिरवण्याचे प्रयोग चालू होतात. शाळकरी पोरांच्या पाठ्यपुस्तकापासून ते धर्मस्थळांपर्यंत, वर्षानुवर्षे कोणत्याही हेतूने टिकवून ठेवलेल्या कायद्यापासून ते न्यायव्यवस्थांपर्यंत कुठेही शिंतोडे उडू शकतात. या सर्वांचे मुख्य कारण असते लोकांनी दिलेले बहुमत. प्रत्यक्षात लोकशाहीमध्ये बहुमतवाल्यांइतकेच अल्पमतवाल्यांना, सरकारइतकेच विरोधकांना महत्त्व असते, हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कधीच सांगून ठेवले आहे. समाजातील भेदभाव संपणार नसतील, तर लोकशाही टिकून राहणे अवघड आहे, हेही त्यांनी म्हटले आहे. या सर्व पार्श्वभूमीवर समाजात वेगवेगळ्या ठिकाणी घुमसत असणारा धूर, भावना यांचा विचार करून देशातल्या महत्त्वाच्या; पण निवृत्त असलेल्या एकशेआठ अधिकाऱ्यांनी थेट पंतप्रधानांना पत्र लिहून देशात जे काही चालले आहे, त्याचा आम्हाला संताप येतो आणि तो नाइलाजाने आम्हाला व्यक्त करावा लागत आहे, असे त्यात लिहिले आहे. याचाच अर्थ कोणीतरी जागे आहे, कोणी तरी गांभीर्याने पाहतेय, कोणी तरी नाराजी व्यक्त करतेय आणि कोणी तरी त्यासाठीचे धाडसही व्यक्त करतेय...

ज्यांनी-ज्यांनी पत्रावर सह्या केल्या आहेत ते-ते त्यांच्या त्यांच्या कारकीर्दीतले नामवंत आहेत. बेडरपणे त्यांनी आपली कर्तव्ये पार पाडली होती. सत्ताधाऱ्यांच्या रथाला खांदा देऊन झिलकरी बनवण्याचे काम त्यांनी केले नव्हते. या काही

अधिकाऱ्यांत माजी पोलीस अधिकारी ज्युलियस रिबेरे, मीरा बोरवणकर, रवी बुद्धिराजा, अण्णा दाणी आदी काहींचा समावेश आहे. निवृत्तीनंतर यापैकी कोणी वशिला लावून राज्यसभा सदस्यत्व स्वीकारलेले नव्हते, जसे एका न्यायमूर्तींनी केले आहे. खरे तर, हे न्यायमूर्ती काही काळ बंडोबासारखे वागले आणि नंतर थंडोबा झाले होते, हेही सर्वांनी पाहिले आहे.

तर या अधिकाऱ्यांनी राग व्यक्त करताना पहिली गोष्ट सांगितली आहे आणि ती म्हणजे, संविधानाची मूळ चौकट विस्कटवली जात आहे. अतिशय शांतपणे आणि उघडपणे. विशेष म्हणजे, राज्यघटनेच्या घोषणाही देत तिच्या मूळ ढाच्याला धक्के दिले जात आहेत. ही राज्यघटना आम्ही भगवी करू, असे सत्ताधाऱ्यांच्या मांडीवर खेळणारे काही सांगत आहेत. देश राज्यघटनेवर उभा आहे आणि राज्यघटना नागरिकांचा श्वास आहे. या गोष्टीवर जर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष प्रहार केले जात असतील, तर कोणाही जबाबदार नागरिकांना वेदना होणारच. तशा पत्र पाठविणाऱ्या अधिकाऱ्यांना झाल्या आणि त्या त्यांनी दाबून न ठेवता निर्भीडपणे व्यक्त केल्या.

भाजपची ज्या-ज्या राज्यांत सत्ता आहे तेथे सामाजिक आणि धार्मिक कलहाने मस्तपैकी डोके वर काढले आहे. बुरख्याचे, गाईचे, आहाराचे, नृत्याचे असे कोणतेही कारण घेऊन द्वेषाचा अग्नी तयार केला जात आहे आणि त्याची झळ अनेकांना बसत आहे. दलित आणि प्रामुख्याने मुस्लीम समाज लक्ष्य केला जात आहे. अशी परिस्थिती भूतकाळात कधी तयार झालेली नव्हती. ती आताच झाली आणि पंतप्रधानांनी अशा घटनांवर गेल्या सात-आठ वर्षांपासून मौन पाळले आहे. ज्या काही घटना घडत आहेत त्यांनी राज्यघटना आणि तिची नैतिकता धोक्यात आली आहे. भारतातील सामाजिक सलोखा टिकवण्याचे आणि वाढवण्याचे प्रमुख काम राज्यघटना करते आहे; पण आता तेथेच ओरखडे काढले जात आहेत. घटनेने तयार केलेली सामाजिक संरचना कोसळण्याचा धोका या पत्रलेखकांना वाटतो, संताप वाटतो, वेदना होतात.

या सर्व पार्श्वभूमीवर भाजपचे आणि संघाचे काही ज्येष्ठ नेते जातिव्यवस्था चांगली पण जातिवाद वाईट, असा युक्तिवाद करत आहेत. लोकांत संभ्रम तयार करत आहेत. जातिव्यवस्था संपल्याशिवाय जातिवाद कसा संपेल आणि जातव्यवस्था हेच जातवादाचे गर्भाशय आहे, हे ते लपवून ठेवतात. जात संपल्याशिवाय जातवाद कसा संपेल, हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रश्न त्यांना का आठवत नाही? एकूणच जे काही चालले आहे ते लोकांना समजू नये, अशी एक अदृश्य व्यवस्था आहे. लोकांना धर्मवादी आणि राष्ट्रवादी बनवण्याच्या प्रयत्नांत बाकी गोष्टी सहज करण्याची ही एक नीती आहे. ती यशस्वी होत असली तरी ती योग्य नाही, असे सामूहिकपणे सांगणाऱ्या या अधिकाऱ्यांविषयी केवळ सामान्यच नव्हे, तर देशही ऋणी राहील. खरे तर ऋणी राहायला हवे.

## चर्चमध्ये वाजली एकात्मेची घंटा



भोंगा विरुद्ध चालिसा अशा संघर्षातून कोणती सामाजिक वा धार्मिक एकता साधली जाणार आहे, याविषयी सर्वांनाच साशंकता असल्याच्या काळात नाशिकमधील होली क्रॉस चर्चने एक अनोखा आणि सामाजिक, धार्मिक सलोखा बळकट करणारा उपक्रम घडवला. रमजान ईद सुरू असल्याच्या काळात त्यांनी चर्चमध्ये मुस्लीम बांधवांना निमंत्रित करून नमाज पठण आणि इफ्तार पार्टी घडवली. निमित्त इफ्तार पार्टीचे होते; पण त्याच वेळी नमाज पठणाचीही वेळ झाली. नमाज पठणासाठी मुस्लीम बांधव स्वाभाविकच मशिदीत जात असतात; पण यावेळी त्यांनी चर्चमध्येच नमाज अदा केली. खरे तर ही घटना साधी म्हणून कोणी सोडून देऊ नये. सर्वत्रच मूलतत्त्ववाद आणि जाणीवपूर्वक धर्मवाद वाढवला जात असल्याच्या काळात या घटनेला आणि चर्चचे फादर वेन्सी डिमेलो यांनी घेतलेला पुढाकारही महत्त्वाचा आहे. गेली अनेक वर्षे सर्व धर्मांचे सार राज्यघटनेत आहे. राज्यघटनेच्या अर्पणपत्रिकेत तेच आहे, असे ते सांगत आहेत. नाताळ सणानिमित्त ते सर्व धर्मांच्या प्रतिनिधींना चर्चमध्ये फराळासाठी बोलवतात. राष्ट्रीय ऐक्यावर चर्चा घडवतात. धार्मिक सलोख्यावर चर्चा घडवतात आणि सर्वच धर्मांनी प्रेमाला, बंधुतेला कशी मान्यता दिली आहे, हेही सांगतात आणि इतर धर्मीयांच्या या बाबतच्या भावनाही आनंदाने ऐकतात.

बहुतेक धर्मांना जाणीवपूर्वक आक्रमक बनवण्याचा आणि धर्मकलहाकडे नेण्याचा प्रयत्न काही जण करत आहेत. त्याची चिन्हेही आपण आजूबाजूला पाहत आहोत. या सर्व पार्श्वभूमीवर राज्यघटनेचे संवर्धन आणि आचरण करणे खूप महत्त्वाचे आहे. राज्यघटना आणि धर्म या गोष्टी परस्परविरोधी नसून पूरक आहेत. राज्यघटनेने आपल्याला धर्मपालन करण्यास सांगितले आहे. एक धर्म विरुद्ध दुसरा धर्म यांच्यात झुंजी लावण्यास सांगितलेले नाही, हे गांभीर्याने समजून घ्यायला हवे. तसे घडले तर चर्चमध्ये झालेल्या नमाज पठणाचे महत्त्व लक्षात यायला वेळ लागणार नाही. चर्चमध्ये घडलेला एक उपक्रम एवढेच त्याचे महत्त्व नाही, तर त्या पलीकडे काही आहे, हेही आपल्या लक्षात येईल.

असे उपक्रम सर्वच धर्मांतील जबाबदार घटकांनी करायला हवेत. त्यासाठी पुढाकार घ्यावा किंवा अशा उपक्रमात सहभागी व्हावे. चर्चबरोबरच इतर घटकांनीही या मार्गावर आल्यास धर्माधर्मांत झुंजी लावण्याचे काम करणाऱ्यांचे प्रयत्न स्वाभाविकच विफल होतील, अशी आशा व्यक्त करण्यास वाव मिळतो. निखळ दृष्टी ठेवून अशा गोष्टी केल्यास विश्वासार्हताही वाढते आणि स्वाभाविकच विश्वासार्हता महत्त्वाची असते. फादर वेन्सींनी केलेला उपक्रम आणि त्यास मिळालेली साथ म्हणूनच या नव्या काळात महत्त्वाची ठरते. सोळाव्या शतकात संत रोहिदास यांनीही आपल्या एका अभंगात किंवा दोह्यात असेच सांगितले होते,

***कृस्न, करीम, राम, हरि, राघव,***
***जब लग एक न पेखा ।***
***वेद कतेब कुरान, पुरानन, सहज एक नहिं देखा ।।***

म्हणजे राम, कृष्ण, हरी, करीम, राघव हे सर्व एकाच परमेश्वराची वेगवेगळी नावे आहेत. सर्वच पंथांमध्ये एकाच परमेश्वराचे गुणगान केले आहे. सर्वच जण ईश्वरभक्तीसाठी सदाचारी होण्याचा धडा शिकवतात, असा याचा अर्थ आहे. म्हणजेच आपल्याला सलोख्याची, धार्मिक ऐक्याची एक दीर्घ परंपरा आहे. त्यावर आघात होतात ही गोष्ट खरी असली, तरी अशा परंपरेचे जागरण होणेही महत्त्वाचे आहे.

## भगवतगीता विरुद्ध बायबल

बंगळुरूमध्ये एका कॉन्व्हेंट शाळेने हिंदू मुलांना बायबल शिकवल्याच्या आरोपाखाली या शाळेची चौकशी लावली आहे. छोट्या मुलांना अशा प्रकारचे परधर्माचे शिक्षण देणे म्हणजे मानवाधिकाराचे उल्लंघन आहे, असे हिंदू संघटनांना वाटते. मुलांना बायबल शिकवणे, बायबलवर आधारित गाणी शिकवणे, धडे शिकवणे यामुळे बालकांच्या हक्काचेही उल्लंघन होते. या शाळेत ख्रिस्तीच नव्हे, तर हिंदू आणि मुस्लीम विद्यार्थीही मोठ्या प्रमाणात आहेत. यातून धर्मांतराची भावना तयार होते, असेही संघटनेला वाटते. क्षणभर हे गुन्हा मानू; पण त्याच वेळेला गुजरातसह अन्य काही राज्यांनी येत्या शैक्षणिक वर्षापासून शालेय अभ्यासक्रमात भगवतगीता अनिवार्य केली आहे. आता या शाळेतील बिगर हिंदू विद्यार्थ्यांनी आणि त्यांच्या पालकांनी आक्षेप घेतला तर काय होईल? आम्ही आमचे धर्मग्रंथ वाचू, तुमचे कशासाठी, असा युक्तिवाद केल्यावर काय होईल. याचे साधे सरळ उत्तर असे येईल, की रस्त्यावरचा धार्मिक तणाव बच्चे कंपनीच्या वर्गात जाईल.

लहान मुलांना धर्माची, त्यातील तत्त्वाची, नैतिकतेची ओळख करून देणे गैर नाही; पण धर्मनिरपेक्षवादी देशात विशिष्ट धर्मग्रंथांचाच आग्रह करून चालत नाही. जे बहुसंख्य आहेत त्यांचाच धर्म शिका, इतरांचा नको, असे म्हटल्यासारखे होईल. त्यातूनही संघर्षच तयार होईल. गुजरातमध्ये भगवतगीतेचे समर्थन करताना केंद्रीय शिक्षणमंत्र्यानेच म्हटले आहे, की भगवतगीता आम्हाला नैतिकता शिकवते. आपल्या कर्तव्याबाबत उपदेश करते. गीतेतील अनेक नैतिक कथा विद्यार्थ्यांवर विधायक



परिणाम करतात, म्हणून गीता शिकवणे आवश्यक आहे. खुद्द मंत्र्यांचाच हा दावा मान्य करून अन्य धर्मीयांनी बंगळुरूमधील हिंदू संघटनेप्रमाणे प्रतिवाद केला, तर पुन्हा वादालाच खतपाणी मिळणार आहे. बंगळुरूमधील ज्या शाळेबाबत वाद निर्माण झाला आहे, त्या शाळेत शंभर वर्षांपासून येशूचे गीत शिकवले जाते. शाळेच्या स्थापनेपासून येशू आणि मेरीच्या मूर्ती तेथे असतात. पालकांना म्हणजे बिगर ख्रिस्ती पालकांना हे माहीत असूनही ते आपली मुले तेथे पाठवतात. जर गीतेतील नैतिक गोष्टी शिकणे योग्य असेल, तर मग अन्य धर्मीयांच्या धर्मग्रंथातील नैतिक गोष्टी शिकणे अयोग्य कसे होते? विशेष म्हणजे, कॉन्व्हेंटमध्ये गेल्यामुळे आपल्या मुलांनी परधर्म स्वीकारला, असे कोणत्या पालकाने व त्यांच्या मुलाने म्हटले नाही. त्या-त्या धर्मातील संघटनांनाच अशी भीती का वाटते आणि ती रास्त असेल, तर आपली मुले तेथे शिक्षणासाठी का पाठवायची, असा प्रश्न तयार होईल. गुजरातपाठोपाठ कर्नाटकामध्येही शालेय शिक्षणात गीतेचा समावेश असणार आहे. मग भाजपशासित अन्य शाळांमध्ये गीता येईल. मग देशभरात येईल. भगवतगीता शिकू नये असे कोणीच म्हणणार नाही; पण ती निखळपणे, निष्पक्षपणे आणली जाणार आहे, की कुणाला चुचकारण्यासाठी हे गुलदस्त्यात आहे, असे कोणी म्हणणार नाही. राष्ट्रवादाचा रस्ता जसा धर्मवादातून जातो तसे धर्मवादाचा रस्ता पाठ्यपुस्तकातून नेणे सोपे मानले जाते. म्हणूनच की काय यज्ञ, चमत्कार आदी अनेक गोष्टी विज्ञानाच्या नावाखाली पुस्तकात समाविष्ट केल्या जात आहेत. आपली संस्कृती टिकली पाहिजे या प्रामुहासाठी हे सारे केले जात असेल, तर ते योग्य असणार नाही. जगात सक्ती करून कधी परंपरा, संस्कृती टिकत नसते. तिची उपयुक्तता काय, सहजता काय, त्यातील समता काय आदी गोष्टी महत्त्वाच्या असतात. आपल्या पर्यावरणात परस्परविरोधी वाटाव्यात अशा घटना कशा घडत आहेत आणि त्या समाजाच्या सर्वच आघाड्यांवर कशा वाढत आहेत, हे समजून घेण्यासाठी पंक्चरवाल्याने हा अट्टहास केला.

▪▪▪

**– पंक्चरवाला**

# यशोधरा

यशोधरे!
तू एक जन्मव्याकूळ दुःखस्वप्न
तुझ्याकडे पाहण्याचे
निर्लज्ज धाडस होत नाही
बुद्धाच्या प्रकाशाने
आम्ही उजळलो पण... तू मात्र अंधार पचवलास
जीवन काळं निळं होईस्तोवर...!
छिन्न जगून बेचिराख झालीस
यशोधरे...!

तुझा तेजस्वी पण विफल इतिहास पाहताना
हळवं आभाळ शरण येतं नि
अश्रू ढाळतात व्यथित चांदण्या
तुझे अप्रतिम विरही लावण्य
संधिप्रकाशासारखे मिटत मिटत बघताना
काळजाला खिंडारे पडतात
तुझे मुके निःश्वास ऐकताना
दफन केल्यासारख्या वाटतात
सुखाच्या स्वर्गमोहक वल्गना

एक सांग यशोधरे...
इवल्या मुठीत कसे पेललेस
ते अग्निबंबाळ तुफान...?
नुसत्या कल्पनेनेही धरणी फाटत जाते
नि आक्रोश करीत लाटा
कपाळमोक्ष करतात किनाऱ्यावर
आयुष्य ओघळताना स्मरशील
सिद्धार्थाचे शेवटचे प्रयाण (प्रणय) चुंबन
ओठांचा कोवळा मोहर, थरथरला असेल
पण त्या चुंबनाची हृदयद्रावक आग
आणि त्याची भयसूचक जाग
तुला भावलीच नाही का गं...?
तुझ्यावर वीज पडली होती नकळत
तो चालला होता दिव्यत्वाकडे
तुझ्या जमिनीपासून दूर...।
तो गेला, तो जिंकला, तो प्रकाशला,
त्याच्या यशगाथा ऐकताना
तुझं स्त्रीत्व हंबरत असेल
पती नि पुत्र हरवलेली तू
उन्मळली होतीस केळीसारखी
पण इतिहासाने सांगितली नाही
तुझ्या त्यागाची महान कथा
सिद्धार्थाने समाधीचे ढोंग रचले असते
तर महाकाव्य चितारली असती तुझ्यावरही
गाजली असतीस सीतासावित्रीसारखी
तूही पोथ्या पुराणांतून
यशोधरे..!

धिक्कार वाटतो या अन्यायाचा
एकाही बुद्धविहारात तू नाहीस
इतकी का तू नगण्य होतीस?
पण थांब... अशी व्यथित होऊ नकोस
तुझं लोभस रूपडं मी बघितलंय
सिद्धार्थाच्या दोन्ही बंद पापण्यांत
तूच आहेस... यशू... तूच आहेस.

**– हिरा बनसोडे**

# धीर देणारा माणूस

मलम घेऊन येणारी माणसे कुठे गेली
दवा घेऊन येणारी माणसे कुठे गेली
कुठे गेली ती माणसे दुवा देणारी

फुंकर मारायची माणसं
डोळ्यांत कचरा गेल्यावर
पायात काटा मोडल्यावर हळहळायची
सळसळायची माणसं अन्यायावर
कुठे गेली मी माणसे धडपडणारी

कुणी हळद घेऊन यायचे
कुणी टाकायचे माती जखमेवर
कुणी आणायचे अंगारा
कुठे गेली ती माणसे धीर देणारी

ती सगळी माणसे
आपल्या जवळच आहेत
स्वतःच्या यातनांशी लढतायत
शोधा... तुमच्या स्वतःतच आहे असा एक माणूस
हल्ली आपण आपल्यातच
धीर देणारा माणूस होणंही महत्त्वाचं आहे
या अधीर विकृत काळात...

**– इंद्रजित घुले**

पाक्षिक

स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी

# द पीपल्स पोस्ट

## वार्षिक वर्गणीदारांना

## २०% सवलत!

देश आणि राज्यातील सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक घटनांचा वेध घेणारे निपक्षः निर्भीड पाक्षिक

हो, मी "द पीपल्स पोस्ट" चा वर्गणीदार बनू इच्छितो!

खाली आपल्या आवडीच्या ऑफरवर निषाण लावून वाचक–वर्गणीदाराचा फॉर्म भरून खालील पत्त्यावर पाठवावा : कार्यालय : सीटीएस नं. १४४, मिल कॉर्नर छावणी रोड, बारापुल्ला गेटजवळ, मिल कॉर्नर, औरंगाबाद – ४३१००१

| टिक करा | अवधि | एकूण अंक | कव्हर किंमत (रू.) | आपल्याला द्यावे लागतील (रू.) | |
|---|---|---|---|---|---|
| ☐ | १ वर्ष | २४ | ७२० | ६०० | |
| ☐ | ६ महिने | १२ | ३६० | ३०० | |
| ☐ | ३ महिने | ६ | १८० | १५० | |

(वार्षिक विशेषांक – ६) / (६ महिने–३)

चेक किंवा डीडी ने पेमेंट

मी 'द पीपल्स पोस्ट' च्या नावाने पाठवत आहे. -------------------- दिनांक -------- (बँकेचे नाव) ----------------

चेक/डीडी क्र. --------------------.

किंवा माझ्या क्रेडीट कार्ड ने वसूल करा ☐ MasterCard ☐ VISA ☐ AMERICAN EXPRESS कार्ड नं. ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐

कार्डधारकाचे नाव : ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ कार्ड एक्सपायरी दिनांक : ---- महिना---- वर्ष-----

कार्डधारकाची स्वाक्षरी : ------------------------------ जन्म तारीख : ---------- दिवस----- महिना----- वर्ष-----

नाव : ------------------------------ पत्ता : ------------------------------

------------------------------ शहर : ------------------------------

राज्य : -------------------- पिन कोड : -------------------- फोन नं. (घर) : --------------------

मो. नं. : -------------------- इ–मेल : ------------------------------

आपण या माध्यमांद्वारेही सबस्क्राईब करू शकता २९ ऑगस्ट ते १२ सप्टेंबर २०१८

व्हॉट्स अप क्रं. ८८८८५४१८२२ किंवा ७३५००९१५६३ क्र. वर फोन करा:

इ–मेल करा thepeoplespost2014@gmail.com

लॉग ऑन करा www.thepeoplespost.com

कृपया लक्ष द्या : ही ऑफर मर्यादीत कालावधीसाठी आहे. द पीपल्स पोस्ट यांच्याकडे ह्या ऑफरशी संबंधीत कुठल्याही नियम व अटींना कमी करणे किंवा वाढवण्याचे अधिकार आरक्षित आहेत.

POSTAL REGISTRATION NO. ABD/492/2020-22
RNI REG. NO. MAHMAR/2018/76460

